सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, दि. ३० जुलै २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १०६ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मराठा समाजासाठी महायुती सरकारएवढे निर्णय कोणीही घेतले नाहीत! : मुख्यमंत्री

## कुणाला न्याय मिळत नसल्याची भावना असेल, तर संवादातून मार्ग काढू

**मुंबई :** "मराठा समाजाच्या हितासाठी आणि कल्याणासाठी महायुती सरकारने जितके निर्णय घेतले आणि त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली, तेवढे निर्णय यापूर्वी राज्यातील कोणत्याही सरकारने घेतलेले नाहीत. असे असतानाही जर कोणाच्या मनात काही शंका किंवा न्याय मिळत नसल्याची भावना असेल, तर राज्य सरकार संवादातून नक्कीच योग्य मार्ग काढण्यास तयार आहे," अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी नागपूर येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी २९ ऑगस्टपासून पुन्हा एकदा आंदोलनाचा इशारा दिल्याच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी सरकारची



भूमिका स्पष्ट केली.

राज्यात सापडलेल्या ५८ लाख कुणबी नोंदींच्या आधारे मराठा समाजाला प्रमाणपत्रे दिली जात नसल्याचा आरोप जरांगे पाटील यांनी केला होता. यावर स्पष्टीकरण देताना मुख्यमंत्री म्हणाले की, ज्यांनी ज्यांनी नियमानुसार जात प्रमाणपत्रासाठी अर्ज केले आहेत, त्या बहुतांश नागरिकांना प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली आहेत. सध्या यासंदर्भातील प्रलंबित प्रकरणांची संख्या अत्यंत कमी आहे. तरीही काही पात्र व्यक्ती यापासून वंचित राहिल्याचे कोणाला वाटत असेल, तर सरकार त्यांच्याशी सविस्तर चर्चा करून प्रश्न सोडवण्यास कटिबद्ध आहे.

नीट पेपरफुटीबाबत मुंबईसह राज्यात झालेल्या आंदोलनादरम्यान महाराष्ट्र पोलिसांनी अत्यंत संयमाची भूमिका घेतली होती. या काळात विद्यार्थ्यांवर प्रामुख्याने जमावबंदीचे जे गुन्हे दाखल झाले आहेत, ते सर्व गुन्हे मागे घेण्याचे स्पष्ट आदेश पोलीस आणि गृह विभागाला देण्यात आले असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

बोगसगिरी रोखल्याने पीक विम्याच्या लाभार्थ्यांची संख्या घटली

एक रुपयात पीक विमा योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची संख्या कमी झाल्याच्या तक्रारींवर बोलताना मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, "राज्य सरकारने अवघ्या एक रुपयात पीक विमा उपलब्ध करून दिल्यानंतर मोठ्या प्रमाणावर बोगस अर्ज दाखल झाल्याचे निदर्शनास आले होते. या गैरप्रकारांवर सरकारने कठोर कारवाई केल्यामुळेच आता पात्र शेतकऱ्यांनाच याचा लाभ मिळत असून, लाभार्थ्यांची संख्या नैसर्गिकरीत्या नियंत्रित झाली आहे," असे त्यांनी स्पष्ट केले. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर टीका करताना मुख्यमंत्री म्हणाले की, राहुल गांधी यांच्या भाषणात कोणताही नवीन मुद्दा किंवा युवकांच्या कल्याणाचा ठोस अजेंडा नसतो. देशात अराजकता माजवणे हाच त्यांचा मुख्य उद्देश आहे.

# एक नाही, दोन नाही तर तब्बल ७००० विद्यार्थी HIV बाधित

**बंगळुरू :** कर्नाटकातील १८ ते २५ वयोगटातील ७,००० हून अधिक तरुण आणि विद्यार्थी एचआयव्ही बाधित आढळल्याची चिंताजनक माहिती समोर आली आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत कर्नाटक सरकारने आता सर्व अभियांत्रिकी आणि पदवी महाविद्यालयांमध्ये एचआयव्ही तपासणी तसेच समुपदेशन शिबिरे आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. ही शिबिरे सर्व सरकारी, अनुदानित आणि खाजगी महाविद्यालयांमध्ये घेतली जातील. परंतु, कोणत्याही विद्यार्थ्याची तपासणी त्याच्या संमतीशिवाय केली जाणार नाही, असे सरकारने स्पष्ट केले आहे.

कर्नाटक राज्य एड्स प्रतिबंधक सोसायटीच्या शिफारशीनुसार उच्च शिक्षण विभाग आणि तंत्रज्ञान विद्यापीठाने महाविद्यालयांमध्ये एकात्मिक आरोग्य शिबिरे सुरू केली आहेत. नॅशनल एड्स कंट्रोल ऑर्गनायझेशनच्या अहवालानुसार भारतात एचआयव्ही बाधितांच्या संख्येत कर्नाटक तिसऱ्या क्रमांकावर आहे. कर्नाटकात सध्या सुमारे २.६० लाख लोक एचआयव्हीसह जगत आहेत. मात्र त्यापैकी २.०५ लाख लोकच उपचार घेत आहेत. म्हणजेच ५४ हजार लोकांना आपल्याला संसर्ग झाल्याची माहितीच नाही.

१८ ते ३५ वयोगटातील तरुणांमध्ये एचआयव्हीचे प्रमाण वेगाने वाढले आहे. २०२३-२४ मध्ये ही संख्या ४४,५०० होती, ती आता ६६,६०० वर पोहोचली आहे. यामध्ये १८ ते २५ वयोगटातील ७,००० हून अधिक विद्यार्थी आढळल्याने प्रशासनाने महाविद्यालयांवर लक्ष केंद्रित केले आहे. विद्यार्थ्यांची गोपनीयता जपण्यासाठी विशेष क्यूआर कोड आधारित स्व-जोखीम मूल्यांकन सुविधाही सुरू करण्यात आली आहे.

## थोडक्यात

### शाळांच्या परिसरात जंक फूडच्या विक्रीवर बंदी; प्रशासनाचे निर्देश

**मुंबई :** राज्यातील शालेय विद्यार्थ्यांचे आरोग्य जपण्यासाठी आणि त्यांना लहान वयातच लठ्ठपणा तसेच विविध आजारांपासून दूर ठेवण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) कठोर नियमावली आणली आहे. राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय आणि खासगी शाळांच्या ५० मीटर परिघात उच्च चरबीयुक्त, जास्त मिठाचे आणि अतिरिक्त साखर असलेल्या 'जंक फूड'च्या विक्रीवर पूर्णपणे बंदी घालण्याचा निर्णय अन्न व औषध प्रशासनाने घेतला आहे. नवीन नियमावलीनुसार, शाळेच्या ५० मीटरच्या परिघात कार्यरत असलेली दुकाने, लहान-मोठे स्टॉल्स आणि खाद्यपदार्थ पुरवठादारांना 'भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरणाचे' (एफएसएसएआय) सर्व नियम पाळणे आता अनिवार्य असणार आहे. या परिघात अतिरिक्त फॅट्स, जास्त साखर आणि सोडियमचे प्रमाण असलेल्या प्रक्रियायुक्त खाद्यपदार्थांची विक्री करणाऱ्यांवर कायद्याचा बडगा उगारला जाणार आहे. शालेय वयातच विद्यार्थ्यांना सकस आणि संतुलित आहाराची सवय लागावी, हा या निर्णयामागील मुख्य उद्देश आहे.

### बहिणीच्या प्रेमविवाहाचा संताप भावाला अनावर , भावाने थेट...

**जळगाव :** बहिणीने कुटुंबाच्या इच्छेविरुद्ध दुसऱ्या समाजातील तरुणाशी प्रेमविवाह केल्याचा राग मनात धरून मेहुण्यावर जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना जामनेर तालुक्यातील फत्तेपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. या हल्ल्यात प्रशांत चौधरी (२५) हा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथे अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रशांत चौधरी आणि संबंधित तरुणी हे वेगवेगळ्या समाजातील असून दोघांमध्ये काही काळापासून प्रेमसंबंध होते. कुटुंबीयांचा विरोध असल्याने त्यांनी सिल्लोड येथे जाऊन प्रेमविवाह केला. विवाहानंतर दोघे एकत्र राहत असताना या नात्याबद्दल मुलीच्या कुटुंबीयांमध्ये तीव्र नाराजी होती. प्रेमविवाहामुळे कुटुंबाची बदनामी झाल्याची भावना मनात ठेवून मुलीचा सख्खा भाऊ अभिषेक मोरे याने प्रशांत चौधरी याच्यावर हल्ला केल्याचा आरोप आहे.

### आयसीसी वर्ल्ड कप 2027 मध्ये होणार मोठे बदल?

**मुंबई :** आयसीसी वर्ल्ड कप २०२७ सुरू होण्यासाठी अजून खूप वेळ असला , तरी स्पर्धेच्या स्वरुपावरून क्रिकेट विश्वात चर्चा रंगली आहे. वर्ल्ड कप २०२७ दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि नामिबिया संयुक्तपणे आयोजित करणार आहेत. आयसीसीने नव्या स्पर्धा स्वरुपाची घोषणा झाल्यानंतर ऑस्ट्रेलियाचे मुख्य प्रशिक्षक अँ मॅकडोनाल्ड यांनी आयसीसीशी मागणी केली आहे की, वर्ल्ड कप २०२७ साठी १५ ऐवजी १७ खेळाडूंचा संघ ठेवण्याची परवानगी देण्यात यावी. आयसीसीने जाहीर केलेल्या नव्या फॉर्मेटनुसार एखादा संघ फेरीपर्यंत पोहोचला तर त्याला तब्बल १५ सामने खेळावे लागतील. इतक्या मोठ्या स्पर्धेत खेळाडूंना दुखापत, खेळपट्टीतील बदल आणि विविध परिस्थितींचा सामना करावा लागणार आहे. त्यामुळे केवळ १५ खेळाडूंचा संघ अपुरा ठरू शकतो, असे मॅकडोनाल्ड यांचे मत आहे. त्यांच्या मते, १७ खेळाडूंचा संघ असल्यास संघ व्यवस्थापनाला विविध परिस्थितीनुसार संघरचना बदलण्याची अधिक संधी मिळेल आणि दुखापतींमुळे संघाची ताकद कमी होणार नाही.

# सात महिन्यांपासून फरार असलेल्या बलात्कार प्रकरणातील आरोपीला पिशोर पोलिसांकडून अटक

तभा वृत्तसेवा

**कन्नड :** जानेवारी २०२६ मध्ये पिशोर पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या बलात्कार प्रकरणातील सात महिन्यांपासून फरार असलेल्या आरोपीला पिशोर पोलिसांनी गोपनीय माहिती व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे अटक केली. सुभाष किसन आग्रे (वय ३८, रा. डोंगरगाव, ता. कन्नड) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी सातत्याने ठिकाणे बदलत पोलिसांना गुंगारा देत होता. त्यामुळे त्याचा शोध घेण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू होते. दरम्यान, आरोपी डोंगरगाव परिसरात असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीची तांत्रिक विश्लेषणाद्वारे खातरजमा करण्यात आल्यानंतर पिशोर पोलीस ठाण्याच्या पथकाने डोंगरगाव येथे सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले. त्यानंतर संबंधित गुन्ह्यात त्याला विधिवत अटक करण्यात आली.

आरोपीला न्यायालयासमोर हजर करण्यात येणार असून प्रकरणाचा पुढील तपास पिशोर पोलीस ठाण्याकडून सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक प्रकाश भा. जाधव, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी तसेच सहाय्यक पोलीस अधीक्षक अपराजिता अग्निहोत्री (कन्नड उपविभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सुर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक विश्वजित फरताडे, सफौ सय्यद, पोलीस हवालदार दराडे, पोलीस कॉन्स्टेबल कव्वाल, म्हस्के, पवन खंबाट, घुनावत तसेच महिला पोलीस शिपाई घुले यांनी ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली.

# कार–मोटारसायकलच्या धडकेत दोघांचा मृत्यू

तभा वृत्तसेवा

बिडकीन, दि. २९ पैठण–छत्रपती संभाजीनगर महामार्ग क्र. ७५२ वरील रमानगरजवळ परिंदा हॉटेलसमोर कार आणि मोटारसायकलची समोरासमोर धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात दोन तरुणांचा मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवार (दि. २८) रोजी मध्यरात्री सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास जगद्गुरू रामानंदाचार्य संस्थान, नाणीज धामच्या रुग्णवाहिका चालकाला अपघाताची माहिती मिळाली. त्यानुसार रुग्णवाहिका तत्काळ घटनास्थळी दाखल झाली.

कार (क्र. MH20 HT 6667) व मोटारसायकल (क्र. MH20 FN 7857) यांची समोरासमोर धडक झाल्याने मोटारसायकलवरील दोघे तरुण गंभीर जखमी झाले होते. जखमी प्रतीक संजय कांबळे (वय २०) व सौरभ म्हात्रे (वय २३, दोघेही रा. बिडकीन, ता. पैठण) यांना प्रथम बिडकीन घाटी येथे प्राथमिक उपचार देऊन पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती दोघांनाही मृत घोषित केले.या घटनेमुळे बिडकीन परिसरात शोककळा पसरली असून, बुधवारी दुपारी दोन्ही तरुणांवर अंत्यसंस्कार करण्यात आले. या अपघाताची नोंद बिडकीन पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मनोज पाटील, सहायक फौजदार अशोक सोकटकर, बीट जमादार आप्पासाहेब माळी तपास करीत आहे

# अजिंठा टि पॉइंट वळणावर दोन ट्रकाचा अपघात



तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि 28. छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावर अजिंठा लेणी टि पॉइंट वळणावर दोन ट्रकाचा समोरासमोर अपघात मंगळवारी संध्याकाळी साडेपाच वाजता दोन ट्रकाचा अजिंठा लेणी टि पॉइंट वळणावर दोन ट्रकाचा समोरासमोर अपघात झाला असून यातील आयशर ट्रक एम एच 19 सी एक्स 0773 तोंडापूर हुन लाकडी गट्टू घेऊन छत्रपती संभाजीनगर कडे जात होता तर दुसरा कंटेनर आर जे 23 जी सी 7714 तामिळनाडू हुन कापड राजस्थान घेऊन जात असताना हा अपघात झाला असून यातील दोन्ही गाड्या चे चालक किल्नर किरकोळ जखमी आहेत याठिकाणी फर्दापूर पोलीस स्टेशनचे सहा पोलीस निरीक्षक सुधीर मोटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कर्मचारी आकाश गवळे, ठाकरे, होमगार्ड शिवाजी रोकडे,किरण सपकाळ यांनी घटनास्थळी जाऊन याठिकाणी ट्राफिक जाम होणार नाही याची काळजी घेतली कारण अजिंठा घाटातील फर्दापूर कडे येणारा सर्वात मोठा वळण घेणारा रस्ता असल्याने येथे पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले होते या अपघात ठिकाणी या दोन्ही ट्रक रस्त्यावर असल्याने येथे एकेरी वाहतूक सुरळीत करण्यात आली होती या अपघाताचे असे आहे की चालक यांनी सांगितले की या वळणावर रस्त्यावर खड्डे पडले आहेत या दोन्ही गाड्या चे चालक खड्डे वाचताना या दोन्ही गाड्या एकमेकांवर धडकल्यामुळे अपघात झाला असे सांगण्यात आले आहे तसेच अजिंठा घाटात बऱ्याच ठिकाणी मोठ मोठे खड्डे पडले असून हे खड्डे पावसाने अजून मोठे होतात त्यामुळे अजिंठा घाटात बांधकाम विभाग यांनी खड्डे डाबरानी बुजविण्याचे यावे असे चालक यांची मागणी करण्यात येत आहे.

# आ. संजय केणेकर यांच्या संकल्पनेतून ड्रोनद्वारे ५० हजार सीड बॉल्सची आकाशातून पेरणी

## देवेंद्रजींच्या जन्मोत्सवानिमित्त हरित महाराष्ट्र अभियानाला नवे बळ

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जन्मोत्सवानिमित्त आयोजित 'देवेंद्रजी जन्मोत्सव – हरित महोत्सव' आणि 'हरित महाराष्ट्र सप्ताह' अंतर्गत ग्रीन ग्लोब फाउंडेशन व धर्मन वेल्फेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने बकापूर-पळशी परिसरात ड्रोनच्या साहाय्याने तब्बल ५० हजार सीड बॉल्सची आकाशातून पेरणी करण्यात आली. माजी आमदार तथा हरित महाराष्ट्र अभियानाचे मराठवाडा मुख्य समन्वयक संजय केणेकर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या अभिनव उपक्रमाने पर्यावरण संवर्धनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत एक वेगळा आदर्श निर्माण केला.



मराठवाड्यात ५ लाख वृक्षलागवडीच्या महासंकल्पाचा भाग म्हणून राबविण्यात आलेल्या या उपक्रमात दुर्गम डोंगराळ व मोकळ्या परिसरात मोठ्या प्रमाणावर सीड बॉल्सची पेरणी करण्यात आली. कमी वेळेत विस्तीर्ण क्षेत्र हरित करण्यासाठी ड्रोन तंत्रज्ञान प्रभावी ठरत असून, भविष्यात अशा उपक्रमांमुळे पर्यावरण संवर्धनाला मोठी चालना मिळणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या उपक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश पाटील गलांडे होते.

यावेळी पंचायत समिती सभापती कल्याण पाटील गायकवाड, जिल्हा परिषद सदस्य अजिनाथ धामणे, पंचायत समिती सदस्य निर्मलाताई पळसकर, उपजिल्हाधिकारी राठोड, तहसीलदार बिडवे, नगरसेवक रामेश्वर भादवे, तुषार दरक, गटविकास अधिकारी साळुंखे, आत्माराम पळसकर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, पर्यावरणप्रेमी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येक नागरिकाने वृक्षलागवड आणि वृक्षसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारण्याचे आवाहन केले. संजय केणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या 'संकल्प हरित महाराष्ट्राचा... सहभाग प्रत्येक जनमानसाचा!' या अभियानाला मराठवाडाभर उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, त्याचाच एक भाग म्हणून ड्रोनद्वारे सीड बॉल्सची आकाशातून पेरणी हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला.



CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## अपुऱ्या पावसातही न खचता उजेड शिवारात सोयाबीनची अंतरमशागत; शेतकरी बालाजी जाधव यांचा जिद्दीचा आदर्श



उजेड ता शिरूर अनंतपाळ यंदाच्या खरीप हंगामात अपुऱ्या पावसामुळे उजेड शिवारातील सोयाबीन पिकाची वाढ अपेक्षेप्रमाणे होत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. वेळेवर व पुरेशा प्रमाणात पाऊस न झाल्याने पिकांची उगवण आणि वाढ दोन्हीवर परिणाम झाला आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीतही येथील शेतकरी बालाजी जाधव यांनी हार न मानता आपल्या सोयाबीन पिकात अंतरमशागतीच्या कामाला सुरुवात केली आहे. अंतरमशागतीमुळे पिकाभोवतीची माती भुसभुशीत राहते, तणांचे नियंत्रण होते तसेच पावसाचे पाणी जमिनीत अधिक प्रमाणात मुरण्यास मदत होते. त्यामुळे पुढील काळात चांगला पाऊस झाल्यास पिकाच्या वाढीस त्याचा निश्चितच फायदा होईल, असा विश्वास शेतकरी व्यक्त करत आहेत.

यावेळी शेतकरी बालाजी जाधव म्हणाले, "शेत पिको अथवा न पिको, पण शेतीसाठी ठरलेली कामे वेळेवर करणे हे प्रत्येक शेतकऱ्याचे कर्तव्य आहे. निसर्ग आपल्या हातात नसला तरी मेहनत मात्र आपल्या हातात आहे. त्यामुळे परिस्थिती कितीही कठीण असली तरी शेतीतील आवश्यक कामांमध्ये कसूर करता कामा नये."

अपुऱ्या पावसामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकटाचे सावट असले तरी बालाजी जाधव यांच्यासारखे शेतकरी जिद्द, चिकाटी आणि आशावाद कायम ठेवून शेतीची कामे सुरू ठेवत असल्याने इतर शेतकऱ्यांसाठीही ते प्रेरणादायी ठरत आहेत. आता सर्वांचे लक्ष आगामी पावसाकडे लागले असून, वेळेवर चांगला पाऊस झाल्यास सोयाबीन पिकाला नवसंजीवनी मिळण्याची आशा व्यक्त केली जात आहे.



# विविध वृत्त

## पुढील तीन दिवसात जिल्ह्यात पाऊस

**लातूर दि.29 जुलै :** बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्या मुळे29 ते31 जुलै दरम्यान लातूरसह उत्तर मराठवाडा आणि राज्यातील विविध भागांत पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. या काळात विदर्भ, खानदेश, कोकण आणि मध्य महाराष्ट्रात मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता आहे. यावेळी सखल भागात पाणी साचणे, नदी - नाल्यांना पूर येणे आणि वाहतूक विस्कळीत होण्याचा धोका असून घाट परिसरात दरड कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे

## बसचे स्टिअरिंग ओढणे पडले महागात: प्रवाशावर गुन्हा दाखल

**लातूर दि29 जुलै :** लातूर - औसा महामार्गावरील चांदेश्वर परिसरात बसचा एक विचित्र अपघात झाला होता. एका मनोरुग्ण प्रवाशाने चालत्या बसचे सिअरिंग अचानक ओढल्याने चालकाच नियंत्रण सुटल्याने बसने रस्त्यालगन उभ्या असलेल्या स्कूल बसला धडक दिली . याप्रकरणी एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यानी दिलेल्या तक्रारीनुसार ग्रामीण पोलीस ठाण्यात कारवाई करण्यात येऊन मनोज हनुमंत खडके या प्रवाशांच्या विरुद्ध कलम125 ए - बी आणि324 - ५ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस पुढील तपास करत आहेत.

## थकबाकीदारांवर आता मनपाची जप्ती मोहीम

**लातूर दि29 जुले :** लातूर महानगर पालिकेने मालमत्ता कराच्या वसुलीसाठी आता कंबर कसली असून शहरात1490 बड्या मालमत्ता धारकांकडे प्रत्येकी1 लाख रुपयांपेक्षा अधिक कर थकीत असून मनपा तर्फे झोन निहाय विशेष पथके तैनात केली जाणार आहेत . शहराचे रस्ते, गटारी, पाणी, पथदिवे आणि स्वच्छते सारखी कामे करण्यासाठी मालमत्ता करावरच अवलंबून रहावे लागते . तसेच मनपाच्या कर्मचाऱ्यांच्या पगारी ही यातूनच होत असतात . बड्या थकबाकीदारांच्या टाळाटाळीमुळे विकास कामांना खीळ बसत असून याचा नाहक फटका नियमित कर भरणाऱ्या सामान्य नागरिकांना बसत आहे . मनपा प्रशासनाने गेत्या दिड वर्षात 7 वेळा दंड माफी योजना राबविली आहे .23 जुलै पर्यत6500 सामान्य नागरिकांनी याचा लाभ घेतला . मात्र बड्या थकबाकी धारकांनी या योजनेकडे पाठ फिरविली आहे . त्यामुळे आता1 ऑगस्ट पासून1490 बड्या थकबाकीदारांवर धडक कारवाई केली जाणार आहे . कर न भरल्यास थेट नळजोडणी तोडणे, मालमत्ता सील करणे आणि शेवटी जप्तीची कारवाई केली जाणार असल्यामुळे थकबाकीदारांनी वेळेत थकबाकी भरून आपली होणारी जप्ती टाळावी, असे आवाहन मनपा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे

## धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा; विद्यार्थी एकजुटीचा विजय - सिकंदर शेख

**उदगीर :** नीट (NEET) परीक्षांमध्ये पेपर फुटींमुळे अनेक मुलांनी आत्महत्या केल्या.या मुळे दिल्ली येथे जंतर मंतर मैदानावर सोनम वांगचुक यांनी उपोषण केले. अभिजीत दीपके यांनी नेतृत्वाखाली देशातील विध्यार्थी आंदोलन केले.या आंदोलनात अनेक विद्यार्थ्यांवर लाठी हल्ला केला.याच्या विरोधात देश संपूर्ण विध्यार्थी एकजूट झाले.देशातील सर्व राज्यातून विद्यार्थी जन रेट्यापुढे सरकारला झुकावे लागले शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा द्यावा लागला हा विद्यार्थी एकजुटीचा विजय आहे, अशी भावना सिकंदर शेख यांनी व्यक्त केली. देश भक्त सोनम वांगचुक यांनी उपोषण केले. त्यांनी २६ दिवस उपोषण करून एक आदर्श निर्माण केला तसेच अभिजित दिपके यांनी या आंदोलनाचे नेतृत्व केले देशात आज संपूर्ण विद्यार्थी आंदोलनाचा चेहरा म्हणून सोनम वांगचुक व अभिजीत दीपके यांचं नेतृत्व संपूर्ण देशातील विद्यार्थ्यांनी स्वीकारले.आज सोनम वांगचुक व अभिजीत दीपके हे आंदोलनाचे हिरो ठरले आहेत. देशात जंतर मंतर मैदानावरील सरकारने केलेल्या लाठी हल्लायामुळे काश्मीर ते कन्याकुमारी व आसाम ते मुंबई संपूर्ण देश एक झाला सर्वांनी एकत्र येऊन धरणे, निदर्शने, मोर्चा,रॅली,आंदोलने करून सरकारवर दबाव आणला. या मध्ये देशात संपूर्ण युवक विद्यार्थी एकत्र येऊन सरकारला विद्यार्थी पुढे झुकावे लागले.शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा द्यावा लागला.हा विध्यार्थी एकजुटीचा विजय आहे,असे महाराष्ट्र जनएकता संघटने जिल्हा कार्याध्यक्ष ईस्माइल मनिरयार जिल्हा उपाध्यक्ष परवेज शेख उदगीर तालुका अध्यक्ष सिकंदर भैय्या शेख तालुका कार्यांध्यक्ष गोसोद्दिन शेख यांनी सागीतले..

सोलापूर तरुण भारत Solapur Tarun Bharat

छोट्या जाहिराती/जाहीर प्रगटन / इतर जाहिराती योग्य दरात छापल्या जातील संपर्क –७३८५५६७०३१

## वृक्ष लागवड व संगोपन चळवळ गतिमान होणे काळाची गरज : डॉ. सोमनाथ यादव



**जळकोट प्रतिनिधी :** हजारो वर्षापासून पृथ्वीवरील वाढलेली जंगले माणसाने केवळ गेल्या एका शतकात उध्वस्त केली. त्यामुळे परिस्थिती एवढी मोडकळीस आली. याचा परिणाम प्राणी आणि मानवी जीवनावर झाला. सद्य:स्थितीत त्यामुळे जगात कुठे उष्णतेची लाट, कुठे भूकंप, तर कुठे ज्वालामुखीचा प्रकोप होतो आहे. या बदलाचा परिणाम वनस्पतीवर अधिक झाला असून काळाच्या ओघात बऱ्याच वनस्पती नामशेष होत आले आहेत.

राहिलेल्या वनस्पतीमध्ये पृथ्वीचे नंदनवन करण्याची प्रचंड शक्ती आहे, त्यामध्ये वाढती लोकसंख्या आणि नागरिकांच्या विस्ताराच्या प्रमाणात वृक्ष लागवड झाली नाही तर आज निर्माण झालेले विविध आजार याचाही माणसांना मनस्ताप झाल्याशिवाय राहणार नाही, वनस्पती हाच तर प्राणीमात्राचा प्रमुख जीवनस्त्रोत आहे. त्यामुळे वृक्ष चळवळ अधिक किमान करणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन मत्स्य विज्ञान महाविद्यालयाचे प्रभारी सहयोगी अधिष्ठाता डॉ सोमनाथ यादव यांनी केले.

जळकोट तालुक्यातील अतनूर येथे जनक्रांती डोंगरी विकास बहुउद्देशीय सेवाभावी संस्था अतनूर, ग्राहक जनजागरण व मार्गदर्शन संस्था समिती महाराष्ट्र राज्य व साधूराम ग्रामीण विकास बहुउद्देशीय सेवाभावी संस्था अतनूर या संस्थेच्या वतीने दि.२८ जुलै मंगळवार रोजी जागतिक निसर्ग संवर्धन दिनानिमित्ताने मौजे अतनूर येथे नुकतेच डॉ.सोमनाथ यादव यांच्या हस्ते राज्य मार्ग क्रमांक २६८, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्रात व अतनूर-गव्हाण राज्य मार्ग क्रमांक २६८ दुतर्फा मार्गावरील आजूबाजूला व शेतकऱ्यांच्या बांधावर वृक्ष लागवड, वृक्षारोपण व संगोपनासाठी व्यापक प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात आली. पुढे बोलताना ते म्हणाले, आधुनिक काळात निर्माण झालेल्या विविध प्रश्नामध्ये वाढते तापमान, हवेचे प्रदूषण यासारख्या गंभीर समस्यांना भविष्यात सगळ्याच प्राणीमात्रांना सामोरे जावे लागेल यासाठीही वृक्ष लागवड आणि जोपासन ही उपक्रम राबविणे गरजेचे आहे.

यावेळी गावातील जेष्ठ नागरिकांचा पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमासाठी मुख्य संयोजक वृक्षमित्र चळवळीचे समाजसेवक तथा दलित मित्र बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर, हिप्पळनारीच्या सरपंच श्रीमती इंदरबाई रामचंद्र शिंदे, संस्थेचे पदाधिकारी चंद्रकांत शिंदे, ग्राहक जनजागरण व मार्गदर्शन समिती संस्था महाराष्ट्र राज्य संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बी.जी.शिंदे, माजी सैनिक शिवाजी कदम, गुरुनाथ कापसे, ग्रामपंचायत सदस्य तुळशीराम कोडरूळ, संस्थेचे गणेश कोडरूळ, व इतर नागरिक, संस्थेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रीराम विद्यालयाचे तेरा विद्यार्थी स्कॉलरशिपसाठी पात्र



रेणापूर -श्रीराम प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय रेणापूरचे तेरा विद्यार्थी चौथी व सातवी स्कॉलरशिप परीक्षेत शिष्यवृत्तीस पात्र झाले . या विद्यार्थ्यांचा आज दि . २८ जुलै रोजी मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये पालकांसमवेत सत्कार संपन्न झाला . रेणुका शिक्षण संस्थेचे अध्यक्ष देविदासराव कुटवाड , सचिव ॲड पंडितराव उगिले व सर्व संचालक मंडळींनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले .या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्रीराम माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य अनिल कुटवाड उपस्थित होते . तर प्रमुख अतिथी म्हणून श्रीराम प्राथमिक विद्यामंदिरचे मुख्याध्यापक चंचला वलसे,उपप्राचार्य प्रा. भरत धायगुडे ,पर्यवेक्षक प्रा . जुबेर खान पठाण,सांस्कृतिक विभाग प्रमुख अमृतेश्वर स्वामी,क्रीडा विभाग प्रमुख विवेक भातिकरे यांची उपस्थिती होती . संगीत विभाग प्रमुख महादेव बन यांनी सुंदर स्वागत गीत सादर केले .४थी स्कॉलरशिप परीक्षेत श्रवण सप्ताळ ,समृद्धी कांबळे, स्वप्नाली शिंदे ,अर्पिता बंडे हे विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र झाले तर७वी स्कॉलरशिप परीक्षेत मानसी गोरे,सिद्धी डावळे ,श्रीनाथ इरकटे,दिव्या साखरे ,सृष्टी इंदापूरे,शंकर भातीकरे, सारंग चव्हाण, ,अन्वेशा गिरी ,समीक्षा सुडे हे विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र झाले . या विद्यार्थ्यांचा शाल व पुस्तक भेट देऊन पालकांच्या समवेत सत्कार करण्यात आला . याप्रसंगी बोलताना प्राचार्य अनिल कुटवाड म्हणाले की 42 वर्षाची यशाची व गुणवत्तेची परंपरा आहे .यामागे पालकांचा विश्वास व गुरुजनांचे परिश्रम महत्त्वाचे आहेत . यापुढेही गुणवत्तेची परंपरा अशीच कायम राहील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला . याप्रसंगी मार्गदर्शक अमृतेश्वर स्वामी,प्रशांत कोष्टी,निलेश उगीले,कल्पना खंदाडे,कल्पना कांबळे ,श्री प्रसाद उगीले यांचा सत्कार करण्यात आला . याप्रसंगी विद्यार्थी पालक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख अमृतेश्वर स्वामी यांनी केले .

## सुरक्षित इंटरनेट वापरासाठी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा प्रशिक्षण

**लातूर :** राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर आणि क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या जनजागृती उपक्रमांतर्गत दयानंद विद्यालय बाभळगाव ता. जि.लातूर येथे विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती सत्र उत्साहात पार पडले.

दि. २८ जुलै २०२६ रोजी सकाळी १२.०० ते ०१.१२ या वेळेत झालेल्या या सत्रात इयत्ता आठवी ते दहावीच्या २५० हून अधिक विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी सायबर वॉरिअर जाधव योगिता आणि सायबर वॉरिअर बोरूळे प्राजक्ता यांनी फोटो मॉर्फिंग, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय)च्या माध्यमातून फोटो तयार करण्याची प्रक्रिया, एआयचा सुरक्षित आणि जबाबदारीने वापर, मजबूत परवलीचा शब्द (पासवर्ड) तयार करण्याचे महत्त्व याबाबत उदाहरणांसह माहिती दिली. तसेच मोबाईलमध्ये कोणतेही ॲप डाउनलोड करताना कोणत्या परवानग्या द्याव्यात आणि कोणत्या परवानग्या देणे टाळावे, याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याशिवाय ऑनलाइन फसवणूक, बनावट संकेतस्थळांच्या दुव्यांपासून सावध राहणे, ओटीपी फसवणूक, समाजमाध्यमांचा सुरक्षित वापर तसेच डिजिटल गोपनीयतेचे महत्त्व याबाबतही विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.

संवादात्मक पद्धतीने झालेल्या या सत्रात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध प्रश्न विचारले. प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून सायबर सुरक्षेचे महत्त्व प्रभावीपणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आले. कार्यक्रमासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक यांचे मार्गदर्शन लाभले. आयोजनासाठी बोचरे मॅडम यांनी विशेष सहकार्य केले. विद्यालयातील सर्व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी सुरक्षित डिजिटल सवयी अंगीकारून जबाबदार डिजिटल नागरिक बनावे, असे आवाहन करण्यात आले.

## जागतिक निसर्ग संरक्षण दिनाचे औचित्य : रोटरी क्लबच्या वतीने तोंडचीर येथे वृक्षारोपण



**उदगीर :** त भा वृत्तसेवा येथील रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलच्या वतीने जागतिक निसर्ग संरक्षण दिनाचे औचित्य साधून तथा रोटरी प्रांताच्या प्रथम महिला पारुल पटेल यांच्या वाढदिवसानिमित्त तोंडचीर ता. उदगीर येथे जि. प. प्राथमिक शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी तोंडचिरचे सरपंच सुदर्शन पाटील, रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलचे अध्यक्ष ॲड. विक्रम संकाये, उपाध्यक्ष विजयकुमार पारसेवार, सचिव डॉ. सुधीर जाधव, प्रोजेक्ट चेअरमन चंद्रकांत ममदापुरे, महानंदा सोनटक्के, प्रा. अन्नपूर्णा मुस्तादर, संतोष फुलारी, मोतीलाल डोईजोडे,निशांत धवलशंख, विक्रम हलकीकर, केंद्र प्रमुख केशव नरवटे, जि. प. शाळेच्या मुख्याध्यापिका व्ही. डी. बिरादार, जे. एम. कोले, एच. जी. नेलगे, आकाश तोंडचीरकर, विठ्ठल चामे, जे. एम. काळे, भालचंद्र पांचाळ,आदित्य कोयले, रोहित सूर्यवंशी,यांच्यासह शिक्षक, ग्रामस्थ उपस्थित होते.

## महादेवस्वामी मठ संस्थान, दैठणा येथे गुरुपौर्णिमा उत्सव हजारो भक्तांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न





**दैठणा, दि. २९ जुलै २०२६ :** दैठणा येथील प्राचीन व श्रद्धास्थान असलेल्या महादेवस्वामी मठ संस्थानात प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही गुरुपौर्णिमेचा पवित्र उत्सव अत्यंत भक्तिमय, शिस्तबद्ध आणि भव्य स्वरूपात संपन्न झाला. हजारो शिष्य, भाविक आणि भक्तांच्या उपस्थितीमुळे संपूर्ण मठ परिसर भक्तिरसाने ओथंबून गेला होता.

गुरुपौर्णिमेनिमित्त पहाटेपासूनच मठात विविध धार्मिक कार्यक्रमांना प्रारंभ झाला. गुरु पूजन, भजन, कीर्तन, नामस्मरण, प्रवचन तसेच भक्तांना अध्यात्म, संस्कार आणि सदाचाराचा संदेश देणारे मार्गदर्शनपर कार्यक्रम दिवसभर सुरू होते. गुरू-शिष्य परंपरेचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या या सोहळ्याने उपस्थित भाविकांना आध्यात्मिक ऊर्जा आणि प्रेरणा दिली. या उत्सवासाठी केवळ दैठणा गावातीलच नव्हे, तर परिसरातील तसेच दूरदूरच्या भागांतूनही महादेवस्वामी महाराजांचे शिष्यगण आणि महारुद्र स्वामी महाराजांचे शिष्यगण मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. विविध भागांतून आलेल्या भक्तांनी गुरूंचे दर्शन घेऊन आशीर्वाद प्राप्त केला. दिवसभर मठ परिसरात भक्तांची सतत वर्दळ सुरू होती.

दैठणा येथील हा गुरुपौर्णिमा उत्सव अनेक वर्षांची अखंड परंपरा जपत आजही त्याच श्रद्धा, भक्ती आणि उत्साहाने साजरा केला जात आहे. परिस्थिती कोणतीही असो, या धार्मिक परंपरेत आजपर्यंत कधीही खंड पडलेला नाही. त्यामुळे या उत्सवाला परिसरातील एक महत्त्वपूर्ण धार्मिक आणि सांस्कृतिक सोहळा म्हणून विशेष ओळख प्राप्त झाली आहे.

या भव्य कार्यक्रमाचे विनीत आयोजन महारुद्र महादेव स्वामी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. तर संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन, व्यवस्थापन, देखभाल आणि वाहतूक व्यवस्थेची जबाबदारी धनु महाराज महारुद्र स्वामी यांनी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने सांभाळली.

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी औसा यांचे कार्यालय**
(भुकंप विभाग)
**जाहीर प्रगटन**

जा.क्र.२०२६/भु.पु/कावि-१७७ दि.१९.०६.२०२६
विषयः- भुकंपग्रस्त प्रमाणपत्र बदलुन मिळणे बाबत..
संदर्भः- श्री. गुरुनाथ कोंडीबा शिंदे रा. कारला ता.औसा जि. लातूर यांचा अर्ज दि.०८.०६.२०२६

उपरोक्त विषयी संदर्भीय अर्जाच्या अनुषंगाने मौ. कारला ता. औसा येथील तमाम जनतेस कळविण्यात येते की, श्री. गुरुनाथ कोंडीबा शिंदे रा. कारला यांनी अर्ज सादर करुन यापुर्वी प्रथम वेळेस त्यांचा मुलगा नामे श्री. रामराव गुरुनाथ शिंदे रा. कारला यांचे नावे दिनांक २२.१२.१९९९ रोजी काढण्यात आलेले भूकंपग्रस्त प्रमाणपत्र बदलुन दुस-यांदा अर्जदार यांची मुलाची मुलगी नात कु. प्रियंका रामराव शिंदे रा. कारला यांचे नावे भूकंपग्रस्त प्रमाणपत्र बदलून मिळणे बाबत विनंती केलेली आहे.

तरी मौ. कवळी ता. औसा येथील भूकंपग्रस्त प्रमाणपत्र बदलून बाबत कोणाचे हरकत/अक्षेप असल्यास त्यांनी सदर जाहीर प्रगटन प्रसिध्दी झालेपासून १५ (पंधरा) दिवसाचे आत तहसील कार्यालय औसा येथे हजर राहून आपले आक्षेप/हरकत सार्वजनिक सुट्टीचे दिवस सोडुन कार्यालयीन वेळेत लेखी स्वरुपात नोंदविण्यात यावा.

उक्त कालावधीनंतर प्राप्त आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत. व उक्त प्रकरणात नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी. सदरील जाहीर प्रगटन आज दि. २५.०६.२०२६ रोजी माझे सही व शिक्यानिशी काढण्यात आलेले आहे.

नायब तहसीलदार मह/-१
तहसील कार्यालय, औसा

## गुरुपौर्णिमेनिमित्त आचोला बेटावर टोपली जत्रा उत्साहात; पर्यटनस्थळाचा दर्जा देण्याची ग्रामस्थांची मागणी



**देवणी प्रतिनिधी:-** तालुक्यातील आचोला गावालगत असलेल्या ऐतिहासिक आचोला बेटावर गुरुपौर्णिमेनिमित्त पारंपरिक टोपली जत्रा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. यावेळी धार्मिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक तसेच विविध क्रीडा आणि मनोरंजनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पंचक्रोशीतील भाविक आणि ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या परंपरेचा आनंद लुटला.

आचोला बेट हे परिसरातील ऐतिहासिक, धार्मिक आणि सांस्कृतिक वारसा लाभलेले ठिकाण म्हणून ओळखले जाते. अनेक दशकांपासून गुरुपौर्णिमेच्या दिवशी येथे टोपली जत्रेची परंपरा अखंडपणे जपली जात आहे. पूर्वी गावातील प्रत्येक कुटुंब आपल्या घरून टोपलीत भोजनाचे साहित्य घेऊन बेटावर येत असे. त्यानंतर सर्वांनी एकत्रितपणे सामुदायिक भोजन करून गावकऱ्यांमध्ये ऐक्य, बंधुभाव आणि सामाजिक सलोखा वृद्धिंगत केला जात असे. भोजनानंतर सांस्कृतिक, आध्यात्मिक, क्रीडा आणि विविध लोकपरंपरांशी निगडित कार्यक्रमांचे आयोजन केले जाई. आजही ही परंपरा ग्रामस्थांनी तेवढ्याच श्रद्धेने आणि उत्साहाने जतन करून ठेवली आहे.

पूर्वी या परिसरात भौतिक सुविधा अत्यंत मर्यादित होत्या. मात्र ग्रामस्थांच्या सहकार्य, श्रमदान आणि लोकसहभागातून बेटावर लक्षणीय विकास साधण्यात आला आहे. येथील प्राचीन अंबाबाई मंदिर, लक्ष्मी मंदिर तसेच बेटाच्या अग्रभागी असलेल्या महादेव मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला असून मंदिर परिसराचेही सुशोभीकरण करण्यात आले आहे. वर्षभरातील बाराही अमावस्यांना तसेच विविध धार्मिक उत्सवांच्या निमित्ताने येथे आध्यात्मिक कार्यक्रम मोठ्या भक्तिभावाने आयोजित केले जातात.

नैसर्गिक सौंदर्य, धार्मिक महत्त्व आणि सांस्कृतिक परंपरा यांचा संगम लाभलेले आचोला बेट हे आज परिसरातील श्रद्धास्थान बनले आहे. बेटापासून अगदी जवळ असलेले देरवाडी येथील प्रसिद्ध बालाजी मंदिरही या धार्मिक पर्यटनाला अधिक समृद्ध करणारे ठरत आहे.

आचोला बेटाचा धार्मिक, ऐतिहासिक आणि नैसर्गिक वारसा लक्षात घेता या ठिकाणाला पर्यटनस्थळाचा दर्जा द्यावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. स्थानिक आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी या ठिकाणच्या विकासाकडे विशेष लक्ष दिल्यास आचोला बेट धार्मिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्वाचे केंद्र म्हणून विकसित होऊ शकते, अशी अपेक्षा विद्यमान उपसरपंच नामदेव कारभारी यांनी व्यक्त केली.

## अग्रलेख

# पत्रकारितेतील आधारवड कोसळला

महाराष्ट्र शासनाच्या पहिल्या लोकमान्य टिळक पत्रकारिता जीवन गौरव सन्मानाचे मानकरी, तरुण भारतचे माजी मुख्य संपादक लक्ष्मणराव जोशी यांच्या निधनामुळे मागील पिढीतील माहितीचा कोष असलेला खंदा पत्रकार हरपला आहे. पत्रकारितेचा आधारवड कोसळला आहे. आपल्या आयुष्यातील जवळजवळ सात दशके त्यांनी पत्रकारितेत घालवली. त्यांच्या निधनाने सव्यसाची पत्रकारितेच्या एका युगाचा अस्त झाला आहे. वास्तविक लक्ष्मणरावांची पत्रकारिता सुरू झाली तेव्हाचा काळ हाताने बातम्या लिहिण्याचा होता. त्या कालखंडात उपसंपादक-वार्ताहर पदापासून प्रारंभ करत त्यांनी तरुण भारतचे मुख्य संपादकपद आणि तरुण भारतचे प्रकाशन करणाऱ्या श्री नरकेसरी प्रकाशन संस्थेचे प्रबंध संचालकपदही भूषविले होते. ते वयोमानाप्रमाणे निवृत्त झाले आणि त्यानंतर पत्रकारितेत संगणक युगाचा प्रारंभ झाला. पण निवृत्त झाल्यावरही लक्ष्मणरावांनी ज्या पद्धतीने या नवीन युगावर स्वतःची जबर मांड ठोकली, ते अनोखेच होते. निवृत्त झाल्यावर ते संगणकावर आणि मोबाईलवरही आपला मजकूर स्वतः टंकमुद्रित करून सर्वत्र पाठवित असत.

लक्ष्मणरावांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत करारी होते. पत्रकारितेच्या इतिहासात लक्ष्मणराव जोशींच्या नावाने एक घटना नोंदविली गेली आहे. ती अशी की, मनोरमा कांबळे प्रकरणात एका नेत्याने घेतलेली पत्रकार परिषद सर्व दैनिकांनी प्रकाशित केली. त्यात त्यांनी न्यायपालिकेला दोष दिला. ती बातमी प्रकाशित केल्याने कोर्टाचा अवमान झाल्याचा मुद्दा पुढे आला. त्या प्रकरणात त्या नेत्याने आणि इतर संपादकांनी माफी मागवून स्वतःला मोकळे करून घेतले. लक्ष्मणरावांनी मात्र वेगळी भूमिका घेतली. त्या नेत्याचे वक्तव्य आपण प्रकाशित केले यात आपला कोणताही दोष नाही, असे त्यांचे म्हणणे होते. अवमानाच्या प्रकरणात सत्य हा बचाव असू शकत नाही, या मुद्यावर कोर्ट उठेपर्यंत लक्ष्मणरावांना शिक्षा ठोठावण्यात आली आणि त्यांनी ती भोगली. असे होते लक्ष्मणराव!

लक्ष्मणराव मूळचे पाथर्डीचे. त्यांचे वडील त्र्यंबकराव भिक्षुकी करीत. त्यातूनच ते तेल्हारा येथे आले. तेल्हारा येथे त्यांचे शिक्षण झाले. खेडेगावातील भिक्षुकाच्या घरात त्या काळात अठरा विश्वे दारिद्र्याशिवाय काय असेल? लक्ष्मणरावांनी मॅट्रिक होईपर्यंत पायात चप्पलही घातली नव्हती. त्याच काळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे गारुड त्यांच्यावर झाले आणि ते स्वयंसेवक झाले. स्वयंसेवक, गटनायक, शिक्षक, मुख्य शिक्षक, कार्यवाह या विविध जबाबदाऱ्या सांभाळीत काम करू लागले. चांगली संधी मिळावी म्हणून ते अकोला येथे गेले आणि तेथील भिकमचंद खंडेलवाल विद्यालयात शिक्षक म्हणून काम करू लागले. काही काळाने संघ कार्याव्यतिरिक्त ते 'मातृभूमी' या दैनिकातही काम करू लागले. शांताराम सरदेशपांडे हे पत्रकारितेतील त्यांचे प्रारंभिक गुरू. अकोला येथे असताना त्यांनी संघाचे प्रथम आणि द्वितीय वर्ष पूर्ण केले होते. संघ व्यवस्थेतूनच ते नागपूरच्या तरुण भारतात उपसंपादक म्हणून रुजू झाले. नुकतेच लग्न झालेले लक्ष्मणराव परिवार घेऊन नागपुरात आले होते. त्यापूर्वी त्यांनी नागपूर बघितलेही नव्हते. साधी सायकल देखील त्यांच्याजवळ नव्हती. पण काही काळातच त्यांनी नागपुरात आपला जम बसविला. बर्डीवरील संगम चाळीत बाळासाहेब देवरस यांचे घर होते. तिथे प्रदीर्घकाळ त्यांचे वास्तव्य होते. पुढे ते तरुण भारताचे मुख्य वार्ताहर झाले आणि खाजगीरीत्या त्यांनी राज्यशास्त्रात एम.ए. केले. एका अभ्यासक्रमासाठी त्यांची निवड झाली आणि ते विकसनशील पत्रकारिता या विषयात प्रयोग करणारे विदर्भातले पहिले पत्रकार ठरले. पेंच प्रकल्पाचा बदलता चेहरामोहरा ही त्यांची मालिका महाराष्ट्रभर गाजली. एखाद्या प्रकल्पाच्या प्रारंभबिंदूपासून तो प्रकल्प पूर्णत्वाला जाईपर्यंत त्याचा पाठपुरावा करणे आणि ती मालिका पाच-सहा वर्षे चालविणे हे त्यांच्या विकासविषयक पत्रकारितेचे वैशिष्ट्य होते. विदर्भ-मराठवाड्यातील सिंचनाच्या विषयात ते तज्ज्ञ मानले जात. मा. गो. वैद्य आणि मामासाहेब घुमरे यासारख्या पत्रकारितेतील दोन दिग्गज गुरूंनी त्यांच्या पत्रकारितेला पैलू पाडले.

स्वभावाने लक्ष्मणराव जरासे शीघ्रकोपी होते. शांत झाल्यावर मात्र एखाद्या लहान मुलासारखा निरागस भाव त्यांच्या चेहऱ्यावर दिसे. आपली चूक झाली किंवा आपण एखाद्यावर उगाच रागावलो तर एखाद्या कनिष्ठ सहकाऱ्याचीही माफी मागायला त्यांना कधी कमीपणा वाटला नाही. वरिष्ठ म्हणून सहकाऱ्यांकडून काम करवून घेताना ते सहकाऱ्यांना पूर्ण मोकळेपणा देत असत. कुठेही वृत्त संकलनाला पाठवत, पण तो परत येईपर्यंत त्याची काळजी करीत असत. त्यांच्या काळात त्यांनी काँग्रेस, भाजपा या पक्षांची राष्ट्रीय अधिवेशने व महत्त्वाच्या घटना झाल्या तेथे वृत्त संकलनासाठी तरुण भारतच्या पत्रकारांना पाठविणे सुरू केले. भोपाळ गॅस कांड, पाटणा भूकंप, लातूर भूकंप, अयोध्या राम जन्मभूमी आंदोलन या ठिकाणी तरुण भारतचे प्रतिनिधी पाठविणे सुरू झाले. ते स्वतः आसाममधील विद्यार्थी आंदोलनाचा आढावा घ्यायला आसाममध्ये गेले होते. त्यामुळे अनेक आसामी विद्यार्थी नेत्यांशी त्यांचा घनिष्ठ संबंध होता. आसाम विद्यार्थी आंदोलनावरही त्यांनी पुस्तक लिहिले होते. पंजाबमधील अतिरेकी कारवायांबाबत त्यांनी वृत्तमालिका चालवली होती. तरुण भारतमध्ये काम करत असताना त्यांचा वनवासी कल्याण आश्रमाशी संबंध आला आणि त्यातून वन योगी हे बाळासाहेब देशपांडे यांच्यावरील त्यांचे पुस्तक साकार झाले.

सर्वांना बरोबर घेऊन चालणे हे त्यांना संघ स्वयंसेवक आणि शिक्षक असल्याने चांगले जमत होते. सर्व सहकाऱ्यांच्या घरी ते जात आणि त्यांच्या सुखदुःखात वाटेकरी होत. सहकाऱ्यांना पुढे होण्यासाठी प्रोत्साहन देत आणि कुणी चुकला तर त्याला पाठीशी घालून अपयश आणि दोष स्वतःकडे घेणे हेही त्यांच्या स्वभावाचे वैशिष्ट्य होते. जबाबदारी कोणतीही असो, कामात कमी न पडणे ही त्यांच्या कर्तृत्वशैलीची विशेषता होती. त्यामुळेच वसंत नगर पत्रकार कॉलनीत तरुण भारतमधील पाच-सहा जणांना घरे मिळाली. संघटक म्हणून त्यात त्यांचा मोठा वाटा होता. ते पत्रकार संघटनेचे काम करत आणि प्रत्येक आंदोलनात आघाडीवर असत. तरुण भारतचे वृत्तसंपादक असतानाही ते पडेल ती जबाबदारी स्वीकारत असत. त्यामुळेच ते वृत्त संपादक पदावरून थेट मुख्य संपादक आणि नंतर काही काळ प्रबंध संचालकही झालेत. तरुण भारतच्या मुख्य संपादकपदावरून निवृत्त झाल्यावर त्यांच्या जीवनातील दुसरी इनिंग सुरू झाली. 'गोमंतक' या वृत्तपत्राचे संपादक म्हणून ते काम करू लागले. पुढे त्यांनी 'गोवादूत'मध्ये काम केले. जवळजवळ १० वर्षे ते गोव्यात होते. त्यानंतर मुंबई तरुण भारत, जळगाव तरुण भारत येथे मुख्य संपादक म्हणून ते कार्यरत होते. जळगाव तरुण भारतमधून निवृत्त झाल्यावर त्यांना घरी बसवत नव्हते म्हणून त्यांनी 'लोकशाही वार्ता' या नव्या वृत्तपत्राच्या संपादकपदाची जबाबदारी स्वीकारली. या वृत्तपत्रात असतानाच त्यांचा ७५ वा वाढदिवस भव्य प्रमाणात साजरा झाला. वयाच्या ८० व्या वर्षानंतर त्यांनी वृत्तपत्रात सेवा देणे बंद केले. मात्र फेसबुक, ट्विटर या सर्व माध्यमांतून ते अगदी आत्तापर्यंत त्यांचे अस्तित्व जाणवायचे. रा. सू. गवई यांच्यावरील 'अजातशत्रू' या ग्रंथाचे संपादन करणाऱ्या संपादक मंडळात त्यांचा समावेश होता. तसेच 'पांचजन्य' या हिंदी साप्ताहिकातर्फे त्यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले होते. हा पुरस्कार त्यांना तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी आणि लालकृष्ण अडवाणी या दोन दिग्गजांच्या हस्ते भव्य समारंभात देण्यात आला होता.

कुठल्याही परिस्थितीत मनाची स्थिरता, संयम आणि सद्सद्विवेक कसा कायम राखावा हे त्यांच्याकडून शिकता येणारे होते. तर्कशुद्ध मांडणी हे त्यांच्या लिखाणाचे वैशिष्ट्य होते. कुठल्याही वयात नवीन माध्यम आपलेसे करून त्यात व्यक्त होण्याची वृत्ती होती. काळाबरोबर चालणारा, सम्यक दृष्टीचा मार्गदर्शक म्हणूनही नवीन पिढी त्यांना ओळखत असे. पत्रकारितेतील एक दीपस्तंभ आणि एक सबळ आधारवड नवीन पिढीला सोडून अनंताच्या प्रवासाला निघून गेला आहे. त्यांना तरुण भारत परिवार आणि श्री नरकेसरी प्रकाशनातर्फे भावपूर्ण आदरांजली. ■

## विशेष

# सागरी पायाभूत सुविधांचा नवा कणा

**प्रा. सुखदेव बखळे**

महाराष्ट्र हा देशाच्या औद्योगिक, आर्थिक आणि व्यापार क्षेत्राचा कणा मानला जातो. उद्योग, सेवा, माहिती-तंत्रज्ञान, कृषी प्रक्रिया, बंदरे आणि दळणवळणाच्या सुविधा यामुळे राज्याने देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान निर्माण केले आहे. आता या विकासाला आणखी वेग देण्यासाठी महाराष्ट्र सरकारने एक महत्त्वाकांक्षी संकल्पना पुढे आणली आहे. महाराष्ट्रातील 'जेएनपीटी' हे देशातील सर्वांत मोठे कंटेनर बंदर असून भारतातील सुमारे ६० टक्के कंटेनर वाहतूक या बंदरातून केली जाते. याशिवाय पालघर जिल्ह्यात विकसित होणारे वाढवण बंदर हे भविष्यात जगातील १० सर्वांत मोठ्या बंदरांपैकी एक ठरण्याची क्षमता बाळगते. या दोन्ही बंदरांना राज्यातील औद्योगिक पट्टे, ड्राय पोर्ट्स आणि समृद्धी महामार्गाशी रेल्वेद्वारे जोडल्यास निर्यात-आयात प्रक्रिया अधिक वेगवान आणि स्वस्त होईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकल्पामुळे हा खर्च सुमारे सात ते आठ टक्क्यांपर्यंत आणण्याचे लक्ष्य व्यक्त केले आहे. हे उद्दिष्ट साध्य झाले, तर महाराष्ट्रातील उद्योगांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मोठी स्पर्धात्मक ताकद मिळू शकते.

हा रेल्वे कॉरिडॉर समृद्धी महामार्गालगत उभारण्याचा विचार आहे. नागपूर ते मुंबई जोडणाऱ्या या महामार्गासाठी आधीच रेल्वेमार्गासाठी जागा राखीव ठेवण्यात आली आहे. त्यामुळे जमीन संपादनाचा प्रश्न मोठ्या प्रमाणात टाळता येईल. हा मार्ग जालना आणि वर्धा येथील ड्राय पोर्टसना जोडत गडचिरोलीपर्यंत विस्तारण्याचा विचार आहे. विशेषतः गडचिरोली जिल्हा खनिज संपत्तीने समृद्ध असून भविष्यात स्टील आणि खनिजाधारित उद्योगांचे मोठे केंद्र बनण्याची क्षमता आहे. त्यामुळे या भागातील औद्योगिक विकासाला नवे बळ मिळेल. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था देशातील सर्वांत मोठ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. राज्याचा देशाच्या सकल देशांतर्गत उत्पन्नात सुमारे १४ टक्के वाटा आहे, तर देशाच्या एकूण निर्यातीत जवळपास २० टक्के योगदान महाराष्ट्राचे आहे. ही आकडेवारी राज्याच्या औद्योगिक सामर्थ्याची साक्ष देते. इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन, वाहन उद्योग, औषधनिर्मिती, माहिती-तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान, वस्त्रोद्योग आणि सेवा क्षेत्रात महाराष्ट्राने उल्लेखनीय प्रगती केली आहे. महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन आणि डेटा सेंटर क्षेत्रातही वेगाने पुढे जात आहे. देशातील सुमारे ६० टक्के डेटा सेंटर क्षमता महाराष्ट्रात विकसित होत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), 'क्लाऊड कॉम्प्युटिंग', डिजिटल सेवा आणि फिनटेक क्षेत्रातील वाढ लक्षात घेता डेटा सेंटरचे महत्त्व अधिक वाढत आहे. त्यांनी मुंबई आणि पुणे या दोन शहरांना भारताचे 'क्वांटम व्हॅली' असे संबोधले. 'क्वांटम कॉम्प्युटिंग', कृत्रिम बुद्धिमत्ता, इलेक्ट्रॉनिक्स, संशोधन आणि नवोपक्रम यामध्ये ही दोन्ही शहरे विकसित होत असून प्रस्तावित हाय-स्पीड रेल्वे व इतर दळणवळण प्रकल्प पूर्ण झाल्यास मुंबई-पुणे हा देशातील सर्वांत मोठा तंत्रज्ञान आणि नवोपक्रम आर्थिक कॉरिडॉर ठरू शकतो.

मोठ्या उद्योगांकडे स्वतःची वाहतूक व्यवस्था असते; परंतु लहान उद्योगांना वाहतूक खर्चाचा मोठा फटका बसतो. बंदरांशी थेट रेल्वे संपर्क उपलब्ध झाल्यास त्यांचा खर्च कमी होईल आणि त्यांच्या उत्पादनांना जागतिक बाजारपेठेत स्पर्धा करण्याची संधी मिळेल. शेती आणि कृषी प्रक्रिया उद्योगांनाही या प्रकल्पाचा मोठा फायदा होईल. महाराष्ट्रात द्राक्षे, डाळिंब, संत्री, कांदा, ऊस, कापूस, सोयाबीन आणि इतर अनेक कृषी उत्पादने मोठ्या प्रमाणावर तयार होतात. ही उत्पादने कमी वेळेत बंदरांपर्यंत पोहोचल्यास निर्यात वाढू शकते. रस्ते वाहतुकीच्या तुलनेत रेल्वेमुळे इंधनाचा वापर कमी होतो, कार्बन उत्सर्जन घटते आणि रस्त्यांवरील वाहतुकीचा ताणही कमी होतो. त्यामुळे शाश्वत विकासाच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा ठरतो. अर्थात, एवढा मोठा प्रकल्प यशस्वी करण्यासाठी अनेक आव्हानेही आहेत. मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक, केंद्र आणि राज्य सरकारमधील समन्वय, रेल्वे मंत्रालयाचे सहकार्य, पर्यावरणीय मंजुरी, स्थानिक पायाभूत सुविधा आणि वेळेत प्रकल्प पूर्ण करणे या बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. महाराष्ट्राने यापूर्वी समृद्धी महामार्ग, मेट्रो प्रकल्प, किनारी रस्ते, नवीन विमानतळ, औद्योगिक कॉरिडॉर आणि विविध लॉजिस्टिक पार्क उभारून पायाभूत सुविधांच्या विकासात महत्त्वाची झेप घेतली आहे. प्रस्तावित रेल्वे मालवाहतूक कॉरिडॉर हा त्या विकासाचा पुढचा टप्पा ठरू शकतो.

या प्रकल्पामुळे राज्यातील औद्योगिक विकासाचा केंद्रबिंदू केवळ मुंबई-पुण्यापुरता मर्यादित न राहता विदर्भ, मराठवाडा आणि इतर भागांपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. या दिशेने सातत्याने पावले उचलल्यास अधिक परकीय गुंतवणूक आकर्षित होईल, रोजगारनिर्मिती वाढेल आणि राज्याच्या आर्थिक विकासाला नवी गती मिळेल. एकंदरीत, 'जेएनपीटी' आणि वाढवण बंदरांना समृद्धी महामार्गाशी जोडणारा प्रस्तावित रेल्वे मालवाहतूक कॉरिडॉर हा केवळ वाहतुकीचा प्रकल्प नाही, तर तो महाराष्ट्राच्या भविष्यातील औद्योगिक, आर्थिक आणि निर्यातक्षम विकासाचा पाया ठरू शकतो. बंदरे, महामार्ग, रेल्वे आणि औद्योगिक क्षेत्र यांची साखळी मजबूत झाली, तर महाराष्ट्र जागतिक पुरवठा साखळीतील एक महत्त्वाचे केंद्र म्हणून अधिक सक्षमपणे उदयास येईल. या प्रकल्पाची यशस्वी अंमलबजावणी झाली, तर 'विकसित महाराष्ट्र' आणि 'विकसित भारत' या संकल्पनांना प्रत्यक्ष बळ मिळेल. भारताच्या आर्थिक विकासाला गती देण्यासाठी आणि जागतिक व्यापारात देशाचे स्थान बळकट करण्यासाठी पायाभूत सुविधांचा विकास अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. गेल्या काही दशकांमध्ये भारताने रस्ते, रेल्वे आणि बंदरांच्या आधुनिकीकरणावर विशेष भर दिला आहे. याच मालिकेतील एक अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि 'गेम-चेंजर' प्रकल्प म्हणजे जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण (जेएनपीटी) आणि नियोजित वाढवण बंदर यांना जोडणारा स्वतंत्र रेल्वे मालवाहतूक कॉरिडॉर (डेडिकेटेड फ्रीट कॉरिडॉर).

महाराष्ट्राच्या सागरी किनाऱ्यावर आकाराला येत असलेला हा रेल्वे कॉरिडॉर केवळ दोन बंदरांना जोडणारा मार्ग नसून भारताच्या आयात-निर्यात क्षेत्राची कार्यक्षमता वाढवणारा, लॉजिस्टिक खर्च कमी करणारा आणि देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापाराला नवी दिशा देणारा एक महामार्ग ठरणार आहे. ■

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## श्रद्धांजली

**केतन पाठक**

# जीवनध्येय जगलेले लक्ष्मणराव!

गेल्या आठवड्यातच फोन आला. मला वाटले नेहमीसारखे कोणत्यातरी राजकीय विषयावर चर्चा करण्यासाठी असेल. पण, तिकडून लक्ष्मणरावांचा आवाज आला, 'मी गोव्यात अडकलो आहे आणि मला आता तुम्हीच बाहेर काढू शकता. तत्काळ गोवा पोलिसांना फोन करा आणि मला मदत करायला सांगा.' मी त्यांना लगेच तुमचे लोकेशन द्या, नेमक्या कोणत्या संकटात आहात, अशी विचारपूस केली. 'बाहेर खूप पाणी साचले आहे आणि आम्ही एका इमारतीत अडकलो आहोत...' लक्ष्मणराव सांगत होते. मला खरेच वाटले. कारण त्यादिवशी पाऊस खूप होता. आणखी विचारपूस केली, तर नागपूर विमानतळ आणि सहकारनगर असा उल्लेख ते करीत होते. मनात शंकेची पाल चुकचुकली. कारण, एक कणखर आणि बाणेदार आवाज ऐकण्याचीच लक्ष्मणरावांच्या बाबतीत सवय लागली होती. हललेले लक्ष्मणराव कधी ऐकलेच नाहीत. पण, नंतर लक्षात आले, आयुष्यात जगलेल्या एका मोठ्या कालखंडांची मेंदू वयाच्या नव्वदीत उजळणी करतो, तसेच काहीसे ते होते. ते संकटात नसल्याची खात्री करून घेतली आणि लगेच सुधीरजी पाठक यांना फोन केला. त्यांनी योग्य ती माहिती दिली.



मी १९ वर्षांचा असेन. लक्ष्मणरावांसोबत एका बैठकीत होतो. 'वाचकांच्या मनोगत'साठी काही पत्र त्यांच्या हाती दिली आणि त्यांनी लगेच 'तरुण भारता'त जॉईन होता का, अशी थेट विचारणा केली. पहिलीच भेट होती आणि थेट ही विचारणा! तेथून जे 'बाँडिंग' तयार झाले ते अगदी गेल्या आठवड्यापर्यंत कायम होते. साधारणतः ३५ वर्षांचा परिचय. मला पत्रकारितेत घडविणारी जी महनीय नावे, त्यातील लक्ष्मणराव हे अग्रणी. त्यांचा आशीर्वाद आजतागायत कायम पाठीशी राहिला. तो काळ फार गंभीर पत्रकारितेचा होता. तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांची पत्रपरिषद नागपूरच्या राजभवनात होणार होती. पंतप्रधानांची पत्रपरिषद कव्हर करायला कोण जाईल, यावर चक्क ऑफिसमध्ये मीटिंग झाली होती आणि ती संधी त्यांनी मला दिली.

आयुष्यात रागावले अनेकदा. पण, तितकेच प्रेमही केले... सतत चांगलेच झाले पाहिजे, हा आग्रह त्यांच्याकडूनच शिकायला मिळाला. खूप कठोर परिश्रम करून घेतले. पण, तितकेच चांगले शिकवलेही... जबाबदाऱ्या खूप टाकल्या; त्यातून कामात पक्के करत गेले. क्रिकेटवर प्रचंड प्रेम करायचे. रात्री २ वाजता मॅच संपली की आवर्जून बातमी कशी गेली पाहिजे, यावर फोन करून सांगायचे. पत्रकारितेव्यतिरिक्त क्रिकेट हा त्यांचा एकमेव व्यासंग होता. एकदा सामनाविरोधात त्यांनी लेख लिहिला, तेव्हा 'फायटिंग विथ टायगर' अशी 'आऊटलूक'ने त्यावेळी स्टोरी केली होती. मनोरमा कांबळे बलात्कार प्रकरणात जी ठाम भूमिका घेतली, तेव्हा आपल्या बातमीदारासाठी प्रसंगी कोर्टाच्या अवमानाची शिक्षाही भोगली. (बबनराव वाळके हे तेव्हा बातमीदार होते. आज तेही हयात नाहीत) अजूनही आठवते, प्रा. जोगेंद्र कवाडे सरांनी त्यांना मिरवणुकीतून ऑफिसपर्यंत आणले होते. गोसे खुर्दवर सातत्याने लिखाण केले. सातत्याने वाचनाचा आग्रह ते सतत करीत. त्यावेळी देशभरातील इंग्रजी वर्तमानपत्र ३-४ दिवसांनी नागपूरला यायचे. पण, त्याचे वाचन सक्तीचे असे.

लक्ष्मणराव हे खऱ्या अर्थाने पत्रकार घडविणारे विद्यापीठ होते. ग्रामीण भागातून त्यांनी कित्येकांना पत्रकारितेच्या मुख्य प्रवाहात आणले. पत्रकारिता आणि लेखन हेच जीवनध्येय असलेल्या आणि ते क्षणोक्षणी जगलेल्या एका महान तपस्वी व्यक्तिमत्त्वाला आज गुरुपौर्णिमेच्या आदल्या दिवशी आपण मुकलो.

लक्ष्मणरावांना भावपूर्ण श्रद्धांजली. ॐ शांति ■

(लेखक मुख्यमंत्र्यांचे ओएसडी आहेत)

## धर्म-संस्कृती

# शक्ती उपासनेचा पर्वकाळ 'नवरात्र'

**प्रा. दिलीप जोशी**

हिंदू धर्मात नवरात्राचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. देशाच्या पंतप्रधानापासून तर सामान्य देवी भक्त नवरात्रात आदिशक्तीची साधना व्रतस्थ राहून करतात. कोणी निर्जल, कोणी अनवानी, कोणी नक्त करून विविध हट साधना भक्त करतात. महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती त्रिगुणात्मिका जगदंबेची आर्त उपासना नऊ दिवस केली जाते. नवरात्र फक्त एकाच प्रकारात नसून हिंदू धर्मात चार प्रकारचे नवरात्र आहेत.

१) चैत्री नवरात्र २) आश्विन नवरात्र ३) माघी नवरात्र ४) आषाढी नवरात्र.

**१) चैत्री नवरात्र :** चैत्र महिन्यातील नवरात्राला चैत्री नवरात्र म्हणतात. हे नवरात्र वसंत ऋतूत येते म्हणून याला वासंतिक नवरात्र असेही म्हणतात. चैत्र शुद्ध प्रतिपदेला गुढी उभारून प्रारंभ होऊन श्रीराम नवमीला या नवरात्राचा समारोप असतो. चैत्र शुद्ध प्रतिपदेला गुढीपाडवा, वर्षप्रतिपदा असेही म्हणतात. भारतीय नववर्षाचा हा प्रथम दिन म्हणूनही साजरा केला जातो. गुढी पाडवा ते रामनवमी या नऊ दिवसांत शक्तीची उपासनाच प्रामुख्याने होते. श्रीराम आणि श्रीरामवरदायिनी दोन्हीचीही आराधना या नवरात्रात केली जाते.

**२) आश्विनी नवरात्र :** आश्विन महिन्यात येते म्हणून हे आश्विनी नवरात्र. हे नवरात्र शरद ऋतूत येते म्हणून शारदीय नवरात्र. आश्विन शुद्ध प्रतिपदेला घटस्थापनेने प्रारंभ होऊन आश्विन शुद्ध नवमी म्हणजे महानवमीला होमहवनाने शारदीय नवरात्रीची सांगता होते. याला लागूनच विजयादशमी म्हणजे दसरा असतो. भगवती महिषासुरमर्दिनी दुर्गेचे राक्षसासोबत नऊ दिवस-रात्र युद्ध चालले म्हणून हे नवरात्र. रावण वधापूर्वी भगवान श्रीरामांनी नऊ दिवस शक्तीची उपासना केली म्हणून नवरात्र साजरे केले जाते. हिंदू धर्मात वासंतिक आणि शारदीय या प्रमुख नवरात्रीसोबत अजून दोन प्रकारचे गुप्त नवरात्र असतात; जे फार प्रचलित नाहीत म्हणून सर्वांना ते फार ज्ञात नाहीत. या गुप्त नवरात्रात यंत्र, तंत्र आणि मंत्रांच्या समन्वयाने शक्तीची साधना केली जाते. दशमहाविद्याची साधना या नवरात्रात केली जाते. गुप्त नवरात्र पुढील प्रमाणे आहेत.

**३) माघी नवरात्र :** नवरात्रातील तिसरा प्रकार माघ शुद्ध प्रतिपदा ते माघ शुद्ध नवमी असतो. या गुप्त नवरात्रात प्रामुख्याने दशमहाविद्या पूजली जातात; ज्यात वल्गामुखी जिला आपण अपभ्रंशाने 'बगलामुखी' म्हणतो तिचे पूजन होते. शिवाय काली, छिन्नमस्ता, मातंगी, भैरवी यांचे तांत्रिक पूजन होते.

**४) आषाढी नवरात्र :** आषाढ शुद्ध प्रतिपदा ते आषाढ शुद्ध नवमी या काळात शाक्त उपासक गुप्त साधना करतात. यात दशमहाविद्यातील तारा, षोडशी, भुवनेश्वरी, धुमावती आणि कमला यांची तंत्र पूजा होते.

असे नवरात्रीचे चार प्रकार असले, तरी आश्विनी नवरात्र देशभर उत्साहात साजरे होते. महाराष्ट्रातही शारदीय नवरात्रीला सर्वत्र महत्त्व दिले जाते. म्हणून त्याचाच विचार आज आपण करू. या नवरात्रात नऊ दिवसांचे आपापले महत्त्व आहे.

**१) आश्विन शुद्ध प्रतिपदा :** नवरात्रीच्या या पहिल्या दिवसाला घटस्थापना म्हणतात. या दिवशी घट म्हणजे मातीच्या घड्याची (सुगडे, मडके, कुंभ) स्थापना केली जाते. देवासमोर काळी माती पसरवून त्यावर गहू आदी धान्य टाकले जाते. त्यावर जलाने भरलेला घट ठेवला जातो. त्यावर मातीचेच पूर्णपात्र ठेवले जाते. त्यातही धान्य वाण टाकले जाते. ज्वारीच्या पाच धांड्याची खोपडी असते. घरात ठेवलेल्या वाणाची उपजाऊ क्षमता मोजण्याचे हे विज्ञान आहे. याच घटावर रोज एक पुष्पांची माळ ठेवतात. पहिली माळ, दुसरी माळ असा गणनक्रम त्या तिथीनुसार असतो. घटस्थापना आपल्याला घरी जमत नसेल तर देवीच्या मंदिरातील घट दर्शन रोज करावे. घरी शैलपुत्रीचे ध्यान करून सायंकाळी आरती करावी.

**२) आश्विन शुद्ध द्वितीया :** नवरात्रीचा दुसरा दिवस. या दिवशी चौसष्ठ योगिनींचे पूजन केले जाते. कारण या दिवशी ६४ योगिनी एकत्र येऊन भगवतीचा उदोकार करतात. परशुरामाची जननी श्रीरेणुका मातेचे मळवट त्या भरतात अशी धारणा आहे. आपल्या घरी ब्रह्मचारिणी दुर्गेचे स्मरण करावे.

**३) आश्विन शुद्ध तृतीया :** तृतीयेच्या दिवशी अष्टभूजा नारायणीचे पूजन पातळ, मळवट आणि शृंगार करून करतात. या दिवशी घरी आरतीच्या वेळी चंद्रघंटा दुर्गेचे स्मरण करावे.

**४) आश्विन शुद्ध चतुर्थी :** चौथी माळ असलेल्या या दिवशी विश्वव्यापी आद्याशक्ती अनुपम स्वरूपात असते. ती मुक्तहस्ते कृपेची उधळण करते म्हणून या दिवशी सर्व देव तिला लोटांगण घालत येतात. याच दिवशी गणपतीसह कूष्मांडा दुर्गेचे स्मरण करावे.

**५) आश्विन शुद्ध पंचमी :** या दिवसाला ललिता पंचमी असेही म्हणतात. उपांग ललितेचे पूजन, महात्रिपुरसुंदरीचे ललिता सहस्त्रनाम अर्चनेने पूजन, घारी-खिरीचा नैवेद्य आणि गायनाने दुर्गापूजन केले जाते. रात्री जागरण, देवीची कथा, भजन केले जाते. घरी धूप दीप नैवेद्यासह स्कंदमाता दुर्गेचे चिंतन करावे.

**६) आश्विन शुद्ध षष्ठी :** सहाव्या माळेला कवड्याची माळ घालून हातात दिवट्या घेऊन आईचा गोंधळ घातला जातो. जोगवा मागण्याचा सर्वोत्तम दिवस हाच आहे. या दिवशी कात्यायनी दुर्गेचे ध्यान करावे.

**७) आश्विन शुद्ध सप्तमी :** सप्तमीला सप्तशृंगी गडावर पूजन केले जाते. फुलांचा शृंगार केला जातो. संकटात धावून येणाऱ्या दुर्गेची मनोभावे आराधना केली जाते. या दिवशी कालरात्री दुर्गेचे स्मरण करावे.

**८) आश्विन शुद्ध अष्टमी :** अष्टभूजा नारायणीचे पूजन केले जाते. या दिवशी कुमारिका पूजन असते. लहान मुलींना दुर्गा रूपात पाद्यपूजन करून यथाशक्ती वस्त्रालंकार आणि सात्त्विक भोजन दिले जाते. अष्टमीला उपवास करण्याचीही पद्धत आहे. या दिवशी श्री दुर्गा महागौरीचे ध्यान करावे.

**९) आश्विन शुद्ध नवमी :** नवरात्राची सांगता होते. या दिवशी होमहवन होते. या तिथीला महानवमी असेही म्हणतात. या दिवशी सिद्धिदात्री दुर्गेचे पूजन करावे.

नवरात्रात प्रत्येक तिथीचे महत्त्व आहे. त्यातील सर्व आपल्याला जमेलच असे नाही. असले तरी आपण नवरात्रात व्रतस्थ राहून दररोज किमान सकाळी घटाला माळ घालून पूजन आणि सायंकाळी सामूहिक आरती, भजन, पूजन केल्यास त्रिगुणात्मिका जगदंबा कृपेचा वर्षाव निश्चित करते. आपण केवळ एखादी कवडी म्हणजे यथाशक्ती अर्पण केले तर ती रत्न मण्यांचे हार म्हणजे भरभरून ऐश्वर्य आपल्याला देते. म्हणूनच-

**'जगदंब जगदंब ऐसे म्हणावे देहातित होवोनी जावे**
**स्वानंद साम्राज्य भोगावे समाधिस्थितीत ।'** ■

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### शिक्षकांचे शिक्षक

शिक्षकांचे शिक्षक म्हणजे मुख्याध्यापक. शाळेचे प्रमुख. विद्यार्थ्यांना शिस्त लावण्याबरोबरच शाळेतील शिक्षकांना प्रोत्साहन देणे, त्यांच्याकडून अपेक्षित परिणाम देणारे शिक्षण विद्यार्थ्यांना देणे, शिक्षकांच्या अडचणीत शिक्षकांच्या पाठीशी उभे राहणे. घरातील कर्ता जसे घरातील सर्वांना समान वागणूक देतो तसेच मुख्याध्यापकांनी वर्तन करणे आवश्यक असते. कोणत्या शिक्षकाला कोणते काम आवडते त्याप्रमाणे ती जबाबदारी त्या शिक्षकांवर सोपवणे हे समजण्याची कला मुख्याध्यापकांना अवगत असली तर त्या शाळेतील कामकाज उत्तम होते. प्रत्येक शिक्षकाकडे सर्वच गुण असतील असे नाही तर त्या शिक्षकातील गुण ओळखून ते काम शिक्षकाला दिले तर तो शिक्षक आनंदाने ते काम करतो. शाळा चालवणे ही सांघिक जबाबदारी असते. प्रशासकीय जबाबदारी, शैक्षणिक कामगिरी, शाळेचा निकाल, शाळेतील स्वच्छता, विविध प्रशिक्षणे, शाळाबाह्य कामे, शाळेतील शिस्त याचबरोबर शाळेतील वातावरण कसे चांगले राहील यासाठी मुख्याध्यापकांवर जबाबदारी असते. शाळेचे नाव मोठे कसे होईल यासाठी मुख्याध्यापकांना चतुरस्त्र लक्ष ठेवावे लागते. आदर्श मुख्याध्यापक अशी सर्व कामे आनंदाने करीत असतात. मुख्याध्यापक एका अर्थाने गुरूंचेगुरू असतात. गुरुपौर्णिमेनिमित्त वंदन.

**सुदाम विश्वे**/पुणे।९८६०५८६१४७

■■■

### संपूर्ण सुविधांशिवाय 'फ्लॅट'ची नोंदणी नाही

मंगळवारच्या तरुण भारतात उपरोक्त बातमी वाचण्यात आली. महानगराच्या विस्तारात उंच इमारती व 'फ्लॅट' योजनांना दिलेल्या परवानगीच्या अटींची पूर्तता न करताच भोगवटा प्रमाणपत्र दिली जात असल्याचे समोर आल्यावर पालकमंत्री तथा महसूलमंत्री यांनी मोठा निर्णय घेतला. जोपर्यंत सर्व सुविधांची पडताळणी होत नाही, तोपर्यंत कोणत्याही फ्लॅटची नोंदणी करू नये, असे आदेश त्यांनी जिल्हा उपनिबंधकांना दिले. तथापि, काही बिल्डर्सनी उपरोक्त सुविधा दिल्यानंतरही त्यांना ऑक्यूपेशन सर्टिफिकेट मिळण्यास का विलंब होतो, याचाही विचार होणे आवश्यक आहे. मनपाकडून भोगवटा प्रमाणपत्र न मिळाल्याने फ्लॅटच्या नोंदणीला उशीर होत आहे. सबब, ज्या बिल्डर्सनी उपलब्ध सुविधांची पूर्तता केली आहे त्यांना मनपाने लवकरात लवकर भोगवटा प्रमाणपत्र उपलब्ध करून द्यावे, ही विनंती.

**शशिकांत दलाल**/नागपूर।९८२२३६५१९०

■■■

### गुरूंचे माहात्म्य

**'गुरुर्ब्रह्माः गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वराः ।**
**गुरुः साक्षात परब्रह्म तस्मै श्री गुरुवे नमः ।।'**


आज गुरुपौर्णिमा. गुरुपूजनाचा दिवस. आपल्या जीवनात आपल्या गुरूंना अनन्यसाधारण महत्त्व आहे. संकटांवर मात करण्यासाठी आणि आध्यात्मिक शांतता मिळविण्यासाठी गुरूंचे मार्गदर्शन अत्यंत आवश्यक असते. व्यास ऋषींनी लोकांना वेदाचे ज्ञान दिले. ते आपले आद्यगुरू आहेत. अध्यात्मात ईश्वर प्राप्ती करायची असेल तर गुरूंशिवाय पर्याय नाही. कुठलेही ज्ञान घ्यायचे असेल तर गुरूचे मार्गदर्शन आवश्यक असते. त्याशिवाय कुठलेही ज्ञान योग्यरीत्या आपण प्राप्त करू शकत नाही. कारण गुरू म्हणजे ईश्वराचे साक्षात सगुण रूप असते. अशा आपल्या गुरूंना कोटी कोटी प्रणाम!

**अपर्णा अग्निहोत्री**/नागपूर.

■■■

### जीवन जगण्याची योग्य दृष्टी देणारे गुरू

एक महात्मा आपल्या दोन शिष्यांची परीक्षा घेतात. दोघांनाही एक फळ देऊन आज्ञा देतात- 'जिथे तुम्हाला पाहणारे कोणीच नसेल, अशा ठिकाणी जाऊन हे फळ खा.' एक शिष्य खोली बंद करून फळ खातो; परंतु दुसरा शिष्य खूप जागा शोधतो. अखेर फळ घेऊन परत येतो. तो म्हणतो, 'गुरुदेव, मला अशी जागाच सापडली नाही. कारण देव सर्वत्र आहे. मी कुठेही गेलो, तरी देव मला पाहत होता तसेच माझ्या मनात तुम्ही आहात त्यामुळे माझ्या प्रत्येक कृतीकडे, विचाराकडे तुमचे लक्ष आहे, असे मला जाणवले.' हीच खरी गुरुकृपा आणि गुरूंच्या शिकवणीचे सार आहे. गुरूंचे ज्ञान केवळ ऐकून उपयोग होत नाही, ते आचरणात उतरवले की जीवनाला दिशा देते. गुरू शिष्याला पुस्तकी विद्या देत नाहीत तर त्याचे अंतर्मन जागृत करतात. ते प्रत्येक कृतीत ईश्वराचे अस्तित्व अनुभवायला शिकवतात. आजच्या धावपळीच्या जीवनात माणूस देवाला मंदिरापुरता मर्यादित समजतो; पण गुरू शिकवतात की देव प्रत्येक जीवात, प्रत्येक क्षणात आणि प्रत्येक कृतीत आहे. ही अनुभूती ज्याला येते, त्याचे जीवनच बदलते. गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने आपणही गुरूंच्या शिकवणीचे केवळ श्रवण न करता ती आचरणात आणण्याचा संकल्प करूया. ■



**प्रांजली ब्रह्मे**/नागपूर

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादकः प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## विश्लेषण

**प्रणयकुमार**

# ‘भारतबोध’; संस्कृतीचा अखंड प्रवाह

> **भारताची ओळख ही केवळ राजकीय नाही. तर या राष्ट्राचे आध्यात्मिक, सांस्कृतिक, सामाजिक पैलू देखील तेवढेच महत्त्वाचे आहेत. भारतीय संस्कृतीतील चिरंतन मूल्ये आणि ज्ञान परंपरा एकत्रितपणे ‘भारतबोधा’च्या संकल्पनेला आकार देतात. ‘भारतबोध’ ही अशी चेतना आहे जी समाज, ज्ञान आणि धर्म यांच्या विशिष्ट आकलनाद्वारे राष्ट्राचा भूतकाळ, वर्तमान काळ आणि भविष्य काळ यांना जोडते.**

अलीकडच्या काळात ‘भारतबोध’ या संकल्पनेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. तरीही, सर्वप्रथम हा प्रश्न उपस्थित होतो की ‘भारत’ म्हणजे नक्की काय? तो केवळ एक भौगोलिक प्रदेश, राजकीय घटक किंवा सार्वभौम राष्ट्र-राज्य आहे का? की त्यात अशी काही वैशिष्ट्ये आहेत जी हिमालया-पासून हिंद महासागरापर्यंतच्या या विशाल भूभागाला एका सजीव समाजाच्या आणि सनातन राष्ट्राच्या रूपात घडवतात? पाश्चात्त्य जगात राष्ट्र ही संकल्पना प्रामुख्याने ‘राज्य-केंद्रित’ (स्टेट सेंट्रिक) आहे. याउलट, ‘राष्ट्रा’ची भारतीय संकल्पना ही राजकीय नसून सभ्यताविषयक आणि सांस्कृतिक आहे. भारत ही वैदिक ऋषींची पवित्र भूमी आहे. एक अशी संस्कृती जी आध्यात्मिकता, ज्ञान आणि सत्य यांना समर्पित आहे.



यामुळे आणखी एक प्रश्न निर्माण होतोः प्रत्येक भारतीयाला भारताचे मर्म, भारताचे मूळ स्वरूप खरोखरच समजले आहे का? केवळ मतदानाचा अधिकार असणे हाच भारताची ओळख, मूल्ये आणि राष्ट्रीय चेतना समजल्याचा पुरावा मानला जाऊ शकतो का? प्रत्येक भारतीय, भारताकडे ‘मातृभूमी’ आणि ‘पुण्यभूमी’ अशा दोन्ही दृष्टिकोनांतून पाहतो का आणि भारताच्या, भारतीयांच्या सुख-दुःखांशी, तसेच यशापयशाशी स्वतःला जोडून घेतो का? जर तसे नसेल, तर ती ‘भारतबोधा’ची कमतरता मानली जाऊ नये का? वास्तविक पाहता, भारताची समज असणे, भारताविषयी सखोल ज्ञान असणे हे अपरिहार्यपणे ‘भारतबोधा’कडे घेऊन जाते.

ढोबळमानाने विचार करता, यासंदर्भात दोन दृष्टिकोन आढळतात. एका दृष्टिकोनानुसार, भारताचे अस्तित्व १९४७ मध्ये निर्माण झाले आणि राष्ट्रनिर्मिती ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. दुसरा दृष्टिकोन असे मानतो की, जरी भारताला १९४७ मध्ये राजकीय स्वातंत्र्य मिळाले असले, तरी त्याचे संस्कृती विषयक अस्तित्व हजारो वर्षे जुने आहे. वारंवार झालेली आक्रमणे आणि विविध बाह्य प्रभावांना आत्मसात (परधर्मातील विविध बाबी) करूनही भारताने आपले मूळ सांस्कृतिक स्वरूप आणि आध्यात्मिक गाभा कधीच गमावला नाही. हा अखंड संस्कृतीविषयक प्रवाह म्हणजेच ‘भारतबोध’ होय. भारताचे व्यापक, सर्वसमावेशक स्वरूप समजून घेण्यासाठी सर्वप्रथम या देशाची सांस्कृतिक ओळख समजून घेण्याची आवश्यकता आहे, जिला बर्यादचा ‘सनातन संस्कृती’, ‘हिंदू विश्व-दृष्टिकोन किंवा ‘हिंदुत्व’ असे संबोधले जाते. जरी त्याच्या ऐतिहासिक उगम आणि उत्क्रांतीबद्दल दीर्घकाळ चर्चा आणि वाद होत असले, तरी ‘हिंदुत्व’ ही संकल्पना भारताच्या संस्कृतीविषयक चेतनेला व्यापकपणे व्यक्त करते आणि खर्या ‘भारतबोधा’चा पाया रचते.

या संकल्पनेविषयी अनेक गैरसमज आहेत. एक सामान्य दावा असा केला जातो की ‘हिंदू’ हा शब्द परकीय आक्रमकांनी रूढ केला. मात्र, ऐतिहासिक, ग्रंथविषयक आणि भाषिक पुरावे असे दर्शवतात की प्राचीन भारतीय स्त्रोतांमध्येही तत्सम शब्द अस्तित्वात होते आणि हा शब्द भारतातून पर्शियामध्ये गेला, उलट क्रमाने नाही. मुळात, हिंदुत्व ही ‘सनातन धर्मा’ची अभिव्यक्ती आहे. असा धर्म जो शाश्वत आहे आणि बदलत्या ऐतिहासिक परिस्थितीतही सुसंगत आहे, त्याची प्रासंगिकता नष्ट झालेली नाही. हे गैरसमज प्रामुख्याने इतिहासातून निर्माण झाले आहेत. एका सहस्त्रकाहून अधिक काळ भारतीय समाजाला वारंवार होणार्या परकीय आक्रमणांचा आणि सांस्कृतिक आव्हानांचा सामना करावा लागला. तरीही, भारताचा भूतकाळ हा केवळ परकीय वर्चस्वाचाच नव्हे, तर प्रतिकार, जिद्द, नवचैतन्य आणि पुनर्निर्माणाचाही इतिहास आहे. शतकानुशतके चाललेला इस्लामी विस्तारवाद आणि वसाहतवादी राजवट असूनही भारतीय संस्कृतीने आपली ओळख, सातत्य आणि मूल्ये प्राणपणाने जपली.

स्वातंत्र्यानंतर, भारताने त्याच्या संस्कृतीला, वारशाला अनुसरून मार्गक्रमण केले नाही. राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यावर स्वदेशी आचार-विचारांमध्ये रुजलेल्या संस्थांचे जतन, पुनरुत्थान करणे अपेक्षित होते. पण तरीही तसे घडले नाही. पाश्चात्त्यांचा मोठा प्रभाव असलेले राज्यकर्ते वसाहतवादी मानसिकतेतून, त्यांनी आखलेल्या बौद्धिक चौकटीतून बाहेर पडलेच नाहीत. सत्तेच्या हस्तां-तरणानंतरही आमच्या राज्यकर्त्यांमध्ये ‘स्व’ ची धारणा, ‘स्व’बोध राहिला नाही. शासन यंत्रणा तसेच शिक्षण व सांस्कृतिक तसेच बौद्धिक क्षेत्रात इंग्रजाळलेल्या लोकांचाच वरचष्मा राहिला. पाश्चात्यांनी मांडलेल्या संकल्पनांचे, गृहीतकांचे आमच्या राज्यकर्त्यांनी, इंग्रजाळलेल्या नोकर-शहांनी निव्वळ अनुकरण केले. यामुळे अर्थातच वैचारिक व बौद्धिक क्षेत्रात पाश्चिमात्य विचारांचाच पगडा कायम राहिला. या सर्व क्षेत्रांत भारतीय विचारांना थारा दिला नाही. परिणामी एकामागोमाग पिढ्या त्यांच्या सांस्कृतिक मुळांपासून दूर गेल्या. एवढेच नव्हे तर आधुनिकीकरण म्हणजेच पाश्चात्यीकरण या कल्पनेला बळकटी मिळाली. या बदलामुळे विकास, सौंदर्यशास्त्र आणि उत्कृष्टतेच्या स्थानिक संकल्पनांकडे हळूहळू दुर्लक्ष करण्यात आले, त्यांची उपेक्षा करण्यात आली. ध्यान, योग आणि पारंपरिक योग पद्धतींना पाश्चिमात्य देशांत मान्यता मिळाल्यानंतरच या गोष्टींना भारतामध्ये व्यापक मान्यता मिळाली. त्याचप्रमाणे, आजही आयुर्वेदाकडे आधुनिक वैद्यकशा-स्त्राप्रमाणे समानतेच्या दृष्टिकोनातून पाहिले जात नाही. तर खगोलशास्त्र आणि कालगणनेच्या परंपरांना वारंवार धार्मिक अनुष्ठानांच्या चौकटीतच बंदिस्त केले जाते.

भारताची वास्तुकला, शहरी नियोजन, वारसा संवर्धन-संरक्षण आणि सौंदर्यविषयक तत्त्वज्ञानाच्या परंपरा अत्यंत समृद्ध आहेत. तरीही पाश्चिमात्यांचे अविवेकी अनुकरण केल्याने अनेकदा सांस्कृतिक सरलीकरण आणि एकरूपी-करण (एकसंधता) निर्माण झाले आहे. त्याचप्रमाणे, भारताच्या पारंपरिक खाण्याच्या (खान-पान) सवयी, जीवनशैली, सामाजिक रीति-रिवाज आणि नैतिक प्रथा-पद्धती पर्यावरणीय चेतना आणि निसर्गाशी सुसंगतता दर्शवितात. पण भारताने स्वतःच्या दीर्घकालीन परंपरा असूनही अनेकदा टिकाऊपणाच्या मॉडेल्सकडे लक्ष दिले आहे. अशाप्रकारच्या घडामोडींमुळे भारत, भारतीयता आणि भारतीय ज्ञान प्रणालीबद्दल गैरसमज निर्माण झाले. ‘भारतबोधा’चा अभाव हा याच संस्कृतीविषयक स्मृतिभ्रंशाचा परिणाम आहे. जेव्हा एखादा समाजाला त्याच्या ‘स्व’चा (आंतरिक स्व), स्वत्वाचा (स्व-ओळख) आणि सांस्कृतिक मुळांचा विसर पडतो तेव्हा वैचारिक गोंधळ, संभ्रम, हीनता (न्यूनगंड) आणि आत्म-संशय उत्पन्न होतो. त्यामुळे या गैरसमजांवर मात करणे आणि संस्कृतीविषयक आत्मविश्वास पुन्हा प्राप्त करणे हे भारतबोध आणि भारतीय ज्ञान प्रणालीचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

### भारतबोधाचे सार

या दृष्टिकोनातून पाहता, ‘भारतबोध’ हा भारतीय ज्ञानपरंपरेचा (भारतीय नॉलेज सिस्टीम) सांस्कृतिक व सभ्यताविषयक पाया आहे, तर ती ज्ञानपरंपरा हे त्याचे बौद्धिक, आध्यात्मिक आणि व्यावहारिक प्रकटीकरण आहे. प्राचीन भारतातील ऋषीमुनींनी ज्ञानाकडे आत्मसा-क्षात्कार, आत्मानुभूती, सामाजिक कल्याण आणि विश्वकल्याण यांचे साधन म्हणून पाहिले. ज्ञानाचा उद्देश निसर्गावर वर्चस्व गाजवणे किंवा संकुचित स्वार्थ साधणे हा नसून, व्यक्ती, समाज, प्रकृती (निसर्ग) आणि परम सत्य यांच्यातील परस्परसंबंधांची जाणीव करून घेणे हा होता. आधुनिक पाश्चात्त्य परंपरेत ज्ञानाला अनेकदा सत्तेशी जोडले गेले असले, तरी भारतीय परंपरेने ज्ञानाकडे अंतर्बाह्य शुद्धी, आत्म-परिवर्तन आणि उच्च सत्याच्या प्राप्तीचे साधन म्हणून पाहिले आहे.

भारतीय ज्ञानप्रणालीचे, परंपरेचे मूळ तत्त्व म्हणजे ‘एकात्मते’ची (सर्वत्र एकत्व, एकच तत्त्व (ब्रह्म) असण्याची दृष्टी; ही दृष्टी वेद, उपनिषदे, दर्शने, पुराणे आणि महान महाकाव्यांमध्ये व्यक्त झाली आहे. भारतीय तत्त्वज्ञान, भारतीय विचार विश्वाकडे एक अखंड आणि परस्पर-संबंधित वास्तव म्हणून पाहते, ज्यामध्ये अध्यात्म, तत्त्वज्ञान, योग, आयुर्वेद, गणित, खगोलशास्त्र, व्याकरण, साहित्य आणि कला या ज्ञानाच्या परस्पर-संबंधित शाखा म्हणून विकसित झाल्या आहेत. त्यानुसार, ज्ञान, वैज्ञानिक जिज्ञासा, सत्ता आणि अधिकार यांच्यासोबतच नम्रता, शहाणपण, संयम आणि कर्तव्यभावना यांचेही जतन केले जाते; कारण नैतिक जबाबदारीशिवाय ज्ञान अपूर्ण असते, हे यात मान्य केले गेले आहे.

भारतीय विचारसरणीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ‘अंतिम सत्याचा शोध’ कधीही एका विशिष्ट धर्म-ग्रंथापुरता, व्यक्तीपुरता किंवा सिद्धांतापुरता मर्यादित ठेवला गेला नाही. शोध, जिज्ञासा, तर्क, संवाद, प्रत्यक्ष व्यावहारिक अनुभव आणि आध्यात्मिक साक्षात्कार या सर्वांना सत्यापर्यंत पोहोचण्याचे सुयोग्य मार्ग मानले गेले आहे. ‘आ नो भद्राः क्रतवो यन्तु विश्वतः’ (चांगले, शुभ विचार सर्व दिशांनी आमच्याकडे येवोत) या वैदिक मंत्रात बौद्धिक मोकळेपणाची हीच भावना दिसून येते. यामुळेच भारताला सांस्कृतिक एकता टिकवून ठेवतानाच उल्लेखनीय ताात्विवक विविधता जोपासता आली आणि मतभेद अथवा विविधतेकडे संघर्षाचे कारण म्हणून न पाहता संवादाची संधी म्हणून पाहता आले.

हिंदू विश्वदृष्टीनुसार, प्रत्येक व्यक्ती, कुटुंब, समाज, राष्ट्र, मानवजात आणि संपूर्ण विश्व (ब्रह्मांड) यांच्याशी स्वाभाविकपणे (अविभाज्यपणे) जोडलेली असते. ‘आत्मा’ आणि ‘परमात्मा’ ही एकाच वैश्विक चेतनेची रूपे आहेत, असे ऋषीमुनींनी मानले. ‘सर्वं खल्विदं ब्रह्म’ (हे सर्व काही ब्रह्मच आहे), ‘यत् पिण्डे तत् ब्रह्माण्डे’ (जे पिंडात - म्हणजेच सूक्ष्म शरीरात - आहे, तेच ब्रह्मांडात आहे) आणि ‘आत्मवत् सर्वभूतेषु’ (सर्व प्राणि-मात्रांकडे आत्मदृष्टीने पहावे) या महावाक्यांमध्ये हा विचार प्रतिबिंबित होतो. ही वाक्ये अस्तित्वाचे ऐक्य आणि मानवी जीवनाचे अंतिम उद्दिष्ट अधोरेखित करतात. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चार पुरुषार्थांची भारतीय संकल्पना याच एकात्मिक जीवनदृष्टीवर आधारलेली आहे. यात जीवनाच्या भौतिक आणि आध्यात्मिक पैलूंना समान महत्त्व दिले आहे. जिथे ‘अर्थ’ आणि ‘काम’ यांची प्राप्ती ‘धर्मा’च्या नैतिक चौकटीत राहून केली जाते, तर ‘मोक्ष’ हा आत्मसाक्षात्कार आणि अस्तित्वाशी पूर्ण तादात्म्य दर्शवतो. त्याचप्रमाणे, स्त्री आणि पुरुष यांना एक-मेकांपेक्षा श्रेष्ठ-कनिष्ठ न मानता परस्परांचे पूरक मानले जाते. अशा प्रकारे, भारतीय ज्ञानप्रणाली केवळ ज्ञानाचा संग्रह नसून ती जीवनाकडे पाहण्याचा एक समग्र दृष्टिकोन मांडते.



‘भारतबोध’ समजून घेण्यासाठी ‘धर्म’ या भारतीय संकल्पनेचे आकलन होणे तितकेच आवश्यक आहे. धर्म म्हणजे केवळ एखादा विशिष्ट पंथ किंवा उपासना पद्धती नव्हे, तर ते जीवन, समाज, निसर्ग आणि विश्वाचा क्रम (ब्रह्मांड व्यवस्था) यांना धारण करणारे व आधार देणारे तत्त्व आहे. ‘धारयति इति धर्मः’ (जे धारण करते, ते धर्म) अशी धर्माची व्याख्या करण्यात आली आहे. या उक्तीप्र-माणेच, यात कर्तव्य, नैतिक जबाबदारी आणि सदाचरण यांचा समावेश होतो. त्याचप्रमाणे, ‘नेति, नेति’ आणि ‘चरैवेति, चरैवेति’ ही वचने सत्याचा शोध आणि आत्म-साक्षात्कार याच्याशी संबंधित आहेत. अशाप्रकारे समान उद्दिष्टांनी जोडलेल्या विविध ताात्विवक परंपरांचे जतन व संवर्धन भारताने केले आहे.

भारतीय दृष्टिकोनातून, मानवी अस्तित्व हे शरीर, मन, बुद्धी आणि आत्मा यांचा संगम असलेले एक बहुआयामी स्वरूप आहे. मानवी अस्तित्वाच्या केवळ एकाच पैलूवर भर देणार्या दृष्टिकोनांच्या विपरीत, भारतीय तत्त्वज्ञान अशा एका सखोल चैतन्याला मानते जे व्यक्तीला समाज, राष्ट्र, संस्कृती आणि संपूर्ण मानवजातीशी जोडते. महर्षी दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद, गुरू गोविंद सिंग, महाराणा प्रताप, छत्रपती शिवाजी महाराज, भगतसिंग, चंद्रशेखर आझाद आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जीवनात याच तत्त्वाचे प्रतिबिंब दिसून येते; ज्यांना कर्तव्यभावना, आध्यात्मिक निष्ठा आणि संस्कृतीविषयक चेतना यातून कार्य करण्याची प्रेरणा निर्माण झाली.

भारतीय ज्ञानप्रणाली मानव आणि निसर्ग यांच्यातील संबंधांकडे संघर्ष किंवा वर्चस्व या दृष्टीने न पाहता सहअस्तित्व, सुसंवाद, सामंजस्य आणि आत्मीयतेच्या भावनेतून पाहते. मानव हा निसर्गाचाच एक अविभाज्य घटक आहे; येथे पृथ्वीला ‘माता’, नद्यांना ‘जीवनदायिनी’, वनांना ‘संरक्षक’ आणि संपूर्ण सृष्टीला ‘ईश्वरी चैतन्याचे स्वरूप’ मानले जाते. ‘ईशोपनिषद’ शिकवण देते की, उपभोग घेताना अनिर्बंध हक्क गाजवण्याऐवजी संयम, जबाबदारी आणि आदरभाव यांचा अवलंब केला पाहिजे (त्यागपूर्वक भोग घ्या). हवामान बदल आणि पर्याव-रणाचा र्हास होत असलेल्या आजच्या काळात या सांस्कृतिक दृष्टिकोनाचे महत्त्व नव्याने अधोरेखित झाले आहे.

आधुनिक संस्कृतीने विकासाचा अर्थ अनेकदा निसर्गावर, प्रकृतीवर विजय मिळवणे असा लावला असला, तरी भारतीय ज्ञानप्रणाली विकास आणि शाश्वतता, उपभोग आणि त्याग, अधिकार आणि कर्तव्ये, तसेच वैयक्तिक आकांक्षा आणि समाजाचे व्यापक हित यांच्यात सुसंवाद, संतुलन साधण्याचा प्रयत्न करते. ‘वसुधैव कुटुंबकम, ‘सर्वे भवन्तु सुखिनः आणि ‘एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति’ यासारख्या व्यापक संकल्पनांतून हा दृष्टिकोन व्यक्त होतो, जो भारतीय संस्कृतीचे वैश्विक आणि सर्वसमावेशक स्वरूप दर्शवतो.

‘भारतबोध’चा आणखी एक तितकाच महत्त्वाचा पैलू म्हणजे कर्तव्यभावना. समकालीन चर्चांमध्ये अनेकदा अधिकारांवर भर दिला जात असला, तरी भारतीय परंपरा असे मानते की कर्तव्यांच्या निष्ठापूर्वक पालनातूनच अधिकारांचे रक्षण होते. ‘व्यष्टी’ (व्यक्ती), ‘समष्टी’ (समाज) आणि ‘परमेष्टी’ (परम सत्य, ब्रह्म/ईश्वर) यांच्या माध्यमातून व्यक्त होणारे हे परस्पर-संबद्ध नाते हे अधोरेखित करते की, व्यक्ती, समाज आणि परम सत्य हे एकाच वैश्विक चेतनेशी जोडलेले आहेत.

थोडक्यात सांगायचे तर ‘भारतबोध’ म्हणजे केवळ भारताचा भूगोल, इतिहास किंवा राजकीय वाटचाल यांची समज नव्हे, तर त्याची सभ्यता, संस्कृती आणि ज्ञानपरंपरा यांची व्यापक, सर्वसमावेशक जाणीव होय. भारतबोध आणि भारतीय ज्ञानप्रणाली अविभाज्य आहेत; भारतीय ज्ञानप्रणालीची ओळख असल्याशिवाय भारताची समज अर्थात भारतविषयक जाणीव अपूर्णच राहते. प्रत्येक भारतीयाला वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, पुराणे, दर्शने, आगम, बौद्ध त्रिपिटक, जैन आगम, अर्थशास्त्र, योग, आयुर्वेद, खगोलशास्त्र, गणित, वास्तुकला, साहित्य आणि भारताच्या शैक्षणिक परंपरा यांची मूलभूत ओळख असायलाच हवी. तसेच त्यांना पाणिनी, पतंजली, कौटिल्य, आर्यभट्ट, वराहमिहीर, ब्रह्मगुप्त, भास्कराचार्य, चरक, सुश्रुत, नागार्जुन, भरत मुनी, कालिदास, आद्य शंकराचार्य, रामानुजाचार्य, मध्वाचार्य आणि इतर अनेक विद्वान व ऋषीमुनींच्या योगदानाची जाणीव व आदरही असायला हवा. भारतातील मंदिरे, तीर्थक्षेत्रे, गुरुकुल, प्राचीन विद्यापीठे, शिलालेख, स्मारके, लोकपरंपरा, सण-उत्सव, कौटुंबिक संस्था, ग्रामीण जीवन, पर्यावरणविषयक जाणीव आणि आदर्श हे या संस्कृतीच्या वारशाचे अविभाज्य घटक आहेत. त्यामुळे, भारताला जाणून घेणे म्हणजे केवळ त्याच्या भूतकाळाचा अभ्यास करणे नव्हे, तर त्या सभ्यताविषयक चेतनेला समजून घेणे होय, जिने हजारो वर्षांपासून भारताची सांस्कृतिक एकता जपली आहे. हाच भारतबोधाचा गाभा आणि भारतीय ज्ञानप्रणालीचा खरा आत्मा आहे; याच आधारावर भारत आपल्या भूतकाळाचा अर्थ लावू शकतो, वर्तमानाला नवी दिशा देऊ शकतो आणि उद्देशपूर्ण व उज्ज्वल भविष्याची जडण-घडण करू शकतो.

**(ऑर्गनायझरवरून साभार)**

---

## दृष्टिक्षेप

**प्रफुल्ल केतकर**

# कारगिल विजय आणि दूरदर्शी सुधारणा

> ‘देशात प्रथम स्थिर शांतता आणि सुरक्षा सुनिश्चित केल्याशिवाय, जलद विकास आणि संसाधनांचे न्याय्यपूर्ण वितरण साध्य करता येणार नाही. म्हणूनच, देशाच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य आहे आणि हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रणालीगत सुधारणांची अंमलबजावणी कुठलाही विलंब न करता करणे गरजेचे आहे.’
>
> **– राष्ट्रीय सुरक्षेबाबतच्या मंत्रिगटाचा अहवाल (कारगिल समिती रिपोर्ट), २०००**

१९९९ मध्ये लडाखमधील कारगिल, द्रास आणि बटालिक क्षेत्रांत झालेली पाकिस्तानची घुसखोरी सर्वांसाठीच धक्कादायक होती. राजकीयदृष्ट्या, विरोधी पक्षांनी गुप्तचर यंत्रणेचे अपयश असल्याचा आरोप करीत या घटनेचा वापर वाजपेयी सरकारला लक्ष्य करण्यासाठी केला. ‘लाहोर बस डिप्लोमसी’नंतर झालेला हा विश्वासघात अस्वीकार्य होता; त्यातही लडाखसारख्या भागात, जिथे हिवाळ्यात दोन्ही बाजूंनी सहसा गस्त घातली जात नाही. तरीही, भारताने परिस्थिती पूर्णपणे पालटली आणि अत्यंत कठीण भूप्रदेशातील गमावलेला भूभाग परत मिळवून गौरवशाली विजय व लष्करी यश संपादन केले. मात्र, असे असले तरी, पाचशेहून अधिक शूरवीरांचे बलिदान आणि इतर अनेक मुद्द्यांमुळे ‘कारगिल पुनरावलोकन समिती’च्या (Kargil Review Committee) अहवालाच्या माध्यमातून आत्मपरीक्षणाची संधी निर्माण झाली. राष्ट्रीय सुरक्षा व्यवस्थापनाचा आढावा घेण्यासाठी आणि त्यात सुधारणा करण्यासाठी सरकार, गुप्तचर संस्था, सशस्त्र दल आणि तज्ज्ञ यांना एकत्र आणले गेले. राष्ट्रीय सुरक्षेवर पहिल्यांदाच सर्वसमावेशक आणि गांभीर्याने चर्चा झाली, कारण ब्रिटीशकालीन ‘थिएटर सिस्टीम’मध्ये (लष्करी कार्यक्षेत्रांची रचना) आमूलाग्र बदल करण्याची गरज निर्माण झाली होती. कारगिल विजय दिवसाच्या २७ व्या वर्धापनदिनादरम्यान ‘इंटिग्रेटेड थिएटर कमांड’ला (एकात्मिक लष्करी कार्यक्षेत्र रचना) अपेक्षित मंजुरी मिळणे, ही या पुनरावलोकन प्रक्रियेतून आकारास आलेली एक महत्त्वाची सुधारणा होती.

कारगिल क्षेत्रातील घुसखोरीची माहिती ३ मे १९९९ रोजी मिळाली. बक्करवाल समुदायातील मेंढपाळ आणि गारकोन गावातील देशभक्त ग्रामस्थांनी- ज्यांची मदत ब्रिगेडची गुप्तचर टीम अधूनमधून सीमावर्ती भागातील माहिती गोळा करण्यासाठी घेत असे, त्यांनी लष्कराला याची सूचना दिली आणि ७ मे रोजी गस्ती पथकांनी याला दुजोरा दिला. १९ फेब्रुवारी १९९९ रोजी पंतप्रधान अट-लबिहारी वाजपेयी यांच्या ऐतिहासिक ‘लाहोर बस डिप्लोमसी’नंतर अवघ्या तीन महिन्यांतच, पाकिस्तानी लष्कराकडून शांततेच्या प्रयत्नांना बसलेला हा आणखी एक मोठा धक्का होता. पाकिस्तानचे हे धाडस (किंवा



दुःसाहस) भारतासाठी ‘संकटातील संधी’ किंवा एकप्र-कारचे वरदान ठरले. कारण यामुळे नवी दिल्लीला आपल्या लष्करी यंत्रणेचा आढावा घेण्याची आणि ती अधिक बळकट करण्याची संधी मिळाली.

‘स्नो बूट्स’पासून ते संरक्षण उपकरणांपर्यंत सर्वच गोष्टी नोकरशाहीच्या अडथळ्यांमध्ये अडकल्या होत्या. तोफखाना आणि बंदुकांसाठी परदेशी पुरवठ्यावर असलेल्या अति-अवलंबित्वाची बाबही निदर्शनास आली. संरक्षण उत्पादनांमध्ये खाजगी क्षेत्राचा सहभाग वाढवण्याच्या शक्यतेचाही विचार केला गेला. समितीने प्रसारमाध्यमांशी संबंध आणि संवाद धोरण (bomarnibation srtrategy) या गोष्टी राष्ट्रीय सुरक्षेचे महत्त्वाचे पैलू असल्याचे अधोरेखित केले. कारगिल हे भारताचे पहिले ‘टीव्हीवर दाखवले गेलेले’ युद्ध होते. तसेच, सीमावर्ती भागातील पायाभूत सुविधा अद्ययावत करण्याची गरजही यातून अधोरेखित झाली. लष्करी कारवायांमध्ये परस्पर-समन्वय साधण्याशी संबंधित दोन अत्यंत महत्त्वाच्या शिफारशी होत्याः ‘संयुक्त संरक्षण प्रमुख अर्थात कंबाईंड डिफेन्स स्टाफ (सीडीएस) हे पद निर्माण करणे आणि वसाहतकालीन कमांड रचनेचे रूपांतर ‘इंटीग्रेटेड थिएटर कमांड’मध्ये करणे याचा या शिफारशींमध्ये समावेश होता. युद्धाचे भविष्यकालीन स्वरूप हे ‘नॉन-लिनियर’ (एकरेषीय नसलेले) असेल आणि त्यात रीअल-टाईम सर्विलान्स, इंटीग्रेटेड कमांड, कंट्रोल कम्युनिकेशन्स, कंप्युटर, गुप्तचर आणि माहिती यंत्रणा, लक्ष्य निश्चिती आणि अत्यंत घातक व अचूक मारा करणारी शस्त्रप्रणाली यांचा समावेश असेल, हे ओळखून केआरसीने केवळ भूतका-



ळातील अनुभवांवरच लक्ष केंद्रित केले नाही, तर देशाला भविष्यकालीन युद्धासाठी सज्ज करण्याचे एक महाकाय कार्य हाती घेतले.

मूळात, केआरसीने ही संपूर्ण पुनर्रचना पूर्ण करण्यासाठी दहा वर्षांचा कालावधी निश्चित करण्याची शिफारस केली होती. दुर्दैवाने, ‘धोरणात्मक लकवा’ आणि मोठ्या प्रमाणावरील भ्रष्टाचारामुळे सोनिया गांधी यांच्या नेतृत्वाखालील यूपीए सरकारला संरक्षण क्षेत्रातील सुधारणा आणि आधुनिकीकरणाच्या आघाडीवर फारशी प्रगती करता आली नाही. नरेंद्र मोदी यांनी भारताचे पंतप्रधान म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर आणि विशेषतः दिवंगत मनोहर पर्रीकर संरक्षण मंत्री झाल्यानंतरच, संरक्षण खरेदीमध्ये पारदर्शकता आणि तत्परता आणणे हा राष्ट्रीय अजेंडा बनला. यासाठी पुरेशी अर्थसंकल्पीय तरतूद देखील करण्यात आली. आता संरक्षण उत्पाद-नातील खाजगी क्षेत्राचा सहभाग वाढला आहे. डीआरडीओ अधिक स्पर्धाक्षम बनले आहे आणि आता आपण संरक्षण तंत्रज्ञान व उपकरणांची मोठ्या प्रमाणावर निर्यात करीत आहोत. सीमावर्ती भागातील पायाभूत संरचनात देखील मोठी सुधारणा झाली आहे. कंबाईंड डिफेन्स स्टाफ (सीडीएस) हे पद निर्माण करण्याचा निर्णय अत्यंत महत्त्वाचा होता आणि जनरल बिपिन रावत यांनी १ जानेवारी २०२० पासून या प्रक्रियेला गती दिली. ‘इंटिग्रेटेड थिएटर कमांड’चा प्रस्ताव सध्या अंतिम स्वरूप घेत असला, तरी ‘ऑपरेशन सिंदूर’ दरम्यान आमच्या सशस्त्र दलांनी यापूर्वीच परस्पर समन्वय आणि संयुक्त कार्यक्षमतेचे (ऑपरेशनल ताळमेळ) उत्कृष्ट उदाहरण सादर केले आहे.

२७ व्या कारगिल विजय दिनानिमित्त, आमच्या सीमांचे रक्षण करणार्या सशस्त्र दलांचे शौर्य आणि निष्ठा यांचा गौरव करत असतानाच, सशस्त्र दले, गुप्तचर संस्था, संसद, सरकार, प्रसारमाध्यमे आणि संपूर्ण राष्ट्र यांनी यातून घेतलेल्या धड्यांचे सिंहावलोकन करण्याची ही एक योग्य वेळ आहे. आपल्याला हे समजून घेणे आवश्यक आहे की, केवळ सीमा सुरक्षेपुरती मर्यादित असलेल्या राज्य सुरक्षे’च्या (स्टेट सिक्युरिटी) पलीकडे ‘राष्ट्रीय सुरक्षा’ ही संकल्पना विस्तारलेली आहे. आज ‘फिफ्थ जनरेशन वॉरफेयर’ (पाचव्या पिढीतील युद्धतंत्र) मध्ये माहिती आणि विशिष्ट विचारप्रवाह (नॅरेटिव्ह) ही शत्रूची अत्यंत प्रभावी शस्त्रे बनली आहेत. त्यामुळे, आपली संस्कृती, संस्था आणि सामाजिक जडणघडण यांचे रक्षण करण्याची जबाबदारी केवळ सुरक्षा दलांवरच सोपवून चालणार नाही. युद्धाचे बदलणारे स्वरूप समजून घेणे, या प्रक्रियेतील प्रत्येक घटकाची भूमिका जाणून घेणे आणि या महान संस्कृतीचे जबाबदार घटक म्हणून अपेक्षित भूमिकांनुसार कृती करणे, यासाठी ही एक अत्यंत योग्य वेळ आहे. अशा प्रकारे, आपण सैनिकांच्या बलिदानाला यथोचित आदरांजली वाहू शकतो आणि कारगिलसारख्या कोणत्याही प्रकारच्या घुसखोरीची पुनरावृत्ती भविष्यात कधीही होणार नाही, हे सुनिश्चित करू शकतो.

**(ऑर्गनायझरवरून साभार)**

# बँक खात्यातून सुमारे ७ कोटी रुपयांचा परस्परच बेकायदेशीर व्यवहार

## सबंधीत आठजणांवर गुन्हा दाखल, आर्थिक गुन्हे शाखेकडून तपास सुरु, परभणीत खळबळ

**मोहन धारासूरकर**

**परभणी ,/प्रतिनिधी:-** येथील नारायण चाळ भागातील बँक ऑफ महाराष्ट्रच्या शाखेतून आठ व्यक्तींच्या बँक खात्यातून सुमारे ७ कोटी रुपयांचा परस्परच बेकायदेशीर व्यवहार केल्याबद्दल एका साखळी विरोधात पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

येथील पंचशील नगर भागातील ऑटोचालक प्रशांत गौतम नरवाडे यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात एक तक्रार दाखल केली. त्याद्वारे या फसवणूकीबद्दल तपशीलवार माहिती विशद केली. त्यांच्याच भागातील रहिवाशी असलेला ऑटोचालक मित्र अविनाश आव्हाड याने बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये खाते उघडल्यास शासकीय योजनेचा लाभासह तात्काळ १ हजार रुपये मिळतात, असे आमिष दाखवून आपले स्टेशन रोड भागातील नारायण चाळ जवळील बँक ऑफ महाराष्ट्रच्या शाखेत खाते उघडले. पाठोपाठ १ हजार रुपयेसुध्दा दिले. परंतु, त्या खात्यावरील एटीएम कार्ड आणि कीट स्वत:कडे ठेवले. आपणास खाते उघडल्याबरोबर १ हजार रुपयांचा फायदा झाल्याचे पाहुन नरवाडे यांनी आई, पत्नी आणि शेजारील एकूण ७ व्यक्तींची या बँकेत खाती उघडली. त्यावेळी अविनाश आव्हाड याने सर्वतोपरि मदत केली. अन् खाते उघडल्या पाठोपाठ प्रत्येकी १ हजार रुपये या सात व्यक्तींना वितरितसुध्दा केली. परंतु, या सर्वांची कागदपत्रे ताब्यात घेतली. तसेच बँकेच्या फॉर्मवर ठिकठिकाणी स्वत:चे मोबाईल नंबर नोंदविले व सर्वांचे एटीएम कार्डसुध्दा स्वत:जवळ ठेवले.




एकूण या आठ व्यक्तींना अविनाश आव्हाड यांच्या या कृतीबाबत फारसा संशय आला नाही. परंतु, ५ फेबुवारी २०२६ रोजी प्रशांत गौतम नरवाडे यांच्या मातोश्रींना बँक ऑफ महाराष्ट्र कडून ९९ हजार रुपयांच्या सायबर फ्रॉडची नोटीस मिळाली. तेव्हा हे सर्व खातेदार खडबडून जागे झाले. बँक प्रशासनाकडे धाव घेतली. तेव्हा शाखा अधिकाऱ्यांनी या आठ व्यक्तींना त्यांच्या खात्यातून लाखो करोडो रुपयांचे संशयास्पद व्यवहार झाले आहेत, हे निदर्शनास आणून दिले. या बँकेच्या नोटीसीनंतर संतप्त खातेदारांनी आव्हाड यांच्याशी संपर्क साधला. हा काय प्रकार आहे, अशी विचारणा केली तेव्हा आव्हाड याने तुम्ही घाबरु नका मी सेटलमेंट करुन देतो वगैरे आश्वासन देऊन बोळवण केली.

दरम्यान, आपली शुध्द फसवणूक झाली आहे, हे निदर्शनास आल्यानंतर या आठ खातेदारांनी जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालयांतर्गत आर्थिक गुन्हे शाखेकडे धाव घेतली.

प्राथमिक चौकशीतून बेकायदेशीर व्यवहाराबाबत सकृतदर्शनी मोठा घोळ लक्षात आल्याबरोबर कोतवाली पोलिसांनी अविनाश आव्हाड व इतरांविरोधात भारतीय न्याय संहिता कलम ३१८ (२), ३१८ (४) आणि ११२ (२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलिस निरीक्षक संजय निकुंभ यांनी या प्रकरणात तपास सुरु केला आहे.

दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार प्रशांत नरवाडे यांच्या खात्यात ५६ लाख २१ हजारांचे क्रेडीट, राहुल पवळे यांच्या खात्यात २ कोटी ४२ लाख, संगीता नरवाडे यांच्या खात्यात १६ लाख ११ हजार, चंद्रकला पवळे यांच्या खात्यात २ कोटी ४२ लाख, कविता डोळस यांच्या खात्यात १ कोटी २२ लाख तर विशाखा नरवाडे यांच्या खात्यातून १७ लाख ७६ हजार रुपये क्रेडीट झाले आहेत. एकूण या आठ खात्यातून ६ कोटी ९७ लाख ३९ हजार २० रुपयांचे क्रेडीट आणि ६ कोटी ९२ लाख ७० हजार ५७७ रुपयांचे डेबिट ट्रान्झेक्शन झाले असून या आठ खात्यातून या आरोपींनी खात्यांचा पध्दतशीरपणे गैरवापर केला हे निदर्शनास आले आहे.

## संक्षिप्त वृत्त...




### मराठवाडा आदर्श शिक्षक पुरस्काराने नारायण चौरे यांचा गौरव

**सेलू,/प्रतिनिधी :** श्रीराम प्रतिष्ठान, सेलू येथील विज्ञान शिक्षक नारायण बाबुराव चौरे यांना आपुलकी व आस्था संस्था संचलित मराठवाडा आदर्श शिक्षक पुरस्कार२०२६ प्रदान करून गौरविण्यात आले. २६ जुलै रोजी झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात त्यांचा सन्मान करण्यात आला.

जालना जिल्ह्यातील वांजोळा येथील रहिवासी असलेले चौरे हे गेल्या १५ वर्षांपासून श्रीराम प्रतिष्ठानमध्ये विज्ञान शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण करण्यासाठी त्यांनी सायन्स चॅलेंज, माय सायन्स लॅब ॲट होम, परिपाठातील विज्ञान प्रयोग यांसारखे अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले आहेत. त्यांच्या विज्ञान शैक्षणिक साहित्यामुळे परभणी जिल्ह्याने सलग तीन वर्षे राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात नेतृत्व केले असून, त्यांनी दोन वेळा राष्ट्रीय व चार वेळा राज्यस्तरीय यश संपादन केले आहे. यापूर्वी २०२५ मध्ये त्यांना बी द चेंज फाउंडेशन चा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारही प्राप्त झाला होता.या पुरस्काराबद्दल श्रीराम प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय रोडगे यांनी त्यांचे अभिनंदन केले. तर नारायण चौरे यांनी हा पुरस्कार आपल्या आई-वडिलांचे संस्कार, पत्नीचे सहकार्य, सहकाऱ्यांची साथ आणि श्रीराम प्रतिष्ठानच्या विश्वासाला समर्पित असल्याची भावना व्यक्त केली. तसेच संस्थेच्या वतीने आणि वांजोळा ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

### खरीप पीक स्पर्धेसाठी शेतकऱ्यांना ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**परभणी,/प्रतिनिधी:** राज्यातील अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकांची उत्पादकता वाढविणे, प्रयोगशील शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार करणे या उद्देशाने खरीप हंगाम २०२६-२७ अंतर्गत राज्यांतर्गत पीकस्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे. यापूर्वी पीकस्पर्धेची प्रक्रिया ऑफलाईन पद्धतीने राबविण्यात येत होती. मात्र, प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता व गतिमानता आणण्यासाठी खरीप हंगाम २०२६ पासून स्पर्धेसाठी स्वतंत्र ऑनलाईन संगणक प्रणाली सुरू करण्यात आली आहे. अर्जासाठी शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी), प्रवेश शुल्क भरल्याची पावती, आदिवासी गटासाठी जात प्रमाणपत्र, आणि बँक पासबुक किंवा धनादेशाच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत आवश्यक आहे.

# तोष्णीवाल यांचा नागरी सत्कार

**जिंतूर, /प्रतिनिधी-**ब्रिजगोपाल तोष्णीवाल यांची महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभेच्या प्रदेशाध्यक्षपदी नुकतीच निवड झाली. त्यांचा मंगळवार (दि.२८) जुलै रोजी तालुका व्यापारी महासंघ,औषधी विक्रेता,माहेश्वरी समाज बांधवांच्या वतीने नागरी सत्कार करण्यात आला. या सत्काराला उत्तर देतांना ब्रिजगोपाल तोष्णीवाल म्हणाले की, ज्या पदावर माझी मतदानाच्या माध्यमातून निवड झाली आहे, त्या पदाला पूर्ण न्याय देण्याचे काम भविष्यात माझ्याकडून केले जाईल. माझ्याकडे येणाऱ्या प्रत्येक नागरिकाचे व सर्वसामान्यांचे काम मी प्रामाणिकपणे करणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.



या वेळी व्यापारी महासंघाचे अध्यक्ष रमेश दरगड, गोविंद पोरवाल, सचिन देवकर , सुनील तोष्णीवाल, गणेश कुरहे, पुरुषोत्तम पोरवाल,प्रदीप राठी,हरिराम जेथलिया,प्रकाशसोनी, संग्राम सोनी, प्रफुल्ल साबु, पुष्कर दरगड, गजानन दरगड,प्रफल्ल दरगड, केतन अग्रवाल,सुशील काबरा, सुदर्शन अच्छा,मंदार कोकडवार, सचिन मानधने, सत्यनारायण शर्मा,केदार चिद्रवार, घनश्याम जेथलिया, बंडू पल्लेवार,शेख शकील अहमद, सचिन रायपत्रेवार, मंचक देशमुख,कांता चिद्रवार,महेश तोष्णीवाल यांच्या सह अनेक मान्यवर उपस्थित होते.



# जांभूळ बेटाच्या पर्यटन विकासासाठी केंद्राकडे पाठपुरावा

## केंद्रीय मंत्री गडकरी यांच्याकडे आ.गुट्टे यांची मागणी

**गंगाखेड, /प्रतिनिधी-**वधानसभा मतदारसंघाला लाभलेले निसर्गाचे अनमोल वरदान असलेल्या जांभूळ बेट या पर्यटनस्थळाला राष्ट्रीय स्तरावर स्वतंत्र ओळख मिळवून देण्यासाठी स्थानिक आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे यांनी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. त्यामुळे त्यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची नवी दिल्ली येथे भेट घेऊन जांभूळ बेटाचा केंद्र शासनाच्या स्वदेश योजनेअंतर्गत समावेश करून त्याचा शाश्वत, नियोजनबद्ध आणि सर्वांगीण विकास करण्याबाबत सविस्तर चर्चा केली. या भेटीत युवा उद्योजक सुनील गुट्टे हेही उपस्थित होते.

याप्रसंगी जांभूळ बेट परिसरासाठी सर्वसमावेशक विकास आराखड्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली. दर्जेदार रस्ते, पर्यटकांसाठी मूलभूत सुविधा, सुरक्षितता, स्वच्छता, पर्यावरणपूरक पर्यटन, नौकाविहार, विश्रांती केंद्रे, माहिती केंद्र, स्थानिक हस्तकला आणि सांस्कृतिक वारसा जपणारे उपक्रम यांचा समावेश असलेला विकास आराखडा उभारण्याबाबत सकारात्मक विचारविनिमय झाला.

पर्यटन हा केवळ मनोरंजनाचा विषय नसून तो ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देणारे प्रभावी विकासमाध्यम आहे, या भूमिकेतून जांभूळ बेटाच्या विकासाची संकल्पना मांडण्यात आली. नैसर्गिक संपदा, पर्यावरणीय समृद्धी आणि पर्यटनक्षम वैशिष्ट्ये लाभलेल्या या स्थळाचा वैज्ञानिक पद्धतीने विकास झाल्यास गंगाखेड तालुका मराठवाड्यातील महत्त्वपूर्ण पर्यटन केंद्र म्हणून उदयास येऊ शकतो, असाही विश्वास आ.डॉ.गुट्टे यांनी व्यक्त केला.

जांभूळ बेटाचा विकास हा केवळ पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचा नसून स्थानिक युवकांसाठी रोजगारनिर्मिती, स्वयंरोजगार, महिला बचतगटांना व्यवसायाच्या संधी, लघुउद्योजकांना प्रोत्साहन आणि ग्रामीण बाजारपेठेला चालना देणारा ठरेल, असे मत यावेळी मांडण्यात आले. पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिक अर्थचक्र गतिमान करण्याची मोठी क्षमता जांभूळ बेटामध्ये असल्याचेही आ.डॉ.गुट्टे स्पष्ट करण्यात आले.

विकास आणि पर्यावरण यांच्यातील समतोल राखणे ही काळाची गरज असल्याचे सांगत, जांभूळ बेटाचा विकास पूर्णतः पर्यावरणपूरक आणि शाश्वत तत्त्वांवर आधारित असावा, यावर विशेष भर देण्यात आला. स्थानिक नागरिकांचा सहभाग, जैवविविधतेचे संवर्धन आणि नैसर्गिक सौंदर्य अबाधित ठेवून पर्यटन वाढविण्याचा दृष्टिकोनच भविष्यातील विकासाचा पाया ठरेल, असेही आ.डॉ.गुट्टे यांनी आवर्जून सांगितले.

मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांचा जास्तीत जास्त लाभ मिळवून देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असून, पायाभूत सुविधा, पर्यटन, उद्योग आणि रोजगार या चार महत्त्वाच्या घटकांवर आधारित विकासाला प्राधान्य दिले जात असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. विकासाचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याची भूमिका कायम राहील, अशीही ग्वाही आ.डॉ.गुट्टे यांनी दिली. दरम्यान, नैसर्गिक संपत्तीचे जतन, स्थानिक संस्कृतीचे संवर्धन आणि रोजगाराभिमुख पर्यटन विकास यांचा समन्वय साधणारा हा प्रकल्प यशस्वी झाल्यास ते एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात.

# आ.डॉ.राहुल पाटील यांच्या 'दे धक्का'ने शिंदे गटाला खिंडार, दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख भालेराव ठाकरे गटात



**परभणी, /प्रतिनिधी-** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे आ.डॉ. राहुल पाटील यांनी परभणीत शिवसेना शिंदे गटाला मोठा धक्का दिला आहे. शिंदे गटाचे दलित आघाडी जिल्हाप्रमुख अमित भालेराव यांनी असंख्या कार्यकर्त्यांसह ठाकरे गटात प्रवेश केला आहे. त्यामुळे आ.पाटील यांच्या 'दे धक्का'ने परभणीत शिंदे गटाला खिंडार पडले असल्याची सर्वत्र चर्चा आहे.

मागील काही दिवसांपासून ठाकरे गटात प्रवेश करणायांची संख्या वाढली आहे. आ. डॉ. पाटील यांचे खंबीर नेतृत्वावर विश्वास ठेवत विविध पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्ते ठाकरे गटात प्रवेश करत आहेत. आ.पाटील यांनी पक्ष संघटन वाढवण्यावर भर दिला आहे. त्यांच्या प्रयत्नामुळे संपूर्ण जिल्ह्यामध्ये ठाकरे गटाला नवचैतन्य प्राप्त झाले आहे. आता त्यांनी थेट शिंदे गटाला मोठा धक्का दिला आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या विचारांवर व आ. डॉ. पाटील नेतृत्वावर विश्वास ठेऊन शिवसेना (शिंदे गट) दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख अमित भालेराव यांनी असंख्य कार्यकर्त्यासह शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात जाहीर प्रवेश केला. यामुळे शिंदे गटाला मोठे खिंडार पडले आहे. यावेळी महानगरप्रमुख डॉ. विवेक नावंदर, जिल्हाप्रमुख विष्णू मुरकुटे, रविंद्र धर्मे, विधानसभा प्रमुख कल्याणराव रेंगे, उपजिल्हाप्रमुख मुंजा कोल्हे, दिनेश बोबडे, सुभाष जोंधळे, बाळासाहेब राखे, रामराव डोंगरे, संदिप झाडे, सुनील पंढरकर, धम्मा साळवे, शैलेश भाग्यवंत, रामराज कनकुटे, विष्णू आवचार व शिवसेना, युवासेना पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पीक विमा ३१ जुलै पर्यंत भरण्याचे आवाहन

**परभणी,/प्रतिनिधी** प्रधानमंत्री पिक विमा योजना अंतर्गत जिल्ह्यात आजपर्यंत २ लाख १ हजार ९१२ शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवून १ लाख ३४ हजार १८७ हेक्टर क्षेत्र संरक्षित केले आहे. उर्वरित शेतकऱ्यांनी ३१ जुलै २०२६ पूर्वी पिक विमा उतरवून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दौलत चव्हाण यांनी केले आहे. जिल्ह्यात प्रधानमंत्री पिक विमा योजना युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लिमिटेड मार्फत राबविण्यात येत असून, राज्य शासनाने कप अँड कॅप (८०-११०) मॉडेल लागू केले आहे. खरीप अन्नधान्य व गळीतधान्य पिकांसाठी शेतकरी हप्ता २ टक्के, तर नगदी पिकांसाठी ५ टक्के निश्चित करण्यात आला.

# यश रामपूरकर यांचे नीट- २०२६ परिक्षेत घवघवीत यश

**जिंतूर ,/प्रतिनिधी-:** अथक परिश्रम जिद्द आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या बळावर जिंतूर येथील चि. यश बाळासाहेब रामपूरकर यांनी देशातील सर्वात प्रतिष्ठित वैद्यकीय प्रवेश परीक्षा - २०२६ मध्ये घवघवीत यश संपादन करत रामपूरकर कुटुंबासह संपूर्ण परीवारांचा सान्मान उंचावला आहे. यश रामपूरकर ने उल्लेखनीय यशामुळे रामपूरकर परिवारात आनंदाची वातावरण निर्माण झाले असून त्याच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

राष्ट्रीय परीक्षा संस्थेने जाहीर केलेल्या निकालानुसार यशने ७२० पैकी ५९३ गुण मिळवत ९९. ३६७६१६८ परसेंटाइल्स प्राप्त केला आहे. याशिवाय त्याने ऑल इंडिया रँक १२६३६ तसेच ओबीसी रँक ५७ ८५ मिळवत वैद्यकीय क्षेत्रांच्या शिक्षणाच्या दिशेने भक्कम पाऊल टाकले आहे. देशातील लाखो विद्यार्थ्यांमध्ये स्वतःची वेगळी ओळख निर्माण करत यश रामपूरकर ने आपल्या अथक मेहनतीचे सोने केले आहे. त्याच्या मेहनती मागे शिस्तबद्ध अभ्यास, वेळेची योग्य नियोजन, पालकाची सातत्यपूर्ण प्रोत्साहन,



शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन आणि स्वतःची जिद्द व चिकाटी हे महत्त्वाचे आधारस्तंभ ठरले. या यशामुळे रामपूरकर कुटुंबात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण असून नातेवाईक, शिक्षक, मित्रपरिवार,पत्रकार, व्यापारी तसेच परिसरातील नागरिकांकडून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. भविष्यात तो एक कुशल संवेदनशील आणि समाजाभिमुख डॉक्टर म्हणून रुग्ण सेवेंच्या माध्यमातून नाम नाव कमावेल असा विश्वास सर्वांकडून व्यक्त केला जात आहे .यावेळी यश चा आयआयबी या शिक्षण संस्थेतर्फे सेलिब्रेशन करून सत्कार ही आयोजित केला त्याचा फेटा, स्नेहांचा पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. या आनंददायी क्षणाला उपस्थितांनी त्याच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत त्याच्या आनंद उत्साहात साजरा केला. जिंतूर तालुक्यातील चारठाणा येथील रामपूरकर परिवारातील पहिलाच एकमेव डॉक्टर होण्यांचा मान त्याने मिळवला.

दरम्यान नीट परिक्षेतील गोंधळानंतरही या यश ने जे यश मिळविले आहे ते खरोखरच अत्यंत अभिमानास्पद असल्याचे यावेळी बोलले जात आहे.

### कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या

**परभणी,/प्रतिनिधी :** जिंतूर तालुक्यातील सावरगाव येथील एका शेतकऱ्याने कर्जबाजारीपणाला कंटाळून गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना मंगळवारी (दि. २८) सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मृत शेतकऱ्याचे नाव सुदाम ढवळे (वय ६५) असे आहे. कर्जाच्या ओझ्यामुळे ते मागील काही दिवसांपासून मानसिक तणावात असल्याची माहिती मिळाली आहे. मंगळवारी सावरगाव तांडा शिवारातील गट क्रमांक १९ मधील स्वतःच्या शेतातील लिंबाच्या झाडाला दोरीच्या सहाय्याने गळफास घेऊन त्यांनी जीवन संपविले. घटनेची माहिती मिळताच चारठाणा पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक बालाजी पुंड यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. प्राथमिक माहितीनुसार, मयत शेतकऱ्यावर चारठाणा महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे कर्ज असल्याचे समोर आले आहे.

# शासकीय योजनांतील कर्ज वाटपाला गती द्या- जिल्हाधिकारी गुप्ता




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ जुलै**

जिल्ह्यातील सर्व बँकांनी शासकीय योजनांअंतर्गत कर्जवाटपाचे उद्दिष्ट वेळेत पूर्ण करण्यासाठी समन्वयाने कार्य करावे. तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेशी संबंधित तक्रारी जिल्हा अग्रणी बँकेच्या निदर्शनास आणून त्यांचे तातडीने निराकरण करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी यावेळी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय सल्लागार समितीची बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीत जिल्ह्यातील विविध बँकांच्या शासकीय योजनांअंतर्गत कर्जवाटप, प्रलंबित प्रकरणे तसेच विविध योजनांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला.

यावेळी जिल्हा अग्रणी बँकेचे अधिकारी सुजीत झोडगे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अनिल कदम, जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीयीकृत, खासगी व ग्रामीण बँकांचे प्रतिनिधी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे जिल्हा प्रतिनिधी, ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थेचे संचालक तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत कर्जासाठी आवश्यक प्रशिक्षणाची व्यवस्था स्थानिक स्तरावर पुरेशा संख्येअभावी पर्यायी स्वरूपात नांदेड येथील ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थेमार्फत करण्याच्या सूचना दिल्या. प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत विमा संरक्षणाबाबत अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत माहिती पोहोचण्यासाठी संबंधित विमा कंपनीने समाजमाध्यमांच्या माध्यमातून जनजागृती करावी, असेही त्यांनी सांगितले.

जिल्ह्यात दुग्ध व्यवसायाला चालना देण्यासाठी प्रत्येक बँकेने किमान पाच शेतकऱ्यांना गाय किंवा म्हैस खरेदीसाठी कर्ज उपलब्ध करून द्यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले. यावेळी पीक कर्ज वितरण, प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, महिला बचत गटांना कर्जपुरवठा, कृषी कर्जमाफी तसेच इतर शासकीय योजनांअंतर्गत बँकांनी निर्धारित उद्दिष्टे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. शासकीय योजनांचा लाभ अधिकाधिक पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्व बँकांनी सकारात्मक भूमिका घेऊन समन्वयाने काम करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले.

कृषी, उद्योग व स्वयंरोजगार क्षेत्राला चालना देण्यासाठी पीक कर्ज, उद्योग कर्ज तसेच महिला बचत गटांच्या कर्ज प्रस्तावांना प्राधान्याने मंजुरी देऊन त्वरित कर्जवाटप करावे, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

# कर्जमुक्ती योजनेतील पात्र शेतकऱ्यांनी ई-केवायसी तातडीने पूर्ण करावी- गुप्ता

## जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय हेल्पलाईन उपलब्ध



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ जुलै**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत हिंगोली जिल्ह्यातील पाचही तालुक्यांतील ४४ हजार २१३ पात्र शेतकऱ्यांची यादी राज्य शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. पात्र लाभार्थी शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण, ई-केवायसी आणि ॲग्रीस्टॅक नोंदणी तातडीने पूर्ण करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आयोजित पत्रकार परिषदेत केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित या पत्रकार परिषदेस जिल्हा उपनिबंधक सुरेखा फुफाटे, जिल्हा अग्रणी बँक अधिकारी सुजीत झोडगे उपस्थित होते. जिल्हाधिकारी गुप्ता म्हणाले की, लाभार्थी शेतकऱ्यांनी त्यांच्या कर्ज खात्याशी आधार क्रमांक अचूकपणे जोडलेला असल्याची खात्री करून ई-केवायसी पूर्ण करणे आवश्यक आहे. तसेच ॲग्रीस्टॅकवर नोंदणी झाल्याशिवाय योजनेचा लाभ मिळणार नसल्याने सर्व पात्र शेतकऱ्यांनी ही प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी. आधार प्रमाणीकरणावेळी रकमेत तफावत, कर्ज खात्याशी आधार क्रमांक जुळत नसणे किंवा इतर तांत्रिक अडचणी आल्यास षश्रऔ.ारहरॲरीहींॲर.सीं.ळप पोर्टलवर ऑनलाइन तक्रार नोंदविण्याची सुविधा उपलब्ध असून, जिल्हास्तरीय समितीमार्फत त्याचे तातडीने निराकरण करण्यात येत आहे.

ते पुढे म्हणाले की, शासनाच्या निकषानुसार दोन लाख रुपयांपर्यंतच्या पात्र थकीत कर्जासाठी कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येणार आहे. दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकीत कर्ज असलेल्या शेतकऱ्यांसाठी संबंधित बँकांमार्फत वन टाइम सेटलमेंट प्रक्रियेद्वारे कार्यवाही करण्यात येईल. कर्जमाफीच्या यादीबाबत निर्माण झालेल्या संभ्रमाच्या पार्श्वभूमीवर लाभार्थ्यांच्या नोंदींची पडताळणी करण्यात आली असून त्यामध्ये कोणतीही त्रुटी आढळून आलेली नाही. त्यामुळे अफवांवर विश्वास न ठेवता पात्र लाभार्थ्यांनी आधार प्रमाणीकरण तातडीने पूर्ण करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

लाभार्थी शेतकऱ्यांना कर्जमुक्ती योजनेसंदर्भात शंका, तक्रार किंवा तांत्रिक अडचण असल्यास त्याचे निराकरण करण्यासाठी विजय गीते, सहकार अधिकारी श्रेणी-१ (७०३८९६९५३५), उमाकांत चौव्हाणकर, सहाय्यक सहकार अधिकारी (९८९००४९४८२), राजेश बांडे, प्रमुख लिपिक (७५०७४८६८८०), उद्धव सूर्यवंशी, सहकार अधिकारीश्रेणी-१ (९९२१८०७६३५), ज्ञानदेव डुकरे, सहकार अधिकारी श्रेणी-२ (९२८४७८७५५२) यांच्याशी नमूद हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा.

तालुकानिहाय संपर्क अधिकारी

सेनगाव तालुक्यातील शेतकऱ्यांनी ए. डी. गुंडे, सहाय्यक निबंधक (७०२०४७५८३४), हिंगोली व कळमनुरी तालुक्यातील शेतकऱ्यांनी एम. यू. यादव, सहाय्यक निबंधक (९४२०४३३८३८), वसमत व औंढा नागनाथ तालुक्यातील शेतकऱ्यांनी के. एम. कलेतवाड, सहाय्यक निबंधक (८९७५९४३१११) यांच्याशी संपर्क साधावा, असे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी यावेळी सांगितले.

सर्व पात्र लाभार्थी शेतकऱ्यांना कोणताही संभ्रम न बाळगता आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून शासनाच्या या महत्त्वाकांक्षी कर्जमुक्ती योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी गुप्ता यांनी पत्रकार परिषदेत केले.

# ग्रामीण भागातील दळणवळण सक्षम करणे हेच ध्येय- आ. मुटकुळे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ जुलै**



ग्रामीण भागातील दळणवळण व्यवस्था सक्षम करणे हेच आमचे मुख्य ध्येय आहे. दर्जेदार रस्त्यांशिवाय गावांचा विकास वेगाने होऊ शकत नाही, असे प्रतिपादन आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांनी केले. कडती-नर्सी-नामदेव-पहेणी-अठ्ठरवाडी आणि सरकळी-वरुडकाजी-वरुड-पुसेगाव-खुडज या मुख्य रस्त्याच्या कामाचा भूमिपूजन सोहळा त्यांच्या हस्ते पार पडला, त्याप्रसंगी ते बोलत होते.

प्रमुख गावांना जोडणारे हे मुख्य रस्ते गेल्या अनेक दिवसांपासून खराब अवस्थेत होता. यामुळे स्थानिक नागरिक, शेतकरी आणि विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागत होता. हा प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या या प्रयत्नांना यश आले असून, शासनाकडून या दोन रस्त्यासाठी १६ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. मंजुरीनंतर आता प्रत्यक्ष कामालाही सुरुवात झाली आहे.

पुढे बोलताना आमदार मुटकूळे म्हणाले की, या १६ कोटी रुपयांच्या निधीतून तयार होणारे रस्ते या परिसरातील नागरिकांचा प्रवास अधिक सुकर आणि सुरक्षित करेल. कामाचा दर्जा उत्तम राखण्यावर आमचा विशेष भर असेल आणि हा रस्ता हिंगोलीच्या ग्रामीण भागाच्या विकासाला नवी गती देईल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

या भूमिपूजन सोहळ्याला ज्येष्ठ नेते के.के. शिंदे, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, प्रकाशराव थोरात, नारायण खेडकर, संतोष टेकाळे, तालुकाध्यक्ष माणिक लोडे, राजू जाधव कडतीकर जिल्हा प्रवक्ता विलास गोरे, गजानन खंदारे, सुदर्शन सावजी, अंभोरे सरपंच, मुरलीधर कापसे, संतोष कापसे, दामोधर जाधव, शंकर वाबळे, परसराम आठरे, खंडू पाटील, कांतराव गायवाळ, वामन सोमोसे, माधव गायवाळ, बंडू गायवाळ, कंत्राटदार एकलारे, भाटीया यांच्यासह सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी आणि परिसरातील ग्रामस्थ व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## संक्षिप्त वृत्त

### उपविभागीय पोलिस अधिकारी देशमुख रूजू



हिंगोली- उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, उपविभाग हिंगोली शहर येथे २७ जुलै रोजी नारायणराव देशमुख यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी पदाचा पदभार स्वीकारला. पदभार स्वीकारल्या नंतर पोलीस कर्मचाऱ्यांच्या वतीने त्यांचा औपचारिक सत्कार करण्यात आला. यावेळी पोलीस उपनिरीक्षक नानाराव पोले, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक उजगरे तसेच अंमलदार वसियोद्दीन, सुनिल नाईक, लक्ष्मण भगत, संतोष बंडे, संजोग वाघमारे, शिवाजी घोगरे, संघपाल पंडित, आणि पुजा पवार उपस्थित होते. उपविभागीय पोलीस अधिकारी देशमुख यांनी पदभार स्वीकारताच कर्मचाऱ्यांशी चर्चा करून कायदा व सुव्यवस्था, गुन्हे प्रतिबंध आणि जनतेच्या सुरक्षिततेबाबत सूचना दिल्या. नागरिकांच्या समस्या तातडीने सोडवण्यावर भर देऊ, असे त्यांनी यावेळी सांगितले.

### प पू माधवानंद महाराज यांचा चार्तुमास



हिंगोली- श्री चिन्मयमूर्ती संस्थान उमरखेड माधवानंद महाराज यांचा २०२७ चा चातुर्मास औंढा नागनाथ येथे होणार आहे. याची घोषणा संस्थांचे नियमाप्रमाणे पैठण येथे गुरुपौर्णिमेच्या दिवशी प. पू .माधवानंद महाराज यांच्यावतीने श्रीक्षेत्र पैठण येथे करण्यात आलेली आहे. चातुर्मासाचे नारळ स्वीकारताना पदाधिकारी दीनानाथ पाठक, हरिहर भोपी, राजकुमार घन, धोंडीराज पाठक, लक्ष्मीकांत पाठक, अतुल जोशी, बंडू पंडित, शेखर पाठक, रेणुका भोपी, दतात्रय ऋषी, वैशाली ऋषी, शैलेजा पंडित, डाकणे, वैशाली पाठक आदी गुरू बंधूंची उपस्थिती होती. औंढा नागनाथ चातुर्मास समीतीच्यावतीने सांगण्यात आले.

### हिंगोलीत दमदार पावसाची प्रतिक्षा

हिंगोली- मागील दोन ते तीन दिवसांपासून हिंगोली जिल्ह्यात ढगाळ वातावरण असून काही ठिकाणी मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला आहे. मात्र हिंगोली जिल्हयातील नदी, नाले, ओढे, तलाव अजूनही कोरडेठाक सून धरणातही पाणीसाठा नाही. दुसरीकडे शेतकऱ्यांना दमदार पावसाची प्रतिक्षा आहे. दिवसभर केवळ ढगाळ वातावरणामुळे मात्र आजारांचे प्रमाण वाढतांना दिसत आहे.

# वसमत येथे नारीशक्ती सन्मान सोहळा उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ जुलै**



येथील सुरमणी दत्ता चौगुले सभागृहात आयोजित 'नारीशक्ती सन्मान सोहळा' उत्साहपूर्ण वातावरणात आणि मोठ्या उपस्थितीत पार पडला. महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'जनसेवा सप्ताह' उपक्रमांतर्गत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, वसमत यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या सोहळ्यात समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या २५० कर्तृत्ववान महिलांचा सन्मानचिन्ह, गौरवपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. महिलांच्या कार्याचा सन्मान करण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमाला शहरासह तालुक्यातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमास सौ.वर्षाताई राजुभैय्या नवघरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली, तर अध्यक्षस्थानी सौ. मंगलाताई खानापुरे होत्या. यावेळी उपस्थित मान्यवरांनी महिलांच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आरोग्य व विविध क्षेत्रांतील योगदानाचे कौतुक करत महिला सक्षमीकरणासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता अधोरेखित केली. मान्यवरांनी आपल्या मनोगतात सांगितले की, महिलांचे सक्षमीकरण हा सक्षम समाज आणि विकसित राष्ट्राचा पाया आहे. महिलांना योग्य सन्मान, संधी आणि प्रोत्साहन मिळाल्यास समाजाच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळते. कार्यक्रमाच्या शेवटी नारीशक्तीचा सन्मान म्हणजे राष्ट्रशक्तीचा अभिमान या घोषणेने सभागृह दुमदुमून गेले. उपस्थित महिलांनीही या उपक्रमाचे स्वागत करत आयोजकांचे आभार मानले.

# जिल्ह्यात पटसंख्येअभावी जिल्हा परिषदेच्या दोन शाळांना टाळे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ जुलै**

हिंगोली येथील १९५२ पासूनची जिल्हा परिषद कन्या शाळा आणि औंढा नागनाथ येथील जिल्हा परिषद शाळांना पटसंख्येअभावी टाळे लावण्यात आले आहेत. शिक्षण विभागाच्या दुर्लक्षामुळे ही वेळ आल्याची चर्चा होत असून निपुण हिंगोली अभियानाला चपराक बसली आहे.

हिंगोली जिल्ह्यात शिक्षण विभागाकडून मागील काही वर्षात गुणवत्ता वाढीच्या नावाखाली विविध उपक्रम राबविले जात आहेत. त्यातून पटसंख्या वाढणे अपेक्षित असतांना तालुक्याच्या ठिकाणची असलेली औंढा नागनाथ येथील जिल्हा परिषद शाळा आणि हिंगोलीतील मुलींसाठी असलेली जिल्हा परिषद कन्या शाळा बंद करण्याची नामुष्की ओढवली आहे. हिंगोली तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थीनींची शिक्षणाची सोय व्हावी यासाठी जिल्हा परिषद कन्या शाळा सुरू करण्यात आली होती. हिंगोली शहरातील जुन्या भागात सुमारे ६० वर्षापूर्वी सुरू असलेल्या शाळेत शहरासह ग्रामीण भागातील विद्यार्थीनीची मोठी संख्या होती. त्यानंतर ही शाळा हिंगोली शहरातील बहुविध प्रशालेच्या बाजूला स्थलांतरीत झाली मात्र या शाळेतील पटसंख्येकडे शिक्षण खात्याचे दुर्लक्ष झाल्याने या शाळेची पटसंख्या यावर्षी २० पेक्षाही कमी झाली. शाळेत विषय शिक्षकांचा अभाव तसेच प्रभारी मुख्याध्यापक, अशैक्षणिक कामे, अपुरा शिक्षक वर्ग यामुळे या शाळेतील विद्यार्थीनींचे होणारे शैक्षणिक नुकसान यामुळे हळूहळू या शाळांमधून विद्यार्थीनींची संख्या कमी होत गेली. त्यातच इंग्रजी शाळांची वाढती संख्या आणि पालकांचा इंग्रजी शाळेकडे असलेला कल याही बाबी कारणीभूत असल्याचे बोलले जात आहे. आता या शाळेतील विद्यार्थीनींना बाजूला असलेल्या बहुविध प्रशालेत समावेश करावा लागला आहे.

औंढा नागनाथ येथे जिल्हा परिषदेची ५ ते १० पर्यंत शाळा होती. मात्र मागील चार ते पाच वर्षापासून या ठिकाणी इयत्ता आठवी ते दहावी पर्यंतच १० ते १५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. यावर्षी तर शाळेत एकही प्रवेश झाला नाही. त्यामुळे दोन्ही शाळांना टाळे ठोकण्याची वेळ आली आहे. जिल्हा परिषद शाळांमध्ये आवश्यक सोयीसुविधा देण्याची गरज आहे.

# वसमतमध्ये रात्रीच्या अंधारात मजुरांच्या भरवशावर रस्त्याचे काम? तक्रार अर्ज गुलदस्त्यात, स्थगितीनंतरही काम सुरूच

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २९ जुलै**



महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत वसमत शहरात मंजूर करण्यात आलेल्या एकूण २४ सिमेंट कॉंक्रीट रस्त्यांपैकी देशपांडे पेट्रोल पंप ते राम मंदिर हा रस्ता सध्या बांधकामाधीन आहे. मात्र, या कामाच्या गुणवत्तेबाबत नागरिकांकडून पुन्हा प्रश्न उपस्थित केले जात असून, यासंदर्भातील तक्रार अर्जांवर अद्याप ठोस कार्यवाही झाल्याचे स्पष्ट दिसून येत नसल्याची चर्चा आहे.

सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करताना आवश्यक ते खोदकाम, सबग्रेडची तयारी, आवश्यक तांत्रिक प्रक्रिया आणि त्यानंतरच कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम होणे अपेक्षित असते. मात्र, प्रत्यक्ष स्थळी जुन्या रस्त्यावरच नवीन कॉंक्रीट टाकून काम सुरू असल्याचे काही छायाचित्रांवरून दिसून येत असल्याचा दावा नागरिकांकडून केला जात आहे. दरम्यान, या योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या २४ रस्त्यांसाठी सादर करण्यात आलेल्या मूल्यांकन आराखड्याबाबतही नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले. काही रस्त्यांच्या मंजूर मोजमापांमध्ये आणि प्रत्यक्ष कामाच्या मोजमापांमध्ये तफावत असल्याची चर्चा असून, संपूर्ण प्रकरणाची तांत्रिक तपासणी करून वस्तुस्थिती स्पष्ट करण्याची मागणी होत आहे.

या योजनेअंतर्गत सुरू असलेल्या कामांबाबत विविध तक्रार अर्ज संबंधित कार्यालयांकडे सादर करण्यात आल्याचे सांगितले जात असले, तरी त्यावरील चौकशी अथवा कार्यवाहीबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे तक्रार अर्ज केवळ कागदावरच राहिले आहेत का? असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, मराठवाडा विभागीय आयुक्त कार्यालयाने संबंधित प्रकरणाची चौकशी करून चौकशीनुसार आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाला दिल्याची माहिती आहे. तसेच मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नांदेड यांनीही संबंधित कामे स्थगित करण्याचे निर्देश दिल्याचे सांगितले जात आहे, मात्र या निर्देशांनंतरही प्रत्यक्षात काही ठिकाणी काम सुरू असल्याचे चित्र समोर येत असल्याने, निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी झाली आहे का? याबाबत नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी काही वेळा केवळ मजुरांकडून काम सुरू असल्याचे, तर संबंधित तांत्रिक अधिकारी किंवा अभियंता उपस्थित नसल्याचेही स्थानिकांकडून सांगितले जात आहे. अशा परिस्थितीत कामाची गुणवत्ता आणि तांत्रिक निकषांची अंमलबजावणी कोणाच्या देखरेखीखाली होत आहे, याबाबतही चर्चा सुरू आहे.

याशिवाय, काम सुरू असलेल्या ठिकाणी वाहतुकीसाठी आवश्यक इशारा फलक, बॅरिकेड्स किंवा इतर सुरक्षा व्यवस्था पुरेशा प्रमाणात दिसून येत नसल्याची समोर आले आहे. तसेच काही मजूर सुरक्षा जॅकेट, हेल्मेट व इतर आवश्यक सुरक्षा साधनांशिवाय काम करत असल्याचेही प्रत्यक्ष पाहणाऱ्यांचे म्हणणे आहे.

सार्वजनिक निधीतून होत असलेल्या विकासकामांमध्ये गुणवत्ता, मंजूर आराखड्याचे पालन, तांत्रिक निकष आणि सुरक्षिततेच्या नियमांचे काटेकोर पालन होणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे मत आहे. स्थगितीचे निर्देश, तक्रार अर्ज आणि चौकशीच्या सूचनांनंतरही प्रत्यक्ष स्थितीमध्ये अपेक्षित बदल का दिसून येत नाही, तसेच याबाबत संबंधित विभागांची अधिकृत भूमिका काय आहे, याकडे आता वसमतकरांचे लक्ष लागले आहे.

# शासकीय निधीचा कोट्यवधींचा अपहार

## 'सेवार्थ' प्रणालीचा गैरवापर करत वैद्यकीय अधिकाऱ्याने तब्बल ३.२० कोटी रुपये स्वतःच्या खात्यावर वळवले

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २९ जुलै -**

किनवट तालुक्यातील मांडवी येथील ग्रामीण रुग्णालयात शासकीय निधीचा कोट्यवधी रुपयांचा अपहार झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. रुग्णालयाचे तत्कालीन प्रभारी वैद्यकीय अधीक्षक डॉ. विक्रम दासराव राठोड यांनी सेवार्थ प्रणालीचा गैरवापर करून तब्बल ३ कोटी २० लाख ९९ हजार ९५३ रुपयांचा शासकीय निधी स्वतःच्या वैयक्तिक बँक खात्यावर वर्ग केल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी नांदेडचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय माणिकराव पेरके यांच्या फिर्यादीवरून डॉ. राठोड यांच्यावर मांडवी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ग्रामीण रुग्णालय मांडवी येथील तत्कालीन वैद्यकीय अधीक्षक डॉ. एन. जी. लोकडे हे ३१ मे २०२३ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानंतर वैद्यकीय अधिकारी डॉ. विक्रम दासराव राठोड यांच्याकडे आहरण व संवितरण अधिकारांसह वैद्यकीय अधीक्षक पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला होता.

या पदावर कार्यरत असताना डॉ. राठोड यांनी जुन्या सेवार्थ प्रणालीतून नवीन प्रणालीत डेटा मायग्रेशन प्रक्रियेचा गैरफायदा घेतला. माहे जून २०२४ ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत मुळ वेतन थकबाकी पोटी चुकीच्या व बनावट नोंदी प्रणालीत दाखल केल्या. यानंतर उपकोषागार कार्यालय किनवट येथून ही बनावट देयके मंजूर करून घेत कोट्यवधींची रक्कम स्वतःच्या वैयक्तिक खात्यावर वळवली.

जिल्हा कोषागार अधिकारी, नांदेड यांच्या १५ जुलै २०२६ च्या पत्रावरून हा प्रकार प्रथम उघडकीस आला. त्यानंतर आरोग्य सेवा लातूर मंडळाचे उपसंचालक यांच्यामार्फत या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली. या अहवालात डॉ. राठोड यांनी ३,२०,९९,९५३ रुपयांचा अपहार केल्याचे स्पष्ट सिद्ध झाले.या अहवालाच्या अनुषंगाने लातूर उपसंचालकांनी दिलेल्या आदेशानुसार, नांदेडचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके यांनी मांडवी पोलीस ठाण्यात डॉ. राठोड यांच्याविरोधात अधिकृत तक्रार दिली. या तक्रारीवरून मांडवी पोलिसांनी दि. २८ रोजी डॉ. विक्रम दासराव राठोड यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३१६(५), ३१८(२), ३३६(२) आणि ३३८ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

या हायप्रोफाईल प्रकरणाचा पुढील तपास मांडवी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गंगाधर नामदेवराव गायकवाड करत आहेत. सरकारी यंत्रणेत घडलेल्या या प्रकारामुळे संपूर्ण वैद्यकीय व शासकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे.

## रुग्णालय सहाय्यकाने अधिक खर्च दाखवून केला ४४ लाखांचा अपहार; गुन्हा दाखल

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. २९ जुलै -**

हदगाव उपजिल्हा रुग्णालयातील सहाय्यक अधीक्षक संतोष सोपान दरगु यांनी स्वतःच्या फायद्यासाठी शासकीय रकमेतून ४४ लाख १२ हजार पाचशे रुपये स्वतःच्या खात्यात वळवून घेतले होते. अंतर्गत तपासणी मध्ये ही बाब लक्षात येताच वैद्यकीय अधीक्षक संदीप दरबस्तवार यांनी संबंधितांकडून ही रक्कम परत खात्यात जमा करून घेतली. परंतु झालेल्या अपहाराच्या घटनेवरून जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके यांच्या फिर्यादीवरून हदगाव पोलीस ठाण्यात दि. २८ जुलै रोजी उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला.

हदगाव उपजिल्हा रुग्णालय कार्यरत असलेले सहाय्यक अधीक्षक तथा वरिष्ठ लिपिक डॉ. संतोष सोपान दरगु यांनी आपल्या वैयक्तिक फायद्यासाठी फेब्रुवारी २०२५ ते एप्रिल २०२६ या कालावधी मधील बेसिक एरियस थकबाकीची रक्कम ४४ लाख १२ हजार पाचशे रुपये दाखवून स्वतःच्या खात्यामध्ये वळती केली.

सदर बाब अंतर्गत तपासणीमध्ये लक्षात आल्यावर वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर संदीप हनुमंतराव दरबस्तवार यांनी संबंधितांकडून ही रक्कम परत वसूल करून खात्यात जमा करावयास लावली. परंतु जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयातील तपासणीमध्ये ही बाब निदर्शनास आल्यामुळे जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर संजय माणिकराव पेरके यांनी हदगाव पोलीस ठाण्यात येऊन तक्रार दिली यावरून हदगाव पोलीस ठाण्यात वरील अपहार प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला. विशेष म्हणजे हदगाव उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर संदीप दरबस्तवार यांनी लक्ष न देता बिलावर सह्या केल्यामुळे ते या प्रकरणात दोषी धरल्या गेले. त्यांना सुद्धा याप्रकरणी सह आरोपी करण्यात आले आहे. सदर प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक शिवाजी शिंदे हे करत आहेत.

### संतोष कन्या प्राथमिक शाळेत भक्तिमय वातावरणात दिंडी सोहळा

**नांदेड** -आषाढी एकादशीच्या औचित साधून सिडको नवीन नांदेड वाघाळा येथील संतोष कन्या शाळेत दिंडी सोहळ्याचे उत्साह पूर्ण आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषा परिधान करून टाळ, मृदंग, वीणा व भगव्या पताका घेऊन हरिनामाचा गजर करत दिंडी काढली ज्ञानोबा - तुकाराम पुंडलिक वरदे हरी विठ्ठल या जय घोषानी परिसर भक्तीमय झाला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक गणेश ढगे यांनी विद्यार्थ्यांना वारकरी संप्रदायाची परंपरा संतांचे विचार आणि संस्काराचे महत्त्व सांगून मार्गदर्शन केले. या दिंडी कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन शिक्षिका अश्विनी आवळे यांच्या मार्गदर्शनाखाली भक्तिमय बाल दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. हा दिंडी सोहळा यशस्वी आयोजनासाठी शिक्षक संजय सिद्धापुरे, ईश्वर धुळगंडे, शिक्षिका सौ. वर्षा देशमुख मॅडम यांनी विशेष परिश्रम घेतले. या भक्तिमय दिंडी सोहळ्यास पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उस्फुर्त प्रतिसाद दिला.या दिंडी सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये भक्ती,संस्कार,आणि भारतीय सांस्कृतिक परंपरेबद्दल आदरभाव निर्माण झाला.



### धम्मगुरू भदंत पंय्याबोधी थेरो यांच्या १७ व्या वर्षावासास प्रारंभ

**नांदेड**-येथील अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष तथा धम्मगुरू संघनायक भदंत पंय्याबोधी थेरो यांच्या १७ व्या वर्षावास काळास आषाढ पौर्णिमेचे औचित्य साधून तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात प्रारंभ करण्यात आला. याबरोबरच त्यांचे शिष्य श्रामणेर भिक्खु शिलधम्मो, भिक्खु श्रध्दानंद, भिक्खु सारिपुत्त, भिक्खु सुबोधी यांचा पहिला वर्षावास अधिष्ठान प्रारंभ करण्यात आला. तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात भदंत पंय्याबोधी थेरो यांच्या १७ व्या वर्षावास अधिष्ठान कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला. बुद्धगया येथे महाबोधी विहाराच्या भव्य विपश्यना केंद्रामध्ये भदंत डॉ. उपगउप्त महाथेरो आणि भदंत प्रज्ञादीप महाथेरो आणि देशोदेशीच्या १२ भिख्खूंसह महाराष्ट्रातील २३० बौद्ध भिक्षू उपासक उपासिकांच्या उपस्थितीत भदंत पंय्याबोधी थेरो यांची १४ नोव्हेंबर २००९ रोजी ब्रम्हदेश येथील भदंत चंद्रबोधी महास्थवीर यांच्या हस्ते उपसपंदा करण्यात आली होती. पंय्याबोधी यांचा तेव्हापासून अखंड वर्षावास सुरू आहे. आषाढ पौर्णिमेला हा वर्षावास सुरू होऊन आश्विन पौर्णिमेला तो समाप्त होईल.



### श्रीकांत वारे यांचा राष्ट्रीय स्तरावर गौरव

**नांदेड**-येथील सुपुत्र श्रीकांत मलिकार्जुन वारे यांना 'द टाइम्स ऑफ इंडिया' आयोजित 'ET Enterprise Security wards 2026' मध्ये Rising Star of the Year या प्रतिष्ठित राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. मुंबई येथे झालेल्या एका विशेष सोहळ्यात अमृता फडणवीस यांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. श्रीकांत वारे यांना सायबर सुरक्षा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य, उत्कृष्ट नेतृत्व आणि नाविन्यपूर्ण योगदानाची दखल घेऊन हा राष्ट्रीय सन्मान देण्यात आला आहे. त्यांच्या या घवघवीत यशामुळे हंगरगा गावासह संपूर्ण मुखेड तालुक्याचा आणि नांदेड जिल्ह्याचा गौरव वाढला आहे. या अद्वितीय यशाबद्दल श्रीकांत वारे यांच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



## वाहतूक नियमांचे पालन ही काळाची गरज : जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २९ जुलै -**

रस्ते अपघातांचे वाढते प्रमाण रोखण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक नियमांविषयी जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने नांदेड येथील महात्मा फुले हायस्कूल येथे मंगळवारी (दि. २८) विशेष वाहतूक सुरक्षा जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी विद्यार्थ्यांना सुरक्षित वाहतुकीचे महत्त्व समजावून सांगत, वाहतूक नियमांचे पालन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे प्रतिपादन केले.




कार्यक्रमात सेफ इंडिया रोड्स व अँटीकरप्शन टीम इंडियाचे डायरेक्टर घनश्याम ओझा, वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक जासपाल सिंग कोर्टतीर्थवाले, पोलीस उपनिरीक्षक अजय साखळे उपस्थित होते.


यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी विद्यालयातील विज्ञान विभाग, क्रीडा विभाग आणि अटल टिंकरिंग लॅबमधील नाविन्यपूर्ण उपक्रमांची पाहणी करून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे विशेष कौतुक केले. शिस्तबद्ध वातावरण, अभ्यासासोबतच विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय सहभाग आणि विद्यार्थ्यांची सर्जनशीलता पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमादरम्यान या शाळेचे सहशिक्षक, मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य आणि साहित्यिक डॉ. राम वाघमारे यांनी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांना त्यांच्या स्वलिखित पाच पुस्तकांचा संच भेट देत त्यांचा सन्मान केला. जिल्हाधिकाऱ्यांनी या साहित्यकृतींचे कौतुक करत डॉ. वाघमारे यांच्या साहित्यसेवेचे अभिनंदन केले. या कार्यक्रमास उपमुख्याध्यापक डॉ. अण्णा गरड, पर्यवेक्षक एस. व्ही. जाधव, शिक्षकवृंद तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## आदमपूरच्या सम्यक भुसावळेची जेईई परीक्षेत धारवाड येथे निवड

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि. २९ जुलै -**

बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथील सर्वसामान्य कुटुंबातील युवक सम्यक रघुनाथ भुसावळे सन २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या जेईई अॅडव्हान्स्ड परीक्षेत पात्र झाला आहे.सदरील परीक्षेत त्याची ऑल इंडिया रँक २९४४७ तर अनुसूचित जाती प्रवर्ग ऑल इंडिया रँक १०३६ अशी आलेली आहे.



अनुसूचित जाती प्रवर्गातून त्याची पहिल्याच फेरीत देशातील नामांकित कर्नाटक राज्यातील जिल्हा धारवाड येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी महाविद्यालयात निवड झाली आहे. सम्यक भुसावळे याचे प्राथमिक शिक्षण जि.प.वरिष्ठ प्राथमिक शाळेत तर माध्यमिक महाळप्पा पटने विद्यालय आणि उच्च माध्यमिक शिक्षण सौ.मंजुळाबाई खतगांव महाविद्यालयात झाले आहे.पुढील डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट बार्टी,पुणे अंतर्गत स्पेक्ट्रम अकॅडमी छत्रपती संभाजीनगर येथून जेईई अॅडव्हान्स्ड चे क्लासेस त्याने पूर्ण केले आहे.

जेईई अॅडव्हान्स्ड ही देशातील सर्वोच्च अभियांत्रिकी संस्था असलेल्या आयआयटी मध्ये प्रवेश मिळविण्यासाठी घेतली जाणारी अत्यंत प्रतिष्ठित आणि कठीण परीक्षा मानली जाते.यात भौतिकशास्त्र,रसायनशास्त्र आणि गणित विषयांचा समावेश असतो.जेईई मेन परीक्षेत सर्वाधिक गुण प्राप्त करणारे विद्यार्थी अॅडव्हान्स्डसाठी पात्र असतात.या यशाबद्दल मार्गदर्शक आई, वडील, भुसावळे कुटुंबीय, आदमपूर गावकरी,प्रतिष्ठित नागरिक, मित्र परिवार,पत्रकार, महाळप्पा पटने विद्यालय कर्मचारी,व्यावसायिक शिक्षक आदिंनी सम्यक चे अभिनंदन केले आहे.

## शेतकरी बांधवांनी तातडीने पिक विमा योजनेत सहभागी व्हावे : संदीप पावडे

**तभा वृतसेवा**
**चुडावा, दि. २९ जुलै -**

प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप हंगाम सन २०२६ अंतर्गत पिक विमा भरणे चालू असून पिक विमा नोंदीची अंतिम तारीख ३१ जुलै २०२६ आहे. ज्या शेतकऱ्यांना पिक विमा योजनेमध्ये सहभागी व्हायचे आहे त्यांनी लवकरात लवकर सहभागी व्हावे, असे आवाहन शिवसेना सो.मी. जिल्हाप्रमुख तथा युवासेना लोकसभा सचिव संदीप पावडे यांनी केले आहे.

यंदा जिल्ह्यात पाऊस कमी आहे सध्या अनेक भागात पावसाचे नितांत गरज आहे. पुढील काळातही कमी पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे याचा परिणाम खरिपातील पिकांवर होत आहे. उत्पादनात घट येण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत पिक विमा संरक्षण गरजेचे आहे.पिक विमा भरण्याची अंतिम दिनांक ३१ जुलै २०२६ असुन शेवटच्या दिवसांची वाट न बघता मागील काही वर्षांचा अनुभव बघता पिक विमा नोंदणीच्या शेवटच्या हप्त्यामध्ये शेतकऱ्यांची गर्दी होते परिणामी पिक विमा पोर्टलवर प्रचंड ताण येऊन पोर्टल हळू होते किंवा पिक विमा भरतांना अडचणी येतात, त्यामुळे सर्व शेतकरी बाधवांनी पिक विमा नोंदणीच्या अंतिम मुदतीची वाट न बघता आपले जवळचे ग्राहक सेवा केंद्रामध्ये, बँकेमध्ये किंवा स्वतः शेतकरी यांनी पिक विमा पोर्टलवर पिक विमा उतरवून घ्यावा असे मत त्यांनी व्यक्त केले आहे.



## राष्ट्रीय खाद्यतेल अभियानांतर्गत मिनी ऑइल मिलसाठी महाडीबीटीवर अर्ज करण्याचे आवाहन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २९ जुलै -**

राष्ट्रीय खाद्यतेल अभियान (तेलबिया) अंतर्गत मिनी ऑइल मिल/एक्सपेलर (फिल्टर प्रेससह व फिल्टर प्रेसशिवाय) या घटकासाठी इच्छुक वैयक्तिक शेतकरी व शेतकरी उत्पादक कंपन्यांनी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.

राष्ट्रीय खाद्यतेल अभियानांतर्गत या घटकाची अंमलबजावणी कृषी यांत्रिकीकरण उपअभियानाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार करण्यात येणार आहे. लाभार्थी निवडीसाठी महाडीबीटी पोर्टलवर प्राप्त झालेल्या अर्जांमधून प्रथम शेतकरी उत्पादक कंपन्यांना प्राधान्य देण्यात येणार असून, त्यानंतर लक्षांक शिल्लक राहिल्यास वैयक्तिक शेतकऱ्यांना लाभ देण्यात येईल.

नांदेड जिल्ह्यास या योजनेअंतर्गत एकूण २४ युनिट्सचा लक्षांक प्राप्त झाला आहे. त्यापैकी मिनी ऑइल मिल/एक्सपेलर (फिल्टर प्रेससह) या घटकासाठी १२ युनिट्स असून प्रति युनिट रु. ४ लाख इतकी उच्चतम अनुदान मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. तसेच मिनी ऑइल मिल/एक्सपेलर (फिल्टर प्रेसशिवाय) या घटकासाठी १२ युनिट्स असून प्रति युनिट रु. ३ लाख इतकी उच्चतम अनुदान मर्यादा आहे.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्पभूधारक, सीमांत शेतकरी व महिला लाभार्थ्यांना युनिटच्या किमतीच्या ५० टक्के किंवा निर्धारित उच्चतम मर्यादेपर्यंत, तर सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थ्यांना युनिटच्या किमतीच्या ४० टक्के किंवा निर्धारित उच्चतम मर्यादेपर्यंत अनुदान देण्यात येणार आहे.

महाडीबीटी पोर्टलवर 'प्रथम अर्ज, प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. त्यामुळे इच्छुक वैयक्तिक शेतकरी व शेतकरी उत्पादक कंपन्यांनी विलंब न करता https://mahadbt.maharashtra.gov.in/Farmer/griLogin या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज सादर करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.

## विष्णुपूरी उड्डाण पुलाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी कंपनीवर कारवाई करण्याची मागणी

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २९ जुलै -**

विष्णुपुरी येथील उडान पुलाच्या दुर्घटनेची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी कंपनीवर कारवाई करण्याची मागणी आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ (तुळजापूर-बट्टी बोरी) वरील लोहा-वारंगा मार्गखंडात विष्णुपुरी गावाजवळील वाहन अंडरपासची रिटेनिंग वॉल कोसळल्याच्या गंभीर घटनेची उच्चस्तरीय तांत्रिक चौकशी करण्यात यावी. तसेच निकृष्ट दर्जाच्या कामासाठी जबाबदार असलेल्या M/s KTIL या बांधकाम संस्थेविरुद्ध कठोर कारवाई करून तिला तात्काळ काळ्या यादीत टाकण्यात यावे, अशी ठाम मागणी नांदेड दक्षिणचे आमदार आनंदराव बोंढारकर यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली आहे.

यासंदर्भात आज दिल्लीत आ. बोंढारकर यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली . या भेटीत दिलेल्या निवेदनात सार्वजनिक निधीतून उभारण्यात आलेल्या महत्त्वाच्या प्रकल्पांमध्ये दर्जाहीन कामकाज होत आहे. विष्णुपुरी येथील उडान पूलची रिटेनिंग वॉल कोसळल्याने बांधकामाच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले असून या प्रकरणाची निष्पक्ष आणि उच्चस्तरीय तांत्रिक चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. अशी मागणी करतानाच , नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या रस्ते व पुलांच्या कामांना केंद्रीय मार्ग निधी (CRF) योजनेअंतर्गत प्रशासकीय मान्यता देऊन आवश्यक निधी तातडीने उपलब्ध करून देण्याचीही त्यांनी मागणी केली आहे.आ. बोंढारकर यांनी प्रमुख जिल्हा मार्ग (एमडीआर)-२८ वरील कारखाना - सायाळ- पारडी पोखर- भोसी मार्गावर कि.मी. ०/५०० ते १/५०० दरम्यान नवीन पुलाचे बांधकाम.



राष्ट्रीय महामार्ग-३६१ ते मुसलमानवाडी-पिपळगाव - शेवडी-धानोरा-माळाकोळी मार्गावरील भणगी गावाजवळ मोठ्या पुलासह जोडरस्त्याचे बांधकाम करावे. मुसलमानवाडी - जुना कल्हाळ - विष्णुपुरी -पांगरी -असवदन -गोपालचावडी- किकी- राहेगाव (एमडीआर-२९) मार्गाचे सुदृढीकरण तसेच किकी गावाजवळ मुख्य पुल व जोडरस्त्याचे बांधकाम करावे अशी मागणी त्यांनी केली आहे.

या सर्व विकासकामांना मंजुरी मिळाल्यास नांदेड दक्षिण मतदारसंघातील ग्रामीण भागातील दळणवळण अधिक सुरक्षित, वेगवान व सुलभ होईल. तसेच शेतकरी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास आ. आनंदराव बोंढारकर यांनी व्यक्त केला आहे.

## अवैध रेती वाहतुकीचा पर्दाफाश; मुदखेड पोलिसांच्या कारवाईत ३५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २९ जुलै -**

नांदेड जिल्ह्यात अवैध वाळू उपसा तसेच अवैध वाहतुकीला आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या आदेशानुसार जिल्ह्यात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत मुदखेड पोलिसांनी अवैध गौण खनिज (रेती) वाहतूक करणाऱ्या हायवा वाहनावर कारवाई करत वाहनासह एकूण ३५ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. २७ जुलै २०२६ रोजी रात्री सुमारे १०.५० वाजण्याच्या सुमारे प्रभारी अधिकारी मुदखेड व त्यांचे पोलीस पथक पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण, अवैध धंद्यांवर कारवाई करण्यासाठी पेट्रोलिंग करीत असताना पक्षांस वासरी चौक ते आमदुरा रोड या मार्गावरून अवैध रेती वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली. माहितीची खातरजमा करून पोलिसांनी तात्काळ वासरी चौक रोडवर नाकाबंदी केली.

यावेळी संशयित हायवा वाहन थांबवून चालकाची चौकशी केली असता त्याने आपले नाव संदीप विलास कदम (वय २६ वर्षे, रा. पन्याभाडी, ता. जि. नांदेड) असे सांगितले. सदर हायवा वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये अवैधरीत्या रेती वाहतूक केली जात असल्याचे निदर्शनास आले.



पोलिसांनी सदर कारवाईत हायवा क्रमांक चक-१४ चझ-४२६४, अंदाजे किंमत ३५ लाख रुपये, तसेच त्यामध्ये असलेली अंदाजे ५ ब्रास रेती, अंदाजे किंमत २५ हजार रुपये, असा एकूण ३५ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल पंचांसमक्ष जप्त केला.या प्रकरणी मुदखेड पोलीस ठाणे गु.र.नं. १४१/२०२६, कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता तसेच कलम ४७ व ४८ महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई ,नांदेड चे पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या आदेशाने धिरज चव्हाण, पोलीस निरीक्षक व त्यांच्या पथकाती पोलीस अंमलदार दिलीप चक्रधर, कदम, पवार, वाजीद सर्व नेमणुक पोलीस स्टेशन मुदखेड यांनी पार पाडली आहे.

नांदेड जिल्ह्यात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीविरुद्ध यापुढेही कठोर कारवाई सुरूच राहणार असून, नागरिकांनी अशा प्रकारच्या अवैध कृत्यांची माहिती पोलिसांना देऊन सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस जाहीररित्या कळविण्यात येते की, अर्जदार फयाजउल्लाह खां. मोहम्मद फारूख खां. व इतर रा. ह.मु. अरब गल्ली नांदेड यांनी मौ. म्हाळजा जि. नांदेड येथील सर्वे नं. १६/१ क्षेत्र ० हे. ३०.३५ आर या जमिनीचे हैद्राबाद ईनाम निर्मुलने व रोख अनुदाने कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषक प्रयोजनासाठी झालेले हस्तांतरण नियमीत करून भोगवटदार वर्ग २ चे भोगवटदार वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबतचा विनंती अर्ज केलेला आहे.
तेंव्हा मौ. म्हाळजा जि. नांदेड येथील सर्वे नं. १६/१ क्षेत्र ० हे. ३०.३५ आर या जमिनीचे हैद्राबाद ईनाम निर्मुलने व रोख अनुदाने कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषक प्रयोजनासाठी झालेले हस्तांतरण नियमीत करून भोगवटदार वर्ग २ चे भोगवटदार वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबत कोणाचा काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप अर्ज सादर करावा.
विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरच्या रुपांतरण प्रकियेस कुणाचाही आक्षेप नाही, असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.
तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**उपजिल्हाधिकारी (सामान्य)**
**जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड**

लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# अपुऱ्या पावसातही न खचता उजेड शिवारात सोयाबीनची अंतरमशागत; शेतकरी बालाजी जाधव यांचा जिद्दीचा आदर्श



उजेड ता शिरूर अनंतपाळ यंदाच्या खरीप हंगामात अपुऱ्या पावसामुळे उजेड शिवारातील सोयाबीन पिकाची वाढ अपेक्षेप्रमाणे होत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. वेळेवर व पुरेशा प्रमाणात पाऊस न झाल्याने पिकांची उगवण आणि वाढ दोन्हीवर परिणाम झाला आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीतही येथील शेतकरी बालाजी जाधव यांनी हार न मानता आपल्या सोयाबीन पिकात अंतरमशागतीच्या कामाला सुरुवात केली आहे. अंतरमशागतीमुळे पिकाभोवतीची माती भुसभुशीत राहते, तणांचे नियंत्रण होते तसेच पावसाचे पाणी जमिनीत अधिक प्रमाणात मुरण्यास मदत होते. त्यामुळे पुढील काळात चांगला पाऊस झाल्यास पिकाच्या वाढीस त्याचा निश्चितच फायदा होईल, असा विश्वास शेतकरी व्यक्त करत आहेत.

यावेळी शेतकरी बालाजी जाधव म्हणाले, "शेत पिको अथवा न पिको, पण शेतीसाठी ठरलेली कामे वेळेवर करणे हे प्रत्येक शेतकऱ्याचे कर्तव्य आहे. निसर्ग आपल्या हातात नसला तरी मेहनत मात्र आपल्या हातात आहे. त्यामुळे परिस्थिती कितीही कठीण असली तरी शेतीतील आवश्यक कामांमध्ये कसूर करता कामा नये."

अपुऱ्या पावसामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकटाचे सावट असले तरी बालाजी जाधव यांच्यासारखे शेतकरी जिद्द, चिकाटी आणि आशावाद कायम ठेवून शेतीची कामे सुरू ठेवत असल्याने इतर शेतकऱ्यांसाठीही ते प्रेरणादायी ठरत आहेत. आता सर्वांचे लक्ष आगामी पावसाकडे लागले असून, वेळेवर चांगला पाऊस झाल्यास सोयाबीन पिकाला नवसंजीवनी मिळण्याची आशा व्यक्त केली जात आहे.

## विविध वृत्त

### पुढील तीन दिवसात जिल्ह्यात पाऊस

**लातूर दि.29 जुलै :** बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्या मुळे29 ते31 जुलै दरम्यान लातूरसह उत्तर मराठवाडा आणि राज्यातील विविध भागांत पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. या काळात विदर्भ, खानदेश, कोकण आणि मध्य महाराष्ट्रात मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता आहे. यावेळी सखल भागात पाणी साचणे, नदी - नाल्यांना पूर येणे आणि वाहतूक विस्कळीत होण्याचा धोका असून घाट परिसरात दरड कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे

### बसचे स्टिअरिंग ओढणे पडले महागात: प्रवाशावर गुन्हा दाखल

**लातूर दि29 जुलै :** लातूर - औसा महामार्गावरील चांदेश्वर परिसरात बसचा एक विचित्र अपघात झाला होता. एका मनोरुग्ण प्रवाशाने चालत्या बसचे सिअरिंग अचानक ओढल्याने चालकाच नियंत्रण सुटल्याने बसने रस्त्यालगन उभ्या असलेल्या स्कूल बसला धडक दिली . याप्रकरणी एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यानी दिलेल्या तक्रारीनुसार ग्रामीण पोलीस ठाण्यात कारवाई करण्यात येऊन मनोज हनुमंत खडके या प्रवाशांच्या विरुद्ध कलम125 ए - बी आणि324 - ५ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस पुढील तपास करत आहेत.

### थकबाकीदारांवर आता मनपाची जप्ती मोहीम

**लातूर दि29 जुले :** लातूर महानगर पालिकेने मालमत्ता कराच्या वसुलीसाठी आता कंबर कसली असून शहरात1490 बड्या मालमत्ता धारकांकडे प्रत्येकी1 लाख रुपयांपेक्षा अधिक कर थकीत असून मनपा तर्फे झोन निहाय विशेष पथके तैनात केली जाणार आहेत . शहराचे रस्ते, गटारी, पाणी, पथदिवे आणि स्वच्छते सारखी कामे करण्यासाठी मालमत्ता करावरच अवलंबून रहावे लागते . तसेच मनपाच्या कर्मचाऱ्यांच्या पगारी ही यातूनच होत असतात . बड्या थकबाकीदारांच्या टाळाटाळीमुळे विकास कामांना खीळ बसत असून याचा नाहक फटका नियमित कर भरणाऱ्या सामान्य नागरिकांना बसत आहे . मनपा प्रशासनाने गेल्या दिड वर्षात 7 वेळा दंड माफी योजना राबविली आहे .23 जुलै पर्यत6500 सामान्य नागरिकांनी याचा लाभ घेतला . मात्र बड्या थकबाकी धारकांनी या योजनेकडे पाठ फिरविली आहे . त्यामुळे आता1 ऑगस्ट पासून1490 बड्या थकबाकीदारांवर धडक कारवाई केली जाणार आहे . कर न भरल्यास थेट नळजोडणी तोडणे, मालमत्ता सील करणे आणि शेवटी जप्तीची कारवाई केली जाणार असल्यामुळे थकबाकीदारांनी वेळेत थकबाकी भरून आपली होणारी जप्ती टाळावी, असे आवाहन मनपा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे

### धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा; विद्यार्थी एकजुटीचा विजय - सिकंदर शेख

**उदगीर :** नीट (NEET) परीक्षांमध्ये पेपर फुटींमुळे अनेक मुलांनी आत्महत्या केल्या.या मुळे दिल्ली येथे जंतर मंतर मैदानावर सोनम वांगचुक यांनी उपोषण केले. अभिजीत दीपके यांनी नेतृत्वाखाली देशातील विध्यार्थी आंदोलन केले.या आंदोलनात अनेक विद्यार्थ्यांवर लाठी हल्ला केला.याच्या विरोधात देश संपूर्ण विध्यार्थी एकजूट झाले.देशातील सर्व राज्यातून विद्यार्थी जन रेट्यापुढे सरकारला झुकावे लागले शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा द्यावा लागला हा विद्यार्थी एकजुटीचा विजय आहे, अशी भावना सिकंदर शेख यांनी व्यक्त केली. देश भक्त सोनम वांगचुक यांनी उपोषण केले. त्यांनी २६ दिवस उपोषण करून एक आदर्श निर्माण केला तसेच अभिजित दिपके यांनी या आंदोलनाचे नेतृत्व केले देशात आज संपूर्ण विद्यार्थी आंदोलनाचा चेहरा म्हणून सोनम वांगचुक व अभिजीत दीपके यांचं नेतृत्व संपूर्ण देशातील विद्यार्थ्यांनी स्वीकारले.आज सोनम वांगचुक व अभिजीत दीपके हे आंदोलनाचे हिरो ठरले आहेत. देशात जंतर मंतर मैदानावरील सरकारने केलेल्या लाठी हल्लायामुळे काश्मीर ते कन्याकुमारी व आसाम ते मुंबई संपूर्ण देश एक झाला सर्वांनी एकत्र येऊन धरणे, निदर्शने, मोर्चा,रॅली,आंदोलने करून सरकारवर दबाव आणला. या मध्ये देशात संपूर्ण युवक विद्यार्थी एकत्र येऊन सरकारला विद्यार्थी पुढे झुकावे लागले.शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा द्यावा लागला.हा विध्यार्थी एकजुटीचा विजय आहे,असे महाराष्ट्र जनएकता संघटने जिल्हा कार्यांध्यक्ष ईस्माइल मनिरयार जिल्हा उपाध्यक्ष परवेज शेख उदगीर तालुका अध्यक्ष सिकंदर भैय्या शेख तालुका कार्यांध्यक्ष गोसोद्दिन शेख यांनी सागीतले..

सोलापूर तरुण भारत Solapur Tarun Bharat
छोट्या जाहिराती/जाहीर प्रगटन /
इतर जाहिराती योग्य दरात छापल्या
जातील संपर्क –७३८५५६७०३१

# वृक्ष लागवड व संगोपन चळवळ गतिमान होणे काळाची गरज : डॉ. सोमनाथ यादव

**जळकोट प्रतिनिधी :** हजारो वर्षापासून पृथ्वीवरील वाढलेली जंगले माणसाने केवळ गेल्या एका शतकात उध्वस्त केली. त्यामुळे परिस्थिती एवढी मोडकळीस आली. याचा परिणाम प्राणी आणि मानवी जीवनावर झाला. सद्य:स्थितीत त्यामुळे जगात कुठे उष्णतेची लाट, कुठे भूकंप, तर कुठे ज्वालामुखीचा प्रकोप होतो आहे. या बदलाचा परिणाम वनस्पतीवर अधिक झाला असून काळाच्या ओघात बऱ्याच वनस्पती नामशेष होत आले आहेत.

राहिलेल्या वनस्पतीमध्ये पृथ्वीचे नंदनवन करण्याची प्रचंड शक्ती आहे, त्यामध्ये वाढती लोकसंख्या आणि नागरिकांच्या विस्ताराच्या प्रमाणात वृक्ष लागवड झाली नाही तर आज निर्माण झालेले विविध आजार याचाही माणसांना मनस्ताप झाल्याशिवाय राहणार नाही, वनस्पती हाच तर प्राणीमात्राचा प्रमुख जीवनस्रोत आहे. त्यामुळे वृक्ष चळवळ अधिक किमान करणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन मत्स्य विज्ञान महाविद्यालयाचे प्रभारी सहयोगी अधिष्ठाता डॉ सोमनाथ यादव यांनी केले.



जळकोट तालुक्यातील अतनूर येथे जनक्रांती डोंगरी विकास बहुउद्देशीय सेवाभावी संस्था अतनूर, ग्राहक जनजागरण व मार्गदर्शन संस्था समिती महाराष्ट्र राज्य व साधूराम ग्रामीण विकास बहुउद्देशीय सेवाभावी संस्था अतनूर या संस्थेच्या वतीने दि.२८ जुलै मंगळवार रोजी जागतिक निसर्ग संवर्धन दिनानिमित्ताने मौजे अतनूर येथे नुकतेच डॉ.सोमनाथ यादव यांच्या हस्ते राज्य मार्ग क्रमांक २६८, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्रात व अतनूर-गव्हाण राज्य मार्ग क्रमांक २६८ दुतर्फा मार्गावरील आजूबाजूला व शेतकऱ्यांच्या बांधावर वृक्ष लागवड, वृक्षारोपण व संगोपनासाठी व्यापक प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात आली. पुढे बोलताना ते म्हणाले, आधुनिक काळात निर्माण झालेल्या विविध प्रश्नामध्ये वाढते तापमान, हवेचे प्रदूषण यासारख्या गंभीर समस्यांना भविष्यात सगळ्याच प्राणीमात्रांना सामोरे जावे लागेल यासाठीही वृक्ष लागवड आणि जोपासन ही उपक्रम राबविणे गरजेचे आहे.

यावेळी गावातील जेष्ठ नागरिकांचा पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमासाठी मुख्य संयोजक वृक्षमित्र चळवळीचे समाजसेवक तथा दलित मित्र बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर, हिप्पळनारीच्या सरपंच श्रीमती इंदरबाई रामचंद्र शिंदे, संस्थेचे पदाधिकारी चंद्रकांत शिंदे, ग्राहक जनजागरण व मार्गदर्शन समिती संस्था महाराष्ट्र राज्य संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बी.जी.शिंदे, माजी सैनिक शिवाजी कदम, गुरुनाथ कापसे, ग्रामपंचायत सदस्य तुळशीराम कोडरूळ, संस्थेचे गणेश कोडरूळ, व इतर नागरिक, संस्थेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रीराम विद्यालयाचे तेरा विद्यार्थी स्कॉलरशिपसाठी पात्र

रेणापूर -श्रीराम प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय रेणापूरचे तेरा विद्यार्थी चौथी व सातवी स्कॉलरशिप परीक्षेत शिष्यवृत्तीस पात्र झाले . या विद्यार्थ्यांचा आज दि . २८ जुलै रोजी मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये पालकांसमवेत सत्कार संपन्न झाला . रेणुका शिक्षण संस्थेचे अध्यक्ष देविदासराव कुटवाड , सचिव ॲड पंडितराव उगिले व सर्व संचालक मंडळींनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले .या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्रीराम माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य अनिल कुटवाड उपस्थित होते . तर प्रमुख अतिथी म्हणून श्रीराम प्राथमिक विद्यामंदिरचे मुख्याध्यापक चंचला वलसे,उपप्राचार्य प्रा. भरत धायगुडे ,पर्यवेक्षक प्रा . जुबेर खान पठाण,सांस्कृतिक विभाग प्रमुख अमृतेश्वर स्वामी,क्रीडा विभाग प्रमुख विवेक भातिकरे यांची उपस्थिती होती . संगीत विभाग प्रमुख महादेव बन यांनी सुंदर स्वागत गीत सादर केले .४थी स्कॉलरशिप परीक्षेत श्रवण सप्ताळ ,समृद्धी कांबळे, स्वप्नाली शिंदे ,अर्पिता बंडे हे विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र झाले तर७वी स्कॉलरशिप परीक्षेत मानसी गोरे,सिद्धी डावळे ,श्रीनाथ इरकटे,दिव्या साखरे ,सृष्टी इंदापूरे,शंकर भातीकरे, सारंग चव्हाण, ,अन्वेशा गिरी ,समीक्षा सुडे हे विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र झाले . या विद्यार्थ्यांचा शाल व पुस्तक भेट देऊन पालकांच्या समवेत सत्कार करण्यात आला . याप्रसंगी बोलताना प्राचार्य अनिल कुटवाड म्हणाले की 42 वर्षाची यशाची व गुणवत्तेची परंपरा आहे .यामागे पालकांचा विश्वास व गुरुजनांचे परिश्रम महत्त्वाचे आहेत . यापुढेही गुणवत्तेची परंपरा अशीच कायम राहील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला . याप्रसंगी मार्गदर्शक अमृतेश्वर स्वामी,प्रशांत कोष्टी,निलेश उगीले,कल्पना खंदाडे,कल्पना कांबळे ,श्री प्रसाद उगीले यांचा सत्कार करण्यात आला . याप्रसंगी विद्यार्थी पालक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख अमृतेश्वर स्वामी यांनी केले .



## सुरक्षित इंटरनेट वापरासाठी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा प्रशिक्षण

**लातूर :** राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर आणि क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या जनजागृती उपक्रमांतर्गत दयानंद विद्यालय बाभळगाव ता. जि.लातूर येथे विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती सत्र उत्साहात पार पडले.

दि. २८ जुलै २०२६ रोजी सकाळी १२.०० ते ०१.१२ या वेळेत झालेल्या या सत्रात इयत्ता आठवी ते दहावीच्या २५० हून अधिक विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी सायबर वॉरिअर जाधव योगिता आणि सायबर वॉरिअर बोरूळे प्राजक्ता यांनी फोटो मॉर्फिंग, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय)च्या माध्यमातून फोटो तयार करण्याची प्रक्रिया, एआयचा सुरक्षित आणि जबाबदारीने वापर, मजबूत परवलीचा शब्द (पासवर्ड) तयार करण्याचे महत्त्व याबाबत उदाहरणांसह माहिती दिली. तसेच मोबाईलमध्ये कोणतेही ॲप डाउनलोड करताना कोणत्या परवानग्या द्याव्यात आणि कोणत्या परवानग्या देणे टाळावे, याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याशिवाय ऑनलाइन फसवणूक, बनावट संकेतस्थळांच्या दुव्यांपासून सावध राहणे, ओटीपी फसवणूक, समाजमाध्यमांचा सुरक्षित वापर तसेच डिजिटल गोपनीयतेचे महत्त्व याबाबतही विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.

संवादात्मक पद्धतीने झालेल्या या सत्रात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध प्रश्न विचारले. प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून सायबर सुरक्षेचे महत्त्व प्रभावीपणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आले. कार्यक्रमासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक यांचे मार्गदर्शन लाभले. आयोजनासाठी बोचरे मॅडम यांनी विशेष सहकार्य केले. विद्यालयातील सर्व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी सुरक्षित डिजिटल सवयी अंगीकारून जबाबदार डिजिटल नागरिक बनावे, असे आवाहन करण्यात आले.

## जागतिक निसर्ग संरक्षण दिनाचे औचित्य : रोटरी क्लबच्या वतीने तोंडचीर येथे वृक्षारोपण



**उदगीर :** त भा वृत्तसेवा येथील रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलच्या वतीने जागतिक निसर्ग संरक्षण दिनाचे औचित्य साधून तथा रोटरी प्रांताच्या प्रथम महिला पारुल पटेल यांच्या वाढदिवसानिमित्त तोंडचीर ता. उदगीर येथे जि. प. प्राथमिक शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी तोंडचिरचे सरपंच सुदर्शन पाटील, रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलचे अध्यक्ष ॲड. विक्रम संकाये, उपाध्यक्ष विजयकुमार पारसेवार, सचिव डॉ. सुधीर जाधव, प्रोजेक्ट चेअरमन चंद्रकांत ममदापुरे, महानंदा सोनटक्के, प्रा. अन्नपूर्णा मुस्तादर, संतोष फुलारी, मोतीलाल डोईजोडे,निशांत धवलशंख, विक्रम हलकीकर, केंद्र प्रमुख केशव नरवटे, जि. प. शाळेच्या मुख्याध्यापिका व्ही. डी. बिरादार, जे. एम. कोले, एच. जी. नेलगे, आकाश तोंडचीरकर, विठ्ठल चामे, जे. एम. काळे, भालचंद्र पांचाळ,आदित्य कोयले, रोहित सूर्यवंशी,यांच्यासह शिक्षक, ग्रामस्थ उपस्थित होते.

## महादेवस्वामी मठ संस्थान, दैठणा येथे गुरुपौर्णिमा उत्सव हजारो भक्तांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न

**दैठणा, दि. २९ जुलै २०२६ :** दैठणा येथील प्राचीन व श्रद्धास्थान असलेल्या महादेवस्वामी मठ संस्थानात प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही गुरुपौर्णिमेचा पवित्र उत्सव अत्यंत भक्तिमय, शिस्तबद्ध आणि भव्य स्वरूपात संपन्न झाला. हजारो शिष्य, भाविक आणि भक्तांच्या उपस्थितीमुळे संपूर्ण मठ परिसर भक्तिरसाने ओथंबून गेला होता.





गुरुपौर्णिमेनिमित्त पहाटेपासूनच मठात विविध धार्मिक कार्यक्रमांना प्रारंभ झाला. गुरु पूजन, भजन, कीर्तन, नामस्मरण, प्रवचन तसेच भक्तांना अध्यात्म, संस्कार आणि सदाचाराचा संदेश देणारे मार्गदर्शनपर कार्यक्रम दिवसभर सुरू होते. गुरू-शिष्य परंपरेचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या या सोहळ्याने उपस्थित भाविकांना आध्यात्मिक ऊर्जा आणि प्रेरणा दिली. या उत्सवासाठी केवळ दैठणा गावातीलच नव्हे, तर परिसरातील तसेच दूरदूरच्या भागांतूनही महादेवस्वामी महाराजांचे शिष्यगण आणि महारुद्र स्वामी महाराजांचे शिष्यगण मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. विविध भागांतून आलेल्या भक्तांनी गुरुंचे दर्शन घेऊन आशीर्वाद प्राप्त केला. दिवसभर मठ परिसरात भक्तांची सतत वर्दळ सुरू होती.

दैठणा येथील हा गुरुपौर्णिमा उत्सव अनेक वर्षांची अखंड परंपरा जपत आजही त्याच श्रद्धा, भक्ती आणि उत्साहाने साजरा केला जात आहे. परिस्थिती कोणतीही असो, या धार्मिक परंपरेत आजपर्यंत कधीही खंड पडलेला नाही. त्यामुळे या उत्सवाला परिसरातील एक महत्त्वपूर्ण धार्मिक आणि सांस्कृतिक सोहळा म्हणून विशेष ओळख प्राप्त झाली आहे.

या भव्य कार्यक्रमाचे विनीत आयोजन महारुद्र महादेव स्वामी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. तर संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन, व्यवस्थापन, देखभाल आणि वाहतूक व्यवस्थेची जबाबदारी धनु महाराज महारुद्र स्वामी यांनी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने सांभाळली.

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी औसा यांचे कार्यालय**
(भुकंप विभाग)
**जाहीर प्रगटन**
जा.क्र.२०२६/भु.पु/कावि-१७७ दि.१९.०६.२०२६
विषयः- भुकंपग्रस्त प्रमाणपत्र बदलुन मिळणे बाबत..
संदर्भः- श्री. गुरुनाथ कोंडीबा शिंदे रा. कारला ता.औसा जि. लातूर यांचा अर्ज दि.०८.०६.२०२६
उपरोक्त विषयी संदर्भीय अर्जाच्या अनुषंगाने मौ. कारला ता. औसा येथील तमाम जनतेस कळविण्यात येते की, श्री. गुरुनाथ कोंडीबा शिंदे रा. कारला यांनी अर्ज सादर करुन यापुर्वी प्रथम वेळेस त्यांचा मुलगा नामे श्री. रामराव गुरुनाथ शिंदे रा. कारला यांचे नावे दिनांक २२.१२.१९९९ रोजी काढण्यात आलेले भूकंपग्रस्त प्रमाणपत्र बदलुन दुस-यांदा अर्जदार यांची मुलाची मुलगी नात कु. प्रियंका रामराव शिंदे रा. कारला यांचे नावे भूकंपग्रस्त प्रमाणपत्र बदलून मिळणे बाबत विनंती केलेली आहे.
तरी मौ. कवळी ता. औसा येथील भूकंपग्रस्त प्रमाणपत्र बदलून बाबत कोणाचे हरकत/अक्षेप असल्यास त्यांनी सदर जाहीर प्रगटन प्रसिध्दी झालेपासून १५ (पंधरा) दिवसाचे आत तहसील कार्यालय औसा येथे हजर राहून आपले आक्षेप/हरकत सार्वजनिक सुट्टीचे दिवस सोडुन कार्यालयीन वेळेत लेखी स्वरुपात नोंदविण्यात यावा.
उक्त कालावधीनंतर प्राप्त आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत. व उक्त प्रकरणात नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी. सदरील जाहीर प्रगटन आज दि. २५.०६.२०२६ रोजी माझे सही व शिक्यानिशी काढण्यात आलेले आहे.
नायब तहसीलदार मह/-१
तहसील कार्यालय, औसा

# गुरुपौर्णिमेनिमित्त आचोला बेटावर टोपली जत्रा उत्साहात; पर्यटनस्थळाचा दर्जा देण्याची ग्रामस्थांची मागणी

**देवणी प्रतिनिधी:-** तालुक्यातील आचोला गावालगत असलेल्या ऐतिहासिक आचोला बेटावर गुरुपौर्णिमेनिमित्त पारंपरिक टोपली जत्रा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. यावेळी धार्मिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक तसेच विविध क्रीडा आणि मनोरंजनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पंचक्रोशीतील भाविक आणि ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या परंपरेचा आनंद लुटला.

आचोला बेट हे परिसरातील ऐतिहासिक, धार्मिक आणि सांस्कृतिक वारसा लाभलेले ठिकाण म्हणून ओळखले जाते. अनेक दशकांपासून गुरुपौर्णिमेच्या दिवशी येथे टोपली जत्रेची परंपरा अखंडपणे जपली जात आहे. पूर्वी गावातील प्रत्येक कुटुंब आपल्या घरून टोपलीत भोजनाचे साहित्य घेऊन बेटावर येत असे. त्यानंतर सर्वांनी एकत्रितपणे सामुदायिक भोजन करून गावकऱ्यांमध्ये ऐक्य, बंधुभाव आणि सामाजिक सलोखा वृद्धिंगत केला जात असे. भोजनानंतर सांस्कृतिक, आध्यात्मिक, क्रीडा आणि विविध लोकपरंपरांशी निगडित कार्यक्रमांचे आयोजन केले जाई.



आजही ही परंपरा ग्रामस्थांनी तेवढ्याच श्रद्धेने आणि उत्साहाने जतन करून ठेवली आहे.

पूर्वी या परिसरात भौतिक सुविधा अत्यंत मर्यादित होत्या. मात्र ग्रामस्थांच्या सहकार्य, श्रमदान आणि लोकसहभागातून बेटावर लक्षणीय विकास साधण्यात आला आहे. येथील प्राचीन अंबाबाई मंदिर, लक्ष्मी मंदिर तसेच बेटाच्या अग्रभागी असलेल्या महादेव मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला असून मंदिर परिसराचेही सुशोभीकरण करण्यात आले आहे. वर्षभरातील बाराही अमावस्यांना तसेच विविध धार्मिक उत्सवांच्या निमित्ताने येथे आध्यात्मिक कार्यक्रम मोठ्या भक्तिभावाने आयोजित केले जातात.

नैसर्गिक सौंदर्य, धार्मिक महत्त्व आणि सांस्कृतिक परंपरा यांचा संगम लाभलेले आचोला बेट हे आज परिसरातील श्रद्धास्थान बनले आहे. बेटापासून अगदी जवळ असलेले दरेवाडी येथील प्रसिद्ध बालाजी मंदिरही या धार्मिक पर्यटनाला अधिक समृद्ध करणारे ठरत आहे.

आचोला बेटाचा धार्मिक, ऐतिहासिक आणि नैसर्गिक वारसा लक्षात घेता या ठिकाणाला पर्यटनस्थळाचा दर्जा द्यावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. स्थानिक आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी या ठिकाणच्या विकासाकडे विशेष लक्ष दिल्यास आचोला बेट धार्मिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्वाचे केंद्र म्हणून विकसित होऊ शकते, अशी अपेक्षा विद्यमान उपसरपंच नामदेव कारभारी यांनी व्यक्त केली.